## विविजा मंचतर्फे प्रकाशित पुस्तिके

**ब्राह्मणांना आणखी किती झोडपणार ?**
ह. मो. मराठे

**ब्राह्मण परकीय आहेत काय ?**
डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे

**म. फुले यांच्या कार्यात ब्राह्मणांचा सहभाग**
विद्याकर वासुदेव भिडे

**डॉ. आंबेडकर यांच्या कार्यात ब्राह्मणांचा सहभाग**
प्रा. माधव पोतदार

**मराठी स्वराज्य ब्राह्मण पेशव्यांनी बुडविले काय ?**
डॉ. भा. रा. अंधारे

**ब्राह्मणमानस**
(ब्राह्मणांना आणखी किती झोडपणार? या ह. मो. मराठे यांचा गाजलेल्या लेखाविषयीच्या निवडक पत्रांचे संकलन )

**ब्राह्मणनिंदेची नवी लाट**
ह. मो. मराठे

**ब्राह्मण चळवळ कशासाठी ?**
ह. मो. मराठे

# ब्राह्मण परकीय आहेत काय?

**डॉ. नी.र.वऱ्हाडपाण्डे**
एम. ए. बी. लिट्. (ऑक्सफोर्ड), पीएच्.डी., डी. लिट्

'विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच' तर्फे प्रकाशित

ब्राह्मण परकीय आहेत काय?

*मुद्रक, प्रकाशक*

**'विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच' साठी**

**ह. मो. मराठे**

कार्यकारी विश्वस्त
विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच (ट्रस्ट)
(रजि. नंबर - ई ४४४८, पुणे)
६०७/ओ इमारत,पिनाक मेमरीज (II), कोथरुड, पुणे ४११ ०३८.
(०२०) २५४३७५३०,
९४२३०१३८९२

*लेखक*

**डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे**

३८, हिंदुस्थान कॉलनी, अमरावती रोड, नागपूर - ४४००३३
(०७१२) २५२२८०८

(c) विविजा मंच, पुणे

*संगणकीय अक्षरजुळणी आणि मुद्रणव्यवस्था*

**लीनता प्रकाशन आणि मुद्रणसेवा**

३८१ अ/१, शनिवार पेठ, कन्याशाळेजवळ,
पुणे - ४११ ०३०.

*मुद्रणस्थळ*

**जंगम ऑफसेट प्रा. लि.**

४१, नांदेड फाटा, सिंहगड रोड,
पुणे -४११ ०४१.

किंमत : रु.२५/-

*'विविजा' मंचचे विश्वस्त मंडळ*

- **ह.मो.मराठे**
- **मनोहर बोरगावकर**
- **श्री.वा.कुलकर्णी**
- **मकरंद रा. देव**

*तिसरी आवृत्ती*
**ऑगस्ट २०१०**

पुस्तिका मागविण्यासाठी पत्ता

**पुष्पक प्रकाशन**

३८१ अ/१, शनिवार पेठ,
कन्याशाळेसमोरील रस्ता ,
पुणे - ४११ ०३०.
फोन नं. (०२०) २४४८३०६२
मो. ९८२३५४६०४२ *(निपुणगे)*

*पुस्तिकांसाठी ह.मो.मराठे यांच्याकडे पैसे वगैरे पाठवू नये.*
*श्री. निपुणगे यांच्याशी 'पुष्पक प्रकाशन'च्या पत्यावर संपर्क साधावा.*

# प्रकाशकांचे प्रास्ताविक

काही महिन्यांपूर्वीची घटना! पुण्याचेच एक उपनगर भोसरी इथली. भोसरीच्या ब्राह्मण संघाची काही कार्यकर्ती मंडळी माझ्याकडे काही कामासाठी आलेली असताना त्यांनी मला सांगितलेली.

या मंडळीपैकी काहीजण भोसरी येथील एल.आय.सी. कार्यालयात काही कामासाठी गेले होते. कर्मचाऱ्यांसाठी सूचना वगैरे लावावयाच्या सूचना फलकावर त्यांना एका छापील बातमीचे कात्रण लावलेले आढळले. त्या बातमीचे शीर्षक ठळक अक्षरात छापले होते. ते असे-

**ब्राह्मण परकीय आहेत !**

श्री.श्रीमंत कोकाटे यांच्या भाषणाची ती बातमी होती. 'सम्राट' नावाच्या वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या त्या बातमीचे कात्रण नोटीस बोर्डवर लावण्यात आले होते. ते बघून कामासाठी तेथे गेलेल्या ब्राह्मण मंडळींनी कार्यालय प्रमुखांकडे तक्रार केली. कार्यालय प्रमुखांनी 'सॉरी' म्हटले. ब्राह्मण मंडळींनी पोलीस स्टेशनवर तक्रार नोंदविली. पोलिसांनी नोटीस बोर्डवरचे ते कात्रण काढून नेले.

ब्राह्मण भारतीय नाहीत तर ते परकीय आहेत, असा ब्राह्मणविरोधवादाचा (यालाच महाराष्ट्रात ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद असे म्हणतात.) एक आधारभूत सिद्धांत आहे. भारतातले ब्राह्मण (आजचेही आणि कालचेही) हे आर्यांचे वंशज आहेत, आर्य हे भारताबाहेरून भारतात आलेले परकीय आक्रमक होते, असे हा सिद्धांत मानतो. नव्याने धारदार होऊ लागलेल्या ब्राह्मण विरोधवादाचे पुरस्कर्ते नव्या उत्साहाने हा सिद्धांत प्रतिपादन करू लागलेले आहेत, त्याचा प्रसार करू लागले आहेत. ब्राह्मण हे परकीय आक्रमकांचे वंशज असल्याने त्यांना भारतीय समजू नका असे ते बहुजनसमाजातल्या शिकल्या सवरल्या तरुणांना सांगू लागलेले आहेत.

या सिद्धांतात तथ्यांश किती आहे? त्याची शहानिशा प्रस्तुत पुस्तिकेत डॉ.नी.र. वऱ्हाडपांडे यांनी केली आहे. भाषाशास्त्रीय विश्लेषण, वेदांतील इंद्रअसुर यांच्या कथांचा अर्थ, पुराणातील कथांचा अर्थ, सांस्कृतिक संदर्भांचे विश्लेषण इत्यादींची अतिशय विद्वत्तापूर्ण अशी चर्चा लेखकाने या पुस्तिकेत केली आहे. विषयच अवघड असल्याने लेखनही थोडे अवघड होणे अटळच होते. पण अभ्यासाच्या दृष्टीने वाचल्यास अवघड वाटणार नाही, अशी खात्री वाटते.

'विविजा' मंच तर्फे प्रकाशित करण्यात यावयाच्या पुस्तिका/ पुस्तके तयार करताना दोन हेतू नजरेसमोर ठेवले आहेत ते असे-

१) ब्राह्मणांबद्दल जे निराधार गैरसमज निर्माण करण्यात आले आहेत त्यांचे शक्य

तेवढे निराकरण करणे.

२) भारतीय समाजाच्या जडणघडणीत ब्राह्मणांनी हजारो वर्षे जे योगदान दिले आहे ते समाजासमोर ठेवणे.

समाजात, जातीजातीत विद्वेष वाढविणे ही नव्हे, तर विद्वेष कमी करण्याचा प्रयत्न करणे हीच ट्रस्टच्या कामाची दिशा आहे.

आपल्या 'विविजा मंच' (ट्रस्ट) तर्फे पाच पुस्तिका जानेवारी पर्यंत प्रकाशित करायच्या असे ठरविले होते. पण तीनच पुस्तिका मुदतीत लिहून मिळाल्या. त्या अशा १) ब्राह्मण परकीय आहेत काय? २) म.फुले यांच्या कार्यात ब्राह्मणांचा सहभाग ३) डॉ.आंबेडकर यांच्या कार्यात ब्राह्मणांचा सहभाग.

या तीन पुस्तिका तूर्त प्रसिद्ध करीत आहोत. इतर विषयांवरच्या पुस्तिका हळूहळू प्रसिद्ध होत राहतील.

शंभर पानापर्यंतच्या पुस्तिकेची किंमत २५ रुपयेच ठेवायची असे ठरविले आहे. कारण पुस्तिका कमी किंमतीत विकायची याच हेतूने देणगीदारांनी देणग्या दिलेल्या आहेत.

आतापर्यंत अडीच पावणेतीन लाखांच्या देणग्या जमल्या आहेत. आणखी पैशांची गरज आहे. तरी सहानुभूतिदारांनी देणग्या मिळवायला मदत करावी.

वर उल्लेखलेल्या तीन पुस्तिकांचा संच (पाठवण्याच्या खर्चासह) फक्त १०० रुपयात द्यायचे ठरविले आहे. वाचकांनी 'ग्रुप बुकिंग' करून जास्तीजास्त संच खपवायला मदत करावी ही विनंती. पुस्तकांची विक्री व्यवस्था 'पुष्पक प्रकाशन' कडे दिली आहे. चेक, डी.डी., म.ऑ. पुष्पक प्रकाशनच्या नावावर काढावा. पुण्याबाहेरच्या चेकसाठी योग्य ते कमिशन जादा पाठवावे. एकाच पत्त्यावर अधिक संच पाठविल्यास पाठविण्याचा खर्च कमी पडेल . एखाद्याला वाटले की स्वत:साठी एक संच घेऊन चार बाहेरगावच्या परिचितांना पाठवावे. तर तसेही करता येईल. त्यासाठी ५०० रुपये पाठवावे. देणग्यांचे चेक्स 'विद्वेषाच्या विरोधात जागृति मंच' या नावे काढून तेही C/o **पुष्पक प्रकाशन,** ३८१/अ/१ शनिवार पेठ, कन्याशाळेसमोरील रस्ता, पुणे - ४११०३० (फोन नं. (०२०) २४४८३०६२ / ९८२३५४६०४२) या पत्त्यावर पाठवावे. माझ्या पत्त्यावर पत्रांखेरीज काही पाठवू नये. कुरीयरही पाठवू नये. पुष्पक प्रकाशनकडे आलेले देणग्यांचे चेक्स/ड्राफ्टस ट्रस्टना मिळतील अशी व्यवस्था केली आहे.

कृपया सहकार्य करावे आणि कार्यास हातभार लावावा हि विनंती.

**ह. मो. मराठे**
कार्यकारी विश्वस्त



लेखक परिचय

## डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे

जन्म : २५/२/१९२१

उपाधि : सर्व विश्वविद्यालीन परीक्षा पहिल्या वर्गात.
एम. ए. समकक्ष, बी. ए. ऑनर्स (संस्कृत), एम. ए. (तत्त्वज्ञान), बी. लिट्. (ऑक्सफर्ड) (मनोविज्ञान), पीएच.डी. (तत्त्वज्ञान), डी. लिट्. (इण्डॉलॉजी), शास्त्री (दर्शन) काव्यतीर्थ

पदक : प्राख्य गणपतराव सुवर्णपदक बी. ए. व बी.एस्सी. ऑनर्स मिळून साऱ्या विद्यापीठात प्रथम आल्याबद्दल.

शिष्यवृत्त्या : १. भारतीय तर्कशास्त्रात संशोधनासाठी किंग एडवर्ड मेमोरियल शिष्यवृत्ती.
२. ऑक्सफर्ड विद्यापीठात मनोविज्ञानाचे शिक्षण घेण्यासाठी सरकारी शिष्यवृत्ती.

**महान संशोधकाशी चर्चा व प्रवास**

१. केंब्रीज विद्यापीठात वास्तव्य करून असलेल्या बर्ट्रांड रसेल या विश्वविख्यात तत्त्वज्ञाशी चर्चा करण्याची संधी. अनंताच्या स्वरूपासंबंधी झालेल्या एका चर्चेचा वृत्तांत 'विवेकवाद' या ग्रंथात दिला आहे.

२. ऑक्सफर्डमधील प्रोफेसर यीक्स्ली यांच्या शिफारसीवरून सरकारने युरोपात मनोविज्ञानाच्या प्रयोगशाळा पाहण्यासाठी खास अनुदान मंजूर केले. त्या आधारे युरोपातील प्रमुख विद्यापीठातील मनोवैज्ञानिक प्रयोगशाळांना भेट देऊन तेथील प्राध्यापकांशी त्यांच्या क्षेत्राबद्दल चर्चा केली. कोपनहेगन विद्यापीठातील प्रोफेसर रुबिन याने अशा चर्चेत विशेष रुची दाखविली. काही वर्षानंतर थायलॅण्ड येथील विद्यापीठाला भेट देऊन तेथे थाई भाषेच्या माध्यमातून सर्व स्तरावरील शिक्षण देताना उच्च विज्ञानावरील पाठ्यपुस्तके व वैज्ञानिक परिभाषा थाइ भाषेतून कशी करण्यात आली यावर बरीच चर्चा केली. वैज्ञानिक परिभाषा तयार करताना संस्कृतची बरीच मदत झाली असे कळले.

**पदे**

१. नागपूर व सागर विद्यापीठात संलग्न असलेल्या महाविद्यालयात व्याख्याता.

२. रक्षाविज्ञानखात्यातील प्रमुख Chief Psychologist and Director of Psychological Research या पदावरून निवृत्ती.

३. अध्यक्ष, संस्कृत भाषा प्रचारिणी सभा
४. संपादक, 'भवितव्य' संस्कृत साप्ताहिक

**सत्कार**

१. इण्डॉलॉजीला महत्त्वाचे योगदान केल्याबद्दल सारथी पुरस्कार व सत्कार.
२. संस्कृत भाषेच्या सेवेबद्दल महाराष्ट्र सरकारने १०,०००/- रुपयांचे पारितोषिक देऊन सत्कार केला.
३. The Mythical Aryan and their Invasion या ग्रंथाबद्दल राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार.

**ग्रंथरचना व उपलब्ध पुस्तके**

**इंग्रजी**

1. Abilities and Education
2. Time, Space and Motion
3. Intelligence Test - Scores and Candidates at the Services Selection Boards
4. The Nemesis of Nehru Wrodship

**मराठी**

१. सत्तावनचे स्वातंत्र्ययुद्ध आणि त्याचे निंदक
२. विवेकवाद
३. भम्पकराव बाताडे आणि इतर गोष्टी

**पुस्तकावरील परीक्षणे**

- विवेकवाद या पुस्तकातील प्रतिपादन Competent Position of Considerabal Merit असल्याचे मत बर्ट्रांण्ड रसेलने ज्या पत्रात व्यक्त केले आहे त्याचे भाचित्र पुस्तकात दिले आहे.
- काही पुस्तकांवरील प्रगत देशातील संशोधनकालिकात आलेले मूल्यमापन खाली दिले आहे.

**Abilities and Education**

Prof. Sorensen writes in Contemporary Psychology May 64 'The Discussion on the topic : A Search for Common Elements' is a very able one and centers attention to one of the most basic but usually overlooked means for improving both learning and living. It can be reported that Waradpande writes English very clearly and effectively.'



प्रकरण - १

# वाद सुरू कोटून झाला?

ख्रिस्तपूर्व सुमारे १५०० च्या सुमारास आर्य नावाच्या एका वंशाने भारतावर स्वारी केली व एतद्देशीयांचा पराभव करून व त्यांची भूमी बळकावून भारतात वस्ती केली असा सिद्धांत ऑक्सफर्ड विद्यापीठातील संस्कृतचा प्रोफेसर मॅक्समूलर याने १९व्या शतकाच्या दुसऱ्या अर्धात मांडला. या वंशाचे लोक गोरे, सरळ व धारदार नाकाचे होते असे त्याने म्हटले. पण कालान्तराने त्याने हे मत सोडून दिले व आर्य हा एक शरीरविशेषांनी ओळखता येण्यासारखा वंश नसून भाषिक वंश होता असे म्हणण्यास सुरुवात केली. परंतु मॅक्समूलरच्या या म्हणण्याकडे कोणी लक्ष दिले नाही. आर्य म्हणजे गोरे व सरळ नाकाचे असे गृहीत धरून लिहिण्याचा प्रघात सुरूच राहिला. रिस्ले व त्याच्या पावलावर पाऊल ठेवून इरावती कर्वे वगैरे संशोधकांनी मुख्यतः नाकाचा आकार व गोरेपणा याच्या आधारावर भारतातले आर्य कोण व अनार्य कोण याबद्दल आडाखे बांधले. चिं. वि. वैद्य यांनी 'मराठे आर्य आहेत काय?' या शीर्षकाचा एक लेख लिहून नाकाची लांबी, रुंदी व बाकी चेहऱ्याच्या वरील उंची या तीन परिमाणांच्या आधारे बसविलेल्या एका मापनांकाच्या आधारे मराठे आर्य आहेत असा निर्णय दिला.

मॅक्समूलरचा मूळ सिद्धांत भारतावरील इंग्रजी सत्ता आर्यांच्या सत्तेपेक्षा जास्त परकीय नाही अशी मनोवृत्ती भारतीयात निर्माण करणारा होता. भारताची भाषा इंग्रजीच असावी असा प्रचार करणाऱ्या लोकांचा एक आवडता युक्तिवाद असा आहे की इंग्रजीला परकीय मानले तर संस्कृतला देखील परकीय मानावे लागेल; कारण संस्कृत ही परकीय आर्यांची भाषा आहे.

मॅक्समूलरच्या सिद्धान्ताने उत्तर भारतीय हे परकीय आक्रमक आहेत अशी भावना दक्षिण भारतात निर्माण केली.

हे सर्व परिणाम इंग्रजांना अभिप्रेतच होते, पण हिटलरने खुद्द युरोपात वंशद्वेषाचे तांडव माजेल अशा रीतीने या सिद्धान्तास मुरड घातली. आर्य हे केवळ गोरे व सरळ नाकाचे नसून शिवाय निळ्या डोळ्यांचे व लाल केसांचे आहेत, ज्यू हे अनार्य आहेत असा प्रचार केला. पूर्व युरोपांतील देशांना, विशेषतः रशियनांना, हिटलर आर्य मानण्यास तयार नव्हता. आपण या अनार्यविरुद्ध लढा पुकारला तर आपल्याच वंशाचे आर्य इंग्रज आपल्याशी सुरू असलेले युद्ध बंद करून आपल्याला साथ देतील असा हिटलरचा आडाखा होता.

युरोपच्या इतिहासाबद्दल हिटलरने एक उपपत्ती मांडली व ती म्हणजे 'हा इतिहास मुख्यतः आर्य व ज्यू यांच्या संघर्षाचा इतिहास आहे. ज्यू हा वंश चलाख व लबाड आहे.

त्याने जगातल्या सर्व बलाढ्य देशात प्रवेश करून आपल्या धनार्जनाच्या कौशल्याने तेथे प्रभावी स्थान प्राप्त केले आहे. त्यांची निष्ठा त्यांच्या निवासाच्या देशावर कधीच नसते. ते जगभर पसरलेल्या आपल्या वंशबांधवांचे हित साधण्यास फक्त तत्पर असतात.

आर्यांचा मूळ देश मध्य एशिया हा होता असा मॅक्समूलरने दुसरा तर्क केला. 'पण या तर्काबद्दल माझा आग्रह नाही. आर्य एशियात कुठे तरी राहात होते या पलीकडे निश्चितपणे काहीच सांगता येत नाही' असे त्याने स्पष्ट म्हटले आहे. (Biography of words)

'आर्य हा शरीरविशेषावरून ठरणारा वंश नाही' या मॅक्समूलच्या म्हणण्याकडे जसे कोणी लक्ष दिले नाही त्याचप्रमाणे ते आशियातून बाहेरच्या जगात पसरले याव्यतिरिक्त त्यांच्याबद्दल काहीच बोलता येत नाही या त्याच्या म्हणण्याकडे देखील सगळ्यांनी दुर्लक्ष केले व आर्य हे भारताबाहेरून आले असेच मत सर्वत्र मांडले गेले. विशेषतः पाठ्य पुस्तकांतून मॅक्समूलर या आर्यसिद्धांताच्या आद्य प्रणेत्याच्या मताचा उल्लेखही न करता आर्य अभारतीय होते हे मत सर्रास शिकविण्यात आले. ही गोष्ट वैदिक संस्कृतीच्या अभारतीयत्वाचा प्रचार करणे हा इंग्रज सरकारचा हेतू होता असे समजण्यास सबळ कारण आहे.

आर्याक्रमण सिद्धान्तामुळे भारतातील एकराष्ट्रीयत्त्वाच्या भावनेला तडा गेला. पाश्चात्य जगाला त्याचे सोयरसुतक असण्याचे कारण नव्हते. पण विसाव्या शतकात हिंटलरच्या रूपाने या सिद्धान्ताने जो धुमाकूळ घातला त्यामुळे पाश्चात्त्य जगदेखील त्याच्या हानिकारकतेबद्दल विचार करू लागले. 'आर्यात सर्व सद्गुण आहेत तर ज्यू मध्ये सर्व दुर्गुण आहेत, हे दुर्गुण संस्काराने नष्ट करता येण्यासारखे नाहीत. त्यामुळे ज्यूंना जगातून नष्टच केले पाहिजे.' असे थोडक्यात हिटरलचे तत्त्वज्ञान होते. म्हणजे ब्राह्मणविरोधकांचे ब्राह्मणांबद्दल जे मत आहे तेच हिटरलचे ज्यूंबद्दल होते.

हिटरलवादाचा फटका फक्त ज्यूंनाचा बसला असे नाही. सारे युरोपच हिटलरच्या टाचेखाली आले. या अनर्थाची प्रतिक्रिया होऊन आर्य/अनार्यवाद युरोपात बराच बदनाम झाला व काही लोकांनी वंशकल्पनेच्या वैज्ञानिकतेबद्दल शंका घ्यायला सुरुवात केली.

**मॅक्समूलरचे भारतीय विकृतीककरण**

आर्याक्रमणसिद्धांत मांडणाऱ्यांपैकी काहींनी स्वतःच असे म्हटले आहे की आर्यांच्या देशान्तराबद्दल भाषिक तर्काव्यतिरिक्त कोणताही आधार देता येत नाही. ऑक्सफर्डमधील संस्कृतचे प्रोफेसर बरो म्हणतात -

For the Aryan Invasion of India no direct evidence is available. Even the text of the Rgveda where historical allusiions are not rare there is no reference anywhere to the fact of the



migration nor any definite indication that it was even remembered (Sanskrit)

लेक्सिकॉन नावाच्या अमेरिकन एन्सायक्लोपीडियामध्ये खालील उद्गार आहेत Aryan is a term used to denote both a liguistic and an assumed racial category related to the language family. To day such arguments about racial origins are usually seen as little more than speculation.

केवळ भाषाशास्त्रावर आर्याक्रमणसिद्धान्ताची भिस्त आहे. तरीही सारेच भाषाशास्त्रज्ञ आर्याक्रमणसिद्धान्त मानतात असे नाही.

अमेरिकेतील भारतीयांनी हल्ली आर्याक्रमणसिद्धान्तावर आक्षेप घेतलेला आहे व पाठ्यपुस्तकातून ते काढून टाकण्याची मागणी केली आहे. अमेरिकेन सरकारने या मागणीचा विचार करणे सुरू केले आहे. तेथील जैविकांच्या म्हणजे जीववैज्ञानिकांच्या मते भारतातील लोकसमूहात वंशवैचित्र्य दाखविणारी जैविक चिन्हे दिसत नाहीत.

वस्तुतः आनुवंशिकतेच्या आजच्या ज्ञानावरून असे दिसते की आनुवंशिक विशेषांच्या आधारे मानवाचे वंशात वर्गीकरण करताच येत नाही; कारण यापैकी प्रत्येक विशेष स्वतंत्र आहे. एकाशी दुसऱ्याचे योगायोगापेक्षा जास्त प्रमाणात साहचर्य आढळून येत नाही.

आजकाल शरीरपरीक्षेच्या आधारे 'क्ष' हे 'य' चे अपत्य आहे की नाही हे ठरविता येते ही गोष्ट वंशकल्पना सिद्ध करते असे काही लोकांना वाटते. ते हे विसरतात की कसोट्यांवरून आईबाप कोण हे ठरविता आले तरी जात ठरविता येत नाही. म्हणजे ब्राह्मण कोण व अब्राह्मण कोण हे ठरविता येत नाही. मान्य जातींचाच जर आनुवंशिकतेच्या कसोट्यांवरून निर्णय करता येत नाही तर आर्य, द्रविड वगैरे काल्पनिक वंशांचा निर्णय करता येईल अशी अपेक्षाच करता येत नाही.

आत्तापर्यंत पाश्चात्य विद्वानांनी मांडलेल्या आर्याक्रमणसिद्धांताचे स्वरूप व तो कसा निराधार आहे हे सारांशरूपाने सांगितले, पण भारतात या सिद्धान्ताचे अनेक प्रकारे जे विकृतीकरण झाले आहे ते तर त्यापेक्षाही निराधार आहे. नागपुरातले विद्वत्भूषण कृष्णशास्त्री घुले यांचे काही निबंध प्रकाशित झालेले आहेत. त्यात त्यांनी नाथ या संशोधकाचे The Rgveda is not an Indian document हे मत मान्यतापूर्वक उद्धृत केले आहे व हे मत पाश्चात्त्यांच्या आर्याक्रमण सिद्धांतावर आधारित आहे असे टिळकांच्या Arctic Home in the Vedas या प्रसिद्ध ग्रंथाचा हवाला देऊन म्हटले आहे. 'आम्हा वेदानुसारी आर्यांचा' असा शब्दप्रयोग घुल्यांच्या लेखनात येतो. म्हणजे घुले स्वतःला आर्य समजत होते. पण आर्याक्रमणसिद्धांत त्यांना आर्य समजत नाही.

महाराष्ट्रीय ब्राह्मण हे सीथोंद्रविड आहेत असे तो सिद्धान्त म्हणतो.

कोणत्याही पाश्चात्त्य विद्वानाने वेद भारताबाहेर रचले गेले असे म्हटलेले नाही. वेदामध्ये हिमालय व सरयूपासून सिन्धूपर्यंतच्या नद्यांचा उल्लेख त्या ज्या क्रमाने आहे त्याच क्रमाने केलेला आहे. वेदांच्या जन्मभूमीचे नावच मुळी सप्तसिन्धु असे होते. वेदांमध्ये सर्वात महत्वाची नदी सरस्वती ही आहे. ती आज घग्गर येथे गुप्त स्वरूपात आहे. तसेच गुप्त रूपाने प्रयागच्या त्रिवेणी संगमातील तिसरी नदी ही गुप्त झालेले सरस्वती आहे अशी जुनी परंपरा आहे. या परंपरा भूमीच्या इतिहासाने हल्ली सत्याधारित ठरविलेल्या आहेत. Techtonic Upheaval म्हणजे भूमीच्या थरांची उलथापालथ होऊन सरस्वती ख्रिस्तपूर्व दुसऱ्या सहस्रकात भूमीच्या उदरात गडप झाली आहे असे भौमिकी म्हणजे Geology सांगते. आजच्या राजस्थानच्या वाळवंटाच्या खाली सरस्वतीचे हे प्रवाह सापडलेले आहेत. भौमिकीय कालगणनेच्या आधारे हे प्रवाह खाली जाण्याचा काळ ख्रि. पू. २००० असा ठरविण्यात आला आहे.

Arid Zones Research Institute ने सरस्वतीचे पाच प्रवाह व ते भूमीखाली जाण्याचा काल याच्याबद्दल एक निबंध प्रकाशित केला आहे. ख्रि.पू. ४००मध्ये ऋग्वेदात म्हटल्याप्रमाणे सरस्वती समुद्रास मिळत होती.

प्रागैतिहासिक संस्कृतीचे अवशेष बहुधा याच प्रवाहांच्या काठाशी सापडतात. याप्रमाणे ज्योतिर्गणिताच्या आधारे ठरविलेल्या ऋग्वेदाच्या काळाची पुष्टि होते व वैदिक संस्कृती याच देशात जन्मली व वाढली याबद्दल शंका उरत नाही.

## 'ध्रुवसिद्धान्त' कितीसा खरा?

या सगळ्या विवेचनाविरुद्ध महाराष्ट्रात एक रामबाण युक्तिवाद म्हणून लो. टिळकांच्या Arctic Home in the Vedas या ग्रंथाचा उल्लेख केला जातो. हा ग्रंथ महाराष्ट्राच्या बाहेर फारसा मान्य नाही. तरी एका समर्थ संशोधकाने व हाडाच्या वकिलाने आपले सर्व अध्ययन व युक्तिकौशल्य पणास लावून तो लिहिला आहे. संशोधकीय लिखाण कसे लिहावे याचा तो आदर्श आहे. प्रत्येक नव्या विधानाचे आधार देण्याचा प्रयत्न केला आहे.

पण या गुणांच्या बरोबर या ग्रंथात जे दोष आहेत त्यांनी वरील सर्व गुणांवर हरताळ फासला जातो. एक तर पाश्चात्त्यांचा आर्याक्रमणसिद्धांत गृहीत धरून यात आर्यांचे मूलस्थान शोधण्याचा प्रयत्न केला आहे, पण हा सिद्धांत मुळात काय आहे व कोणत्या आधारावर उभारलेला आहे याचे ज्ञान ग्रंथकारास असले तरी ते त्याच्या लेखनातून मुळीच प्रकट होत नाही. वेदवाङ्मय भारताच्या बाहेर रचले गेले व संस्कृत भाषा भारताबाहेरून आली असा मॅक्समूलरचा वा एकूणच पाश्चात्त्य विद्वानांचा एकमुखी सिद्धांत आहे अशी



लेखकाची दृढ समजूत दिसते. ही समजूत सर्वस्वी निराधार आहे. 'इण्डोयुरोपीयभाषी आर्य भारताबाहेरून आले तेव्हा संस्कृत ही त्यांची भाषा नव्हती. त्यांच्या भाषेने कालान्तराने संस्कृत भाषेचे रूप घेतले व या भाषेत त्यांनी भारतात आल्यावर वेद रचले' असेच आर्याक्रमण सिद्धान्त मांडणारे सगळे पाश्चात्त्य म्हणतात. तेव्हा पाश्चात्त्यांच्या सिद्धांतावरून आर्यांचे मूलस्थान शोधायचे तर ते वेदांची रचना भारताबाहेर झाली असे गृहीत धरून शोधता येणार नाही. तसे करायचे असेल तर आधी वेद व संस्कृत भाषा भारतातच निर्माण झाली या पाश्चात्त्यांच्या मताचे खंडन करायला पाहिजे होते. असे न करणे म्हणजे पाया न घालता एखादी टोलेजंग इमारत उभारण्यासारखे आहे.

उपलब्ध वेदांतील हिमालय व सप्तसिंधु नाकारणे टिळकांना अशक्य असल्यामुळे उपलब्ध वेद भारतातच रचले गेले हे नाकारता येत नव्हते. या अडचणीतून निसटण्यासाठी मूळ ऋग्वेद हिमप्रलयात लुप्त झाला व उत्तर ध्रुवावर राहणे अशक्य झाल्यावर स्थलान्तर करीत भारतात पोचल्यावर मूळ वेद पुनः आठवण्याचा प्रयत्न झाला, तो हा सध्याचा ऋग्वेद अशी कल्पना करावी लागली. उत्तर ध्रुव सोडून भारतात आल्यावर आठवणीने वेदांची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न झाला, या दरम्यान किती वर्षे लोटली हे टिळक स्पष्ट करीत नाहीत. पण हिमप्रलयामुळे उत्तर ध्रुव सोडावा लागला असेल तर ही घटना निदान ५०००० वर्षांपेक्षा प्राचीन मानली पाहिजे, पण टिळक १०००० वर्षांपूर्वी जात नाहीत. १०००० वर्षापूर्वी हिमप्रलय झाला नाही. १०००० वर्षांपूर्वी तो समाप्त झाला. शिवाय ऋग्वेदात ध्रुवमंडळ विशिष्ट भौगोलिक परिस्थितीचे वर्णन आहे हे दाखविण्यासाठी टिळकांनी जी ओढाताण केली आहे, तिच्याकडे दुर्लक्ष केले तरी असे उल्लेख दाखविल्याने वेदांचे प्राचीनत्त्व मुळीच सिद्ध होत नाही. कारण ग्रीनलॅण्ड व अलास्कामध्ये टिळकांच्या काळी देखील ध्रुवमंडळविशिष्ट परिस्थिती होती या साध्या गोष्टीकडे टिळक व त्यांचे अभिमानी दुर्लक्ष करतात. ध्रुवविशिष्ट भौगोलिक परिस्थितीचे उल्लेख दाखविल्याने वेद फार प्राचीन तर सोडाच टिळकांच्याच काली ग्रीनलॉण्ड वा अलास्कामध्ये निर्माण झाला असे म्हणण्यास काही बाध येत नाही.

घुल्यांचा टिळकाभिमान वेदातील सप्तसिंधू या भारतातील नद्या नसून आकाशातील नद्या आहेत असे म्हणण्यापर्यंत गेला आहे. आकाशात या सप्तसिंधूपैकी फक्त गंगा नावाची नदी आहे. तिला आकाशगंगा हे नाव रूढ आहे यावरून देखील मूळ गंगा भूमीवरचीच हे अबाधित राहते.

पण अशी बहिर्गत प्रमाणे देण्याचे कारण नाही. सर्वात मोठा आक्षेप हा आहे की उत्तर ध्रुवांचे संदर्भ म्हणून टिळक ज्या ऋचा उद्धृत करतात त्यात दूरान्वयानेही उत्तर ध्रुवाचा संदर्भ नाही. या मुद्यांचा विस्तार मी माझ्या The Mythical Aryans and their

Invasion या डी. लिट्च्या प्रबंधात केला आहे. येथे फक्त एकच उदाहरण देणे पुरेसे आहे.

पुढील ऋचा टिळक निर्णायक मानतात

**तानीदहानि बहुलानि आसन् या प्राचीनमुदिता सूर्यस्य ।**

हे उषेचे वर्णन आहे. यात या प्राचीनमुदिता 'सूर्यस्य' या शब्दांनी ज्या दिवशी उषा सूर्याच्या पूर्वी उगवली असे कित्येक दिवस गेले. म्हणजे उषा उगवावी व मग सूर्य उगवावा असे कित्येक दिवस गेले असे म्हटले आहे. पण टिळक याचा अर्थ असा करतात की उषेचा उदय व सूर्याचा उदय यांच्यामध्ये कित्येक दिवस गेले. गेलेले दिवस उषा व सूर्य यांच्यामध्ये गेले असे सूचित करणारे एक अक्षरही या ऋचेत नाही.

वेद कोणत्या तरी अर्थी अपौरुषेय आहेत व अनादि नसले तरी अनादि मानता येतील इतके प्राचीन ठरविले पाहिजेत हा टिळकांचा आग्रह होता व त्यामुळे त्यांनी इतका आटापीटा केला. पण १०००० वर्षांचे प्राचीनत्त्व अनादित्वाच्या रेषामात्र देखील जवळपास येत नाही. प्रथम स्फोटापासून जगाची उत्पत्ती सांगणारे आजचे वैज्ञानिक जो काल सांगतात तो केवळ शेकडो शून्यांचा घाताङ्क देऊनच व्यक्त करता येतो. त्यात १०००० वर्षे म्हणजे दर्यामे खसखस. वेदांचे अनादित्व व अपौरुषेयत्व या धार्मिक श्रद्धांनी टिळकांच्या मनावर एवढा ताबा मिळविला होता की आर्क्टिक होम हा ग्रंथ लिहिताना त्यांच्यातील वैज्ञानिक गाढ बेशुद्धीत पडला.

## डॉ. आंबेडकरांचा घणाघात

तात्पर्य आर्याक्रमणासाठी टिळकांच्या ग्रंथाचा आधार हा मॅक्समूलरच्या आधारापेक्षाही जास्त भुसभुशीत आहे.

संस्कृत ही ब्राह्मणांची भाषा आहे व ब्राह्मण हे परकीय आहेत म्हणून संस्कृत भाषेला विरोध करण्याची एक प्रवृत्ती आहे. जातिद्वेषाच्या अंधतेमुळे आलेल्या बौद्धिक अंधतेचा हा मासला आहे. एक तर सारे आर्य हे ब्राह्मण होते असे आर्याक्रणसिद्धांत म्हणत नाही व कोणताही सुबुद्ध सिद्धांत म्हणू शकत नाही. ब्राह्मण हे पुरोहित आहेत व कोणताही समाज फक्त पुरोहितांचा असू शकत नाही. दुसरे असे की आर्य बाहेरून आले असे मानले तरी मराठीला तर महाराष्ट्रीय ब्राह्मणेतर आपली मानतात ना! मराठी संस्कृतोद्भव आहे याबाबतीत भाषाशास्त्रज्ञात दुमत असल्याचे मी ऐकले नाही. मग मराठीभाषी ब्राह्मणेतरांना संस्कृत परकीय कशी मानता येईल? संस्कृत हे मराठीचे मूळ नाही असे म्हणायचे असेल तर तिचे कोणते मूळ आहे, ते भारतात होते कशावरून?

भारतीय भाषांचा त्याग करून आपण इंग्रजीचाच स्वीकार करावा, इंग्रजीला परकीय मानले तर संस्कृतलाही परकीय मानावे लागेल असाही प्रचार केला जातो. या प्रचाराला



आर्याक्रमणसिद्धान्तात काही आधार नाही.

लो. टिळकांच्याच तोलाचे महाराष्ट्राला भूषणभूत ठरणारे राजकारणी व संशोधक डॉ. आंबेडकर होते. त्यांनी 'शूद्र कोण होते?' या विषयावर एक विचारणीय ग्रंथ लिहिला आहे. डॉ. आंबेडकरांनी पाश्चात्त्य संशोधकांच्या ग्रंथांचे चांगले अध्ययन केले होते हे त्यांच्या ग्रंथावरून स्पष्ट आहे. असे असता ते पाश्चात्त्य सिद्धांताच्या प्रतिष्ठेपुढे झुकले नाहीत. त्याचे त्यांनी यथार्थ मूल्यमापन केले आहे, ते येणेप्रमाणे :

१. आर्य हा शब्द ऋग्वेदात ३९ ठिकाणी वापरला आहे; परंतु तो आर्य वंश या अर्थाने एकाही ठिकाणी वापरला नाही.
२. आर्य लोकांनी हिन्दुस्थानावर स्वारी केली व सारा देश जिंकला याला ऋग्वेदात यत्किंचितही पुरावा नाही. ही गोष्ट खरी असती तर ऋग्वेदात आत्मश्लाघेने तिचा अनेक वेळा उल्लेख आला असता.
३. वैदिक वाङ्मयात 'माझी गंगा', 'माझी यमुना', 'माझी सरस्वती' असे भारतीय नद्यांचे उल्लेख जिव्हाळ्याने केले आहेत. परकीय माणूस नद्यांचा उल्लेख एवढ्या जिव्हाळ्याने करील काय?
४. Race in Europe by Prof Ripley या ग्रंथातील संशोधन युरोपातील गोऱ्या आर्यांनी काळ्या भारतीयांवर स्वारी केली या मताला छेद देणारे आहे. ते असे: दक्षिण फ्रान्समध्ये क्रो मॅग्नॉन या जातीचे काळे लोक राहतात. ते सध्याच्या गोऱ्या रहिवाशांपेक्षा प्राचीन काळचे आहेत. इटलीत पूर्वी होऊन गेलेले लिगुरियन नावाचे लोक गाफ्राग्नॉन येथे फार दिवस राहिलेले होते. त्यांचा रंग काळाकुट्ट होता. तेव्हा ज्या काळात युरोपातून आर्यांची भारतावर स्वारी झाली असे सांगण्यात येते त्या काळातले आक्रमक गोरे नसून काळे असले पाहिजेत असे म्हणावे लागेल. हे सर्व आर्याक्रमणसिद्धांताच्या विरुद्ध आहे.

आत्तापर्यंत विवेचनावरून एक इतिहाससिद्ध गोष्ट म्हणून आर्यांची भारतावरील स्वारी पाठ्यपुस्तकात अंतर्भूत करणे अत्यंत आक्षेपार्ह आहे हे वाचकास पटायला हरकत असू नये.

प्रकरण २

# कुल, जाति आणि प्रजाति म्हणजे काय?

Max Muller on an unlucky day used the word Aryan Race. Thus arose, truly out of talk alone, an imaginary creature:

**Aryan man**

**Heredity Race and Society**

By

Dunnn and Dobzansky

हे प्रकरण वाचताना कुल, जाति आणि प्रजाति या तीन शब्दांचा अर्थ लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

कुल म्हणजे पतिपत्नी व त्यांची मुले, नातू इत्यादि सर्व प्रजा.

पतिपत्नी हे नाते रक्ताचा संबंध असलेल्या स्त्रीपुरुषात नसावे अशी साधारणपणे चाल आहे. ही प्रथा मानवी समाजात नेहमीच राहिली आहे असे नाही. वेदात यम व यमी यांच्या संवादाचे एक सूक्त आहे. त्यावरून सख्ख्या भावाबहिर्णींनी देखील विवाह करण्याची चाल फार प्राचीन काळी होती हे स्पष्ट आहे. ही चाल बंद होण्याचे कारण रक्ताचे नाते नसलेल्या जोडप्यांची संतती जास्त निकोप असते हे लक्षात आले असावे. मानवांचे, त्याचप्रमाणे पाळीव जनावरांचे निरीक्षण करून ही गोष्ट लक्षात येणे सहज शक्य आहे.

रक्ताचा संबंध असलेल्या जोडप्यांच्या विवाहाला सपिण्ड विवाह म्हणतात. 'असपिंडा च या मातुरसगोत्रा च या पितुः। सा प्रशस्ता द्विजातीनां दारकर्मणि मैथुने।' म्हणजे जी मुलगी मातेशी असपिण्ड आणि पित्याशी असपिण्ड व असगोत्र असेल तिच्याशीच फक्त विवाह करावा असा धर्मशास्त्राचा नियम आहे. पिण्ड म्हणजे शरीर. ज्यांच्या शरीरसंबंधामुळे आपला पिण्ड निर्माण झाला त्यापैकी कुणीही आपल्या पत्नीच्या पूर्वजस्थानी नसावा हा वरील नियमाचा आशय आहे.

पण हा नियम द्विजातींनाच म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांनाच लागू आहे. तेव्हा या नियमाच्या आधारे जे द्विजाति मानले गेले नव्हते त्या शूद्रात सपिण्ड विवाह होत नव्हते याची खात्री देता येत नाही.

शूद्रच काय, विदर्भामध्ये ब्राह्मणातही मामाच्या मुलीशी लग्न करण्याची चाल होती. या चालीचे समर्थन करण्यासाठी पिण्ड या शब्दाचा अर्थ भाताचा पिण्ड असा करण्यात आला आहे. असा अर्थ केल्याने मामेबहिण सपिण्ड ठरत नाही. कारण ती मामाच्या घरी भोजन करते व ती जो भाताचा पिण्ड खाते तो मामाच्या घरच्या पंगतीतला असतो,



आपल्या घरचा नव्हे.

ही शुद्ध ओढाताण आहे हे सांगण्याची गरज नाही.

चुलत बहिणीशी लग्न करण्याची अद्यपि मुसलमानात व ख्रिस्ती लोकात चाल आहे. नम्बुद्री ब्राह्मणात सख्ख्या बहिणीशीच लग्न करण्याची चाल होती हे लक्षात घेतल्यास व भारतात कोणत्या काळी कोणत्या चाली किती प्रमाणात अस्तित्वात होत्या याची निश्चित माहिती नसल्यामुळे भारतात सपिण्डांची संतती नव्हतीच असा आग्रह धरता येत नाही.

ते काही असले तरी असपिण्ड जोडपे व त्याची सपिण्ड संतति यांचे कुल बनते, असा कुल शब्दाचा साधारण अर्थ आहे.

इंग्रजीत race व मराठीत वंश हा शब्द वापरला जातो. त्याचा अर्थ संदिग्ध आहे. रघुवंश व The Race of Raghus याचा अर्थ रघूच्या कुळातले असा आहे. उलट मंगोल वंश, नीग्रो वंश The Mongol Race, The Negro Race या शब्दप्रयोगात मंगोल व नीग्रो ही कुले आहेत असा अर्थ नाही. मंगोल व नीग्रा हे अनेक कुलांचे बनलेले असतात. तरी या सर्व कुलांचे फार प्राचीन काळी एकाच कुटुंबात मूळ सापडू शकेल अशी कल्पना आहे असे मूळ वस्तुतः आज सापडूच शकत नाही, कारण असे एक कुल असेलच तर ते प्रागैतिहासिक काळात केव्हा तरी असणार. जो काळ बोलून चालून प्रागैतिहासिक त्यात काय होते हा केवळ कल्पनेचा खेळ असणार! या कल्पना कितपत सुबुद्ध असू शकतात याची चर्चा या प्रकरणात करायची आहे.

वंश शब्दातील वर दाखवून दिलेल्या सन्दिग्धतेमुळे अनेक कुलांच्या झालेल्या पण फार प्राचीन काळी एकाच कुलातून उद्भवलेल्या जनसमूहाला प्रजाति हा शब्द वापरला पाहिजे.

**भूमीहर ब्राह्मण आहेत काय?**

कुले कोट्यवधि आहेत, पण प्रजाति हजारो किंबहुना शेकडो देखील आहेत असे कुणी मानत नाही. दहाच्या वर प्रजाति मानलेल्या नाहीत असे म्हणण्यास हरकत नाही.

तिसरा शब्द जाती हा आहे. जाती या मुळात व्यवसायावर अवलंबून असतात, पण बऱ्याच मोठ्या कालखंडात त्या जन्मसिद्ध असल्याचे नाकारता येत नसल्यामुळे जाती हा शब्द देखील प्रजाति या अर्थी वापरण्यात येतो. पण जाती काही कोटींची उलट प्रजाति अब्जांची देखील असू शकते.

आर्य हा शब्द वापरताना बहुतेक लोक ती एक प्रजाति आहे वा होती या अभिप्रायाने वापरतात.

आजकाल 'ब्राह्मण भारताबाहेरून आले' वगैरे जे शब्दप्रयोग केले जातात त्यात ब्राह्मण म्हणजे विशिष्ट जन्मसिद्ध शारीरिक गुणधर्म असलेला असा अर्थ अभिप्रेत असतो. ब्राह्मण

बाहेरून आले म्हणजे पुरोहित बाहेरून आले असा अर्थ नसतो. कोणताही समाज फक्त पुरोहितांचा असू शकत नाही. पौरोहित्य हा व्यवसाय आहे. समाजवादी लोकांना ब्राह्मणविरोध हा पुरोहितवर्गाच्या शोषतेविरुद्धचा 'पुरोगामी' लढा आहे असे वाटत असले तरी या चळवळीचा पौरोहित्याला मुख्यतः विरोध नसून ब्राह्मण या जातीलाच विरोध आहे. अलिकडच्या शिवधर्म चळवळीने 'ब्राह्मणांना शिवधर्मात स्थान राहणार नाही असे जाहीर केले आहे. ख्रिस्ती व इस्लाम हे धर्म ब्राह्मणांना मज्जाव करीत नाहीत. एवढेच नव्हे तर एके काळी ख्रिस्तीकरणाचे काम ब्राह्मणांपासूनच सुरू करावे असे मिशनऱ्यांचे मत होते.

ब्राह्मणेतर चळवळीचा पौरोहित्याला विरोध नाही कारण या चळवळीने ब्राह्मणेतर पुरोहित निर्माण केले आहेत. चेन्नईतील डी. एम. के. सरकारने तर ब्राह्मणेतरांना पौरोहित्य करता यावे असा कायदाच केला आहे. वस्तुतः अशा कायद्याची काहीच जरूर नव्हती. कारण ब्राह्मणेतर पुरोहिताला बोलावण्यास एखादा यजमान तयार असेल तर त्याला दुसरा कोणी आक्षेप घेत असल्याचे उदाहरण नाही. महाराष्ट्रात ब्राह्मणेतरांनी आपल्या जातीचे पुरोहित निर्माण केले होते व कोल्हापूरच्या महाराजांनी क्षात्र जगद्गुरू देखील नेमले होते.

ब्राह्मण हा शब्द प्रजाति या अर्थाने वापरणे मुळातच चूक आहे हे सहज सिद्ध करता येईल. या अर्थी हा शब्द वापरणाऱ्यांना माझे एक आवाहन आहे. त्यांनी भारताच्या कोणत्याही प्रांतात जाऊन सांख्यिकीच्या प्रातिनिधिक गट निवडण्याच्या पद्धतीने शंभर लोक निवडावे व त्यातले ब्राह्मण कोण आहेत व कोण नाहीत हे केवळ शारीरिक गुणधर्म विचारात घेऊन ओळखून दाखवावे, असे करणे अगदी डी. एन. ए. कसोटी वापरली गेली तरी - अशक्य आहे, कारण ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांच्या शारीरिक गुणधर्मात काहीच फरक नाही. तसे असते तर भूमीहर हे ब्राह्मण आहेत की नाहीत या बिहारी वादाचा निर्विवादपणे निर्णय करता आला असता.

केवळ ब्राह्मणच नव्हे तर कोणतीही जात केवळ शरीरपरीक्षेने ओळखता येत नाही. पेशवाईमध्ये 'प्रभु क्षत्रिय आहेत की नाहीत?' असा वाद निर्माण झाला होता. त्यावेळी शरीरपरीक्षा करून हा वाद सोडविता येईल असे कुणीही म्हटले नव्हते. आज डी. एन. ए. कसोटी उपलब्ध झाल्यावरही प्रभु कोण व क्षत्रिय कोण हे ओळखता येणार नाही. चार्वाकाचे खालील वचन प्रसिद्ध आहे.

**तुल्यत्वे वपुषा मुखाद्यवयवैर्वर्णक्रमः कीदृशः?**

मुखादि अवयव सारखेच असताना वर्ण व त्यांचा क्रम कसा ठरवावा?

अर्थात् ब्राह्मण बाहेरून आले म्हणजे मेन्दूसकट शरीराचे काही व्यवच्छेदक गुणधर्म अंगी असणारे लोक बाहेरून आले अशी ज्यांची समजूत असेल ते या विषयावर पूर्णपणे



अज्ञानी आहेत वा खोटारडे आहेत हे स्पष्ट आहे.

बिहारातले भूमीहर स्वतःला ब्राह्मण म्हणवितात पण इतर ब्राह्मणांना ते मान्य नाही. बिहारातील भूमीहर ब्राह्मण आहेत की नाहीत व महाराष्ट्रातील प्रभु क्षत्रिय आहेत की नाहीत या प्रश्नाला शारीरिक गुणधर्मांच्या आधारे उत्तर देता येत नाही. यांचा अर्थ जातिप्रमाणेच ब्राह्मण क्षत्रियादि वर्णही जन्मसिद्ध नाहीत हा आहे.

रक्त हा शब्द आनुवंशिकता या अर्थी पुष्कळ वेळा वापरण्यात येतो. मानवात चार प्रकारचे रक्त आहे (१) ज्यांना कुणाचेही रक्त दिले तरी चालते. त्यांचे रक्त मुक्त स्वीकारी रक्त असते. (२) दुसरे काही लोक असे असतात की ज्यांचे रक्त कुणालाही दिले तरी चालते. त्यांचे रक्त मुक्त दानी असते. (३) व (४) बाकीच्या दोन प्रकारच्या रक्तांना फक्त स्वतःच्या जातीचेच रक्त चालते.

**आनुवंशिक विशेष**

हे चार प्रकारचे रक्त असणारे लोक सर्वच देशात सापडतात. रक्त हा सर्वात आनुवंशिक असणारा शरीराचा घटक म्हणून प्रसिद्ध आहे. तरी सगळ्याच देशात सगळ्या प्रकारचे रक्त सापडते. पण एकूण लोकसंख्येमध्ये या रक्तगटांची वाटणी सारखी नसते. काही देशात रक्ताची विविधता जास्त तर काहीत कमी असते. रक्तमिश्रणाच्या आधारे ठरविलेले क्रमांक असे आहेत -

रक्तशुद्धतेच्या आधारे निरनिराळ्या लोकसमूहांचे क्रमांक

१. चीनी
२. मास्कोतील रशियन गोरे
३. हिंदू
४. हंगेरियन जिप्सी
५. पश्चिम आफ्रिकेतील नीग्रो
६. अमेरिकन गोरे
७. न्यू गिनीमधील मलेनीसियन
८. जर्मन
९. ऑस्ट्रेलियन आदिवासी
१०. अमेरिकेतील रेड इण्डियन

जे हिंदू जगातील अठरा पगड प्रजातींची संतती व 'समन्वित' संस्कृतीचे असे पं. नेहरू पाश्चात्त्यांचे अनुकरण करून १७ वर्षे सांगत आले, त्यांच्यापेक्षा रशियन गोरे व चीनी हे अधिक मिश्र आहेत.

रक्तगट फक्त रासायनिक तपासणीनेच कळतो. पण साधारणपणे जे गुणधर्म आनुवंशिक

समजले जातात ते उघड दिसून पडतात. आपण गुरखे, चीनी, नीग्रो वगैरे लोकांना पाहिल्याबरोबर ओळखतो पण रामकृष्ण हेगडे व माजी पंतप्रधान चंद्रशेखर समोर उभे राहिले असता हेगडे द्रविड व चंद्रशेखर आर्य असे कुणीही म्हणाले नसते.

आपण गुरखे, भारतीव व चीनी यांना ओळखतो ते उंची, नाकाचा आकार व त्वचेचा वर्ण या तीन शारीरिक गुणांच्या आधारे. हे गुण आनुवंशिक आहेत. अशा आनुवंशिक गुणांचा विचार करून रिस्ले यांने भारतात कोणत्या प्रजाति आहेत हे ठरविले.

यातील एक घोडचूक ही की मुसलमान हा धर्म असून ती प्रजाति म्हणून उल्लेखिली आहे. प्रजातींचे वर्गीकरण करताना वापरलेले गुणधर्म स्वच्छन्दीपणे निवडले आहेत. हेच गुणधर्म का निवडले याचे काही कारण दिलेले नाही. निवडलेले सात गुणधर्मदेखील सुसंगतपणे वापरलेले नाहीत. द्रविडांच्या चेहऱ्यावरील केस, मंगोलांचे डोळे व केस व इंण्डोआर्यन आणि तुर्को इराणियनयांचे केस याबद्दल यात काहीच माहिती नाही. या गुणधर्मांची या प्रजातींमध्ये काहीच वैशिष्ट्ये नाहीत असे समजायचे काय?

सीथोद्रविडांचे केस विरळ असल्याचे सांगितले आहे. ते सरळ की कुरळे हे सांगितलेले नाही. म्हणजे एकच गुणधर्म वापरताना वर्गीकरणाचे तत्त्व बदलले आहे. कुरळे सरळ व विरळ असे केसांचे वर्गीकरण करणे म्हणजे कादंबऱ्या, नाटके व विरळ पुस्तके असे वर्गीकरण करण्यासारखे आहे. हा संकर नावाचा प्राथमिक हेत्वाभास आहे.

फक्त मंगोलांच्या बाबतीत धनुष्याकृति भिवया व रुंद चेहरा याचा उल्लेख आहे आणि द्रविडांच्या केसांबद्दल काहीच उल्लेख नाही. एका गठ्ठ्यातील पुस्तके इंग्रजी आहेत व दुसऱ्या गठ्ठ्यातील जाड आहेत अशी माहिती सांगून त्या दोन गठ्ठ्यातील पुस्तकांची तुलना करण्यास सांगण्यासारखाच हा प्रकार आहे.

इण्डो आर्यनचे नाक ठळक असते असे सांगितले आहे. ठळकपणा हा फार सन्दिग्ध गुणधर्म आहे. ठळकपणा कसा मोजायचा?

व्यक्तींचे गुणविशेष जसे स्वच्छन्दीपणे निवडले आहेत तसेच या गुणधर्मांचे समायोजनही स्वच्छन्दीच आहे. ठेंगणेपणा, काळा वर्ण, कुरळे केस, काळे डोळे, लांब कवटी व लांब नाक हे द्रविड प्रजातीचे व्यवच्छेदक लक्षण सांगितले आहे. पण नेमके हेच संयोजन का घ्यायचे? द्रविड व आर्य यांच्या गुणधर्मांचे मिश्रण करून उंच बांध्याचे, काळ्या वर्णाचे, सरळ केसांचे, काळ्या डोळ्यांचे, लांब कवटीचे आणि निरुन्द पण ठळक नाकांचे लोक कल्पून त्यांची एक प्रजाति का मानू नये? असे लोक सापडणे काय अशक्य वा कठिण आहे? प्रत्येक विशेषाच्या असणे व नसणे या दोनच शक्यता आहेत असे मानले तरी सात विशेषांच्या १२८ प्रजाति होतात. पण आनुवंशिक गुणधर्म फक्त सातच नसून दोनशेच्या जवळपास आहेत.



## व्यक्ती मूठभर, वर्ग ढीगभर

म्हणजे २०० २ (म्हणजे २ वर २००चा घात) इतक्या प्रजाति होऊ शकतात इतके लोकच जगात नाहीत व अस्तित्वात असलेले लोक घेतले तरी कोणत्याही दोन व्यक्ती एका प्रजातीत घालता येणार नाहीत असाही संभव आहे.

प्रजाति या संकल्पनेला काही अर्थ असलाच तर निदान कोणत्याही दोन व्यक्ती घेतल्या तर त्या एकाच प्रजातीच्या आहेत की भिन्न प्रजातीच्या हे सांगता आले पाहिजे. असे सांगता येत नसेल तर प्रजातिकल्पना अर्थशून्य आहे असे म्हणावे लागेल. सारे दोनशे गुणधर्म न घेता काही गुणधर्म घेतले तर कोणत्याही दोन व्यक्ती समान गुणधर्म बुद्ध्या निवडून एकाच प्रजातीच्या व बुद्ध्या असमान गुणधर्म निवडून भिन्न वंशाच्या म्हणता येतील.

शिवाय किती विशेष समान असले की दोन व्यक्तींना एका प्रजातीचे म्हणायचे? वरील तालिकेत द्रविडांचे मंगोल द्रविडाशी दोन, द्रविड व आर्य/द्रविड यांच्याशी एक, सीथो द्रविड व द्रविड यांच्याशी शून्य, मंगोलांशी एक, इण्डोआर्यांशी दोन आणि तुर्को इराणियांशी एक गुणधर्म समान आहे. म्हणजे सीथोद्रविड यांच्याशी एकही गुणधर्म समान नसून दोघेही द्रविड म्हटलेले आहेत. मंगोल द्रविड व आर्य द्रविड यांच्यात दोनच गुणधर्म समान असून त्यांना द्रविड म्हटले आहे. द्रविड व इण्डोआर्य द्रविड यांच्यात देखील दोन गुणधर्म समान आहेत. मग द्रविडांना इण्डोआर्यद्रविड का म्हटले नाही?

राजपूत व जाट यांना इण्डोआर्य म्हटले आहे. याचा अर्थ असा होतो की राजपूत व जाट यांचे पूर्वज वैदिक काळात देखील भारताचे रहिवासी होते. काही प्रजातिवादी राजपूत व जाटांना हूण व शक यांचे वंशज मानतात. त्यामुळे केवळ शरीररचनेवरून अनुमाने काढण्यापेक्षा त्याबरोबरच इतिहासाचाही विचार केला नाही तर याबाबतीतले सिद्धान्त अपुऱ्या आधारावर उभारलेले आहेत या आक्षेपास अवसर मिळतो.

तथाकथित प्रजातींचे आधुनिक निवासस्थान उल्लेखिलेले आहे. हे केवळ अनुमान-धपक्याने केले आहे. सेनाधिकाऱ्याची निवड करताना सगळ्यांना एकच पोषाख देण्यात येतो व चर्चेसाठी टेबलाभोवती बसविले जाते. त्यांची नावे माहिती नसताना व ते बोलू लागण्याच्या आधी ते कोणत्या प्रांतातून आलेले आहेत हे ओळखणे अशक्य असते. नावे व इंग्रजी बोलण्यातील उच्चार यावरून भारतीयाचा प्रान्त ओळखता येतो. केवळ दर्शनाने नाही.

बंगाल्यांच्या चेहऱ्यावर तमिळपेक्षा जास्त केस असतात याबद्दल पुष्कळांना संदेह वाटेल.

सीथोद्रविड पश्चिम किनाऱ्यावर राहतात व ते गोरे असतात असे म्हटले आहे. महाराष्ट्रीय

ब्राह्मण, कुणबी व कूर्गी एका प्रजातीत अंतर्भूत केलेले आहेत. हे लोक गोरे आहेत हे विधान पुष्कळांना मान्य होणार नाही. रिस्लेचे नमुने प्रातिनिधिक नाहीत हे उघड आहे.

वैदर्भीय लोकांना नुसते द्रविड व पश्चिम महाराष्ट्रातल्या लोकांना सीथोद्रविड म्हटले आहे. लो. टिळक, चिं. वि. वैद्य, ना. गो. चापेकर हे लोक स्वत:ला वैदिक आर्य समजत. आपले पूर्वज अनार्य व वैदिकांचे शत्रू होते हा शोध वाचून त्यांना धक्काच बसला असता.

एकेकाळी लम्बशीर्षक व रुन्दशीर्षक हा भेद निर्णायक समजण्यात येत होता. पण या निकषाप्रमाणे पश्चिम आफ्रिकन काळे व स्कॅण्डिनेव्हियन गोरे यांची प्रजाति एकच ठरते हे लक्षात आल्यापासून या निकषाची कोणी गोष्टच काढत नाही.

युरोपातून भारतात गोऱ्या कातडीच्या लोकांचे स्थलांतर झाले असे सिद्ध करण्यास दृष्ट गुणधर्म व जनक गुणधर्म हा फरक वापरण्यात येतो.

### हिमनगाचा बुडालेला भाग

भारतात देखील गोरे लोक आहेत. पण त्यांच्यात काळ्या सन्ततीला जन्म देणारी जनुके असतात म्हणून ते दृष्ट गोरे आहेत. पण युरोपीय लोकांत काळ्या मुलांना जन्म देणारी जनुके नसतातच. त्यामुळे ते जनक गोरे म्हणवितात. मूळच्या गोऱ्यातूनच काळसर सन्ततीला जन्म देणारे गोरे उत्पन्न होऊ शकतात. त्याअर्थी भारतीय गोऱ्यांचे मूळ युरोपात आहे असा हा युक्तिवाद आहे.

पण हा युक्तिवाद खरा ठरण्यासाठी सारे दोनशे आनुवंशिक गुंणधर्म तपासून त्यापैकी बहुतेक युरोपात शुद्ध स्वरूपात व भारतात मिश्र स्वरूपात सापडतात असे सिद्ध होणे आवश्यक आहे.

दुसरे असे की मिश्र जनुकातून शुद्ध जनुक निघू शकत नसले तर मिश्र जनुक हेच मूळ असू शकतात. मिश्र जनुक असलेले भारतीय शुद्ध गोरी व शुद्ध काळी जनुके असलेल्या जोडप्यांची अपत्ये आहेत असा नियम करता येत नाही. ते मुळातच मिश्र असू शकतात.

शिवाय त्वचेचा वर्ण पूर्णपणे आनुवंशिक नाही. उन्हापासून त्वचेचे रक्षण करण्यासाठी त्वचेवर मायलिन नावाचे काळे द्रव्य तयार होते व मुळात गोरा असलेला माणूस काळा दिसू लागतो. हा अर्जित गुणधर्म आहे व त्यामुळे तो आनुवंशिक असू शकत नाही असे म्हणता येत नाही. अर्जित गुणधर्म आनुवंशिक होऊच शकत नसते तर योनिविकास म्हणजे evolution of species झालेच नसते.

१०००० वर्षांपूर्वी सांगाड्यावरून पूर्वी कधी काळी शुद्धवंशी लोक होते असा पुरावा सापडत नाही.

आनुवंशिक गुणांची संख्या दोनशेच्या घरात आहे. ज्या गुणधर्मांच्या आधारे आपण गुरखा, नीग्रो व युरोपीय यांना ओळखतो ते डोळ्यांना सहज दिसू शकणारे गुणधर्म आहेत.



पण बहुतेक आनुवंशिक गुणधर्म केवळ पाहून ओळखता येत नाहीत. उदाहरणार्थ मानवात चार प्रकारचे रक्त असते. आपण ज्यांना गुरखा, नीग्रो व युरोपीय म्हणतो त्या लोकांचा रक्तगट कोणता हे आपल्याला त्यांच्याकडे पाहून कळू शकत नाही. असे केवळ पाहून न कळणारे शेकडो विशेष आहेत. फक्त नाकालाच आकार असतो असे नाही. शरीराच्या सर्वच हाडांना विशिष्ट आकार असतो. पण शरीराच्या आत असलेली हाडे क्ष किरणांच्या मदतीशिवाय दिसत नाहीत. तरी या हाडांचा देखील आकार आनुवंशिक असतो. नाकाने चपटे व ठेंगणे म्हणून आपण काही लोकांना गुरखे ठरविले. पण क्ष किरणांनी शरीराच्या सर्वच हाडांच्या आकाराचे चित्र काढले तर काही गुरख्यांची काही हाडे नीग्रोसारखी व काहींची युरोपीयांसारखी असतील. मग या गुरख्यांनाही केवळ नाकाच्या आकारावरून बाकी हाडांचे आकार वेगळे असतानाही चपट्या नाकाच्या गुराख्यांच्या वंशात टाकणे कितपत समर्थनीय आहे?

शिवाय फक्त हाडांनाच आकार असतो असे नाही. पोटालाही आकार असतो व तो पोटावरील मासाच्या व चर्बीच्या संनिवेशाचा आकार असतो. तो पूर्णपणे आनुवंशिक नसला तरी आनुवंशिकतेचा त्यात अंश असतोच.

बाहेर न दिसणाऱ्या पण अस्थिमय नसणाऱ्या मूत्रपिण्ड, हृदय वगैरे अवयवांनाही आकार असतो व तो व्यक्तिगणिक वेगळा असतो. या सगळ्याच आकारांच्या बाबतीत एक गुरखा दुसऱ्या गुरख्यांसारखाच असण्याचा संभव नाही. काही गुरखे नीग्रोसारखे व काही युरोपीयांसारखे असू शकतात. तेव्हा गुरखे व नीग्रो वेगळे ओळखू येतात म्हणून त्यांच्या प्रजाति वेगळ्या हे म्हणणे सयुक्तिक नाही. कारण क्ष किरणांनी सगळ्या अवयवांचे आकार ठरविले तर गुरखे व नीग्रो इत्यादी वर्गीकरणे पार चूक ठरतील.

आकार हा भौमितिक गुणधर्म झाला. आकाराव्यतिरिक्त भौतिक व रासायनिक गुणधर्मदेखील असतात. एकूणच व्यक्तीव्यक्तीत आनुवंशिक भेद करणारे गुणधर्म सध्यातरी पूर्णपणे परिगणित करण्यात आलेले नाहीत.

हे आनुवंशिक गुणधर्म एकमेकाहून स्वतंत्र आहेत. याचा अर्थ एका गुणधर्मावरून दुसऱ्या गुणधर्माचे अनुमान करता येत नाही.

### वर्गविश्लेषण व प्रजाति

एखादा मनुष्य गोरा आहे यावरून त्याचे नाक चपटे आहे की धारदार, त्याचे डोळे काळे, घारे की निळे, त्याचे केस काळे, भुरे की निळे, कुरळे की सरळ हे काहीच सांगता येत नाही.

गुणधर्म केवळ विशेषणाने न सांगता त्याचे मापन केले तरी असे अनुमान काढता येत नाही. म्हणजे अ हा नुसता गोरा आहे असे न म्हणता तो किती गोरा आहे व त्याचे नाक

चपटे आहे असे न म्हणता किती चपटे आहे याचे मापन केले तर जास्त गोऱ्या माणसाचे नाक जास्त चपटे असते की कमी हे सांगता येत नाही. पिवळसर रंगाच्या चीनी लोकांचे नाक चपटे असण्याचा संभव जास्त असला तरी भारतातले त्यांच्याएवढेच पिवळे लोक घेतले तर त्यांचे नाक चपटे आढळेल असे नाही. म्हणजे चपटे नाक व पिवळा वर्ण यांचे साहचर्य एका विशिष्ट प्रदेशात सापडते, जगातील लोकांचा प्रातिनिधिक गट घेतला तर असे साहचर्य सापडणार नाही.

अमुक माणूस ओळखण्यासाठी आपण जे गुणधर्म निवडतो ते आनुवंशिक असले तरी मुद्दाम निवडलेले असतात. आनुवंशिक गुणधर्माबरोबरच अशा गुणधर्मांचा - विशेषतः निवासस्थान, भाषा वगैरेंचाही समावेश होतो. तेव्हा अमुक समुहाचे लोक वेगळे ओळखू येतात याचा अर्थ ते वेगळ्या प्रजातीचे आहेत असा नाही, युरोपात फिरून आल्यावर चीनमध्ये फिरताना तिथले लोक युरोपातील लोकांपेक्षा कसे वेगळे आहेत ते पाहण्याचा आपला उद्देश असतो. ते सारखे कसे आहेत हे मुद्दाम पाहण्यासाठी आपण त्यांचे निरीक्षण केले तर सारखे आनुवंशिक गुणधर्म देखील आढळू शकतील.

आनुवंशिक गुणधर्म एकमेकांहून स्वतंत्र म्हणजे साहचर्यशून्य आहेत म्हणून कोणत्या दोन व्यक्तींची प्रजाति एकच आहे असे म्हणण्यासाठी त्यांचे सर्वच गुणधर्म सारखे असले पाहिजेत. काही गुणधर्म सारखे व काही वेगळे असतील तर त्यांची प्रजाति एक कशी मानता येईल ?

दोनशे आनुवंशिक गुणविशेषात जर साहचर्याङ्क असेल म्हणजे एकावरून दुसऱ्याचे अनुमान करता येत असेल तर त्याच्यामधील साहचर्याचे मापन करणारा एक साहचार्यक म्हणजे Correlation Coefficient काढता येतो. दोनशे गुणधर्मात (२००+१९९)/२ = १९९०० इतके साहचार्यांक असतात. या सर्वांचे वर्गविश्लेषण केल्याने या साहचर्याची उपपत्ति लावायला किती वर्ग कल्पावे लागतात याचे गणित करता येईल. पण सध्या तरी आनुवंशिक गुणधर्मात वर्गविश्लेषण करता येईल इतक्या प्रमाणात साहचर्याङ्क सापडलेले नाहीत.

मानवाचे आठ दहा प्रजातीमध्ये वर्गीकरण करायचे असेल तर डोळ्यांना दिसणाऱ्या आनुवंशिक विशेषांच्या आधारे ते करता येणार नाही. शिवाय सर्व वा बव्हंश आनुवंशिक गुणधर्म समान असतील तरच दोन प्रजाति एक मानाव्या असा नियम केला तर भिन्न अण्डातून जन्मलेल्या जुळ्यांची देखील प्रजाति एक ठरणार नाही. अशा जुळ्यात देखील दोनशे आनुवंशिक गुणधर्मांपैकी पुष्कळसे भिन्न राहणारच. हल्ली पितृत्व वा मातृत्व ठरविण्यासाठी द्विकेंद्रिय आम्लाचा म्हणजे डी.एन्.ए. चा उपयोग केला जातो. पण या पद्धतीने कुळ ठरले तरी जाति व प्रजाति ठरू शकत नाही. त्यासाठी बी जनुक gene B



उपयोगी पडू शकते. या जीन बीवर पुष्कळसे आनुवंशिक गुणधर्म अवलंबून आहेत. उत्तर भारतात या बी जनुकाचे वितरण २५ ते ३० टक्के आहे, मध्य भारतात २० ते २५ टक्के आहे व दक्षिण भारतात १५ ते २० टक्के आहे. यावरून उत्तर भारतातून दक्षिण भारतात लोकांचे प्राचीन काळी स्थलांतर झाले हे निर्विवाद आहे. हेच प्रमाण उत्तर चीन व दक्षिण चीन आणि उत्तर एशिया व दक्षिण एशिया यात आहे. रशियात हे प्रमाण १५ ते २० टक्के व युरोपात ५ ते १० टक्के आहे. म्हणजे उत्तर एशियातून व उत्तर भारतातून रशिया व रशियातून युरोपामध्ये स्थलांतर झाले. ग्रेट ब्रिटन, उत्तर व दक्षिण अमेरिका व ऑस्ट्रेलिया यात ० ते ५ टक्के प्रमाण आहे यावरून या भागात स्थलांतर सगळ्यात शेवटी पश्चिम युरोपातून झाले या इतिहासात ज्ञात असलेल्या घटनेचीच पुष्टी होते.

अफ्रिकेत उत्तर पश्चिमेकडून दक्षिणेकडे व शेवटी उत्तर अफ्रिकेच्या मध्य भागात स्थलांतर झाले.

वरील शोधावरून युरोपातून भारतात स्थलांतर झाले ही कल्पना पूर्णपणे निराधार असून उत्तर भारतातून रशियात, रशियातून पूर्व युरोपात, पूर्व युरोपातून पश्चिम युरोपात व पश्चिम युरोपातून अमेरिकेत स्थलांतर झाले असे आधुनिक जननशास्त्राच्या आधारे म्हणावे लागते. (अमेरिकन विश्वकोशलेक्सिकॉन) पश्चिम युरोपातून ऑस्ट्रेलियात स्थलांतर झाले हे मात्र या प्रमाणावरून कळणार नाही. त्यासाठी इतिहासाचाच आधार घ्यावा लागेल..

प्रकरण- ३

# खरेच आर्यांनी आक्रमण केले होते ?

अठराव्या शतकात रॉबर्ट नोबिली नावाचा एक मिशनरी दक्षिण भारतात आला. त्याने भारतीयांचे ख्रिस्तीकरण करण्यासाठी एक वेगळी पद्धत वापरली. येशूवेद नावाचा एक वेद त्याने स्वतःच रचला व हाच खरा वेद आहे, ब्राह्मण जो सांगतात तो खरा वेद नव्हे असा प्रचार सुरू केला व आपला वेद खरा म्हणून शिकविण्यास सुरुवात केली. या येशूवेदात ख्रिस्ती धर्माचे शिक्षण होते. नोबिलीच्या पाठशाळेत शिकणारे विद्यार्थी हा वेद वाचून ख्रिस्तोपासक झाले व चर्चमध्ये जाऊ लागले. पण येशूवेदाच्या निमित्ताने नोबिली विद्यार्थ्यांना संस्कृत विद्येचे शिक्षण मिळाले व त्यांनी संस्कृतमधील इतर ग्रंथही वाचले व त्यामुळे कीर्तन/प्रवचनातून झालेला त्यांच्या मनावरील श्रुतिस्मृतिपुराणांचा परिणाम नाहीसा झाला नाही. ते रविवारी चर्चमध्ये जायचे व इतर दिवशी देवळात जायचे. त्यामुळे मिशनऱ्यांचा धर्मप्रसाराचा मूळ उद्देश सफल झाला नाही व धर्मांतर करविण्याची ही पद्धती टाकून देण्यात आली.

ही पद्धती वापरण्यात असे गृहित धरले होते की ब्राह्मण हेच हिंदू समाजाचे नेते आहेत. त्यांनाच जर बाटविले तर बाकीचा समाज आपोआपच बाटेल. पाठशाळेत जाणारे ब्राह्मणच असतात असे नोबिलीने गृहित धरले. पण महात्मा गांधींच्या प्रेरणेने शिक्षणक्षेत्रात काम करणारे धर्मपाल यांनी आपल्या The Beautiful Tree या ग्रंथात ब्रिटिशपूर्व भारतीय शिक्षणाचा जो वृत्तांत सांगितला आहे यावरून नोबिलीचा ग्रह पूर्णपणे खरा नव्हता असे म्हणावे लागते. येशूवेद सोडून बाकीचे शिक्षण संस्कृत पाठशाळेसारखेच असल्यामुळे या शिक्षणाच्या आधारे ख्रिस्तीधर्म स्वीकारणाऱ्यांच्या मनात हिंदू धर्माचा तिरस्कार उत्पन्न होऊ शकला नाही. पण ब्राह्मणांनी खोटे वेद लिहून समाजाला आजपर्यंत फसविले या प्रचाराचा परिणाम झाला असलाच पाहिजे. दक्षिण भारतात ब्राह्मण द्वेषाचे बीज नोबिलीने पेरले असे म्हणण्यास हरकत नाही.

काल्डवेल नावाचा दुसरा एक मिशनरी यानंतर दक्षिण भारतात आला. त्याने तमिळचा अभ्यास केला. कारण जी भाषा लोकांच्या बोलण्यातली आहे तिच्या द्वारेच धर्मांतर केले तर जास्त मोठ्या प्रमाणावर करता येईल असे त्याला वाटले. त्याने तामिळ भाषेचे एक व्याकरण लिहिले व ती संस्कृतोद्भव भाषांपेक्षा वेगळी अशी द्रविड भाषा आहे असे मत मांडले.

याच कल्पनेचा विस्तार करून पाश्चात्य भाषाशास्त्रज्ञांनी दक्षिणेतल्या तमिळ, कन्नड, तेलगू व मल्यालम् या भाषा संस्कृतपासून वेगळ्या कुळातल्या आहेत, हे कुळ म्हणजे द्रविड कुल आहे. संस्कृत भाषा भारतावर स्वारी करणाऱ्या आर्यांची भाषा होती, त्यांनी



ज्यांच्यावर स्वारी केली ते दक्षिण भारतीयांची मूळ भाषा जी द्रविड ती बोलत होते. आर्यांनी या द्रविडांच्या कत्तली करून त्यांना उत्तर भारतातून दक्षिण भारतात हाकलून दिले असा इतिहास रचला.

एकूण या सर्व कथेच्या मुळाशी दक्षिणेतील भाषा वेगळ्या कुळातल्या आहेत ही कल्पना होती. आर्याक्रमणवाद्यांनी कल्पिलेल्या इण्डोयुरोपीय भाषेत त्यांनी इंग्रजीचा समावेश केलेला आहे. पण तमिळचा नाही. म्हणजे इंग्रज हे उत्तर भारतीय आर्यांचे सहोदर पण दक्षिण भारतीय हे अनार्य द्रविड असा विचार दृढमूल झाला. या विचारातूनच पुढे 'आमची भाषा व संस्कृति ही उत्तर भारतीयांपेक्षा वेगळी आहे, म्हणजे आम्ही या भारतीय राष्ट्राचे घटक नाही' ही भाषा सुरू झाली. यांत आम्ही म्हणजे तमिळाबरोबरच आंध्र कर्नाटक व केरळीयही सामिल आहेत असे या द्रविडिस्तानच्या पुरस्कर्त्यांचे म्हणणे आहे. पण आमचे राष्ट्र उत्तर भारतीयांपेक्षा वेगळे आहे हा विचार तमिळनाडू सोडून इतरत्र रुजला नाही. हिंदी आवश्यक करणारे त्रिभाषासूत्र फक्त तमिळनाडूने अमलात आणले नाही. गेल्या पन्नास वर्षांपासून बाकीच्या दक्षिण भारतीय राज्यांत ते सुरू आहे व त्याने समग्र भारताला समानभाषा देण्याचे स्वप्न साकार होऊ शकते अशी आशा निर्माण केली आहे. तमिळनाडूमध्ये तमिळ भाषा संस्कृतोद्भव नाही यावरून ब्राह्मणेतरवाद निर्माण होण्याचे कारण नव्हते. कारण तमिळ ही तमिळनाडूतील ब्राह्मणेतरांप्रमाणेच ब्राह्मणांचीही भाषा आहे. तमिळनाडूतील ब्राह्मण मोठ्या प्रमाणावर संस्कृतचे अध्ययन करीत. त्यामुळे ब्रिटिश काळात ब्राह्मण हे तमिळ राष्ट्राचे घटक नाहीत असे म्हणण्यास आधार सापडला.

## इण्डोयुरोपीय भाषा

ब्राह्मणेतरवाद तमिळनाडून जेवढा तीव्र आहे तेवढा आंध्र, कर्नाटक आणि केरळमध्ये नाही. केरलमध्ये तो सगळ्यात कमी आहे. कारण तेथील ब्राह्मणेतरांचा नायर हा समाज उत्तर प्रदेशातील कायस्थाप्रमाणेच पुढारलेला आहे. त्याला ब्राह्मणांचा मत्सर वाटण्याचे कारण नाही. तेथील मातृसत्ताक विवाहपद्धतीमुळे स्त्री सासरी जात नाही. पुरुषच तिला भेटायला येतो व जातो. स्त्रीने पुरुषाचे जोडे घराबाहेर ठेवले की त्याला त्या घरात शिरण्याची मनाई होते. अशा प्रकारे नवरा बदलणे सहज शक्य असल्यामुळे तेथील ब्राह्मणेतरांना आपल्यात ब्राह्मणी रक्त नाही असे म्हणणे शक्य नाही. केरळमध्ये शंकराचार्य हा अखिल भारतीय पुरुष झाला व शंकराचार्यांचे अवतारकृत्य वैदिक धर्माची स्थापना हे असल्यामुळे वेद, ब्राह्मण वगैरेंचे द्वेष या भावनांना तेथे इतर दक्षिण प्रान्तांच्या मानाने कमी वाव मिळाला. या भावना हे दक्षिणीय भाषांचे मूळ संस्कृतेतर आहे या कल्पनेतून उद्भवल्या असल्यामुळे ही कल्पना कितपत साधार आहे याची चर्चा केली पाहिजे.

इण्डोयुरोपीय या नावाखाली संस्कृत बरोबरच ज्या भाषांचा समावेश आहे त्यांच्यात खालील साम्ये आहेत असे सांगण्यात येते.

१. या वर्गातील भाषांमध्ये समान धातू सापडतात. धातू म्हणजे वाक्यात वापरल्या जाणाऱ्या पदांचे मूलभूत रूप. या स्वरूपातील धातूंना प्रत्यय व उपसर्ग लावून त्यांना वाक्यात वापरण्यास योग्य केले जाते. उदाहरणार्थ 'जा' या धातूपासून जाणे, जाणारा, जाईल वगैरे वाक्यात वापरता येणारी पदे होतात. जा हे आज्ञार्थक वाक्यात वापरले जाऊ शकते. पण हे कार्य करणाऱ्या जा या ध्वनीला धातू म्हणत नाहीत. धातूवर उपसर्ग प्रत्यय वगैरेंनी संस्कार केल्याशिवाय इण्डो युरोपीय भाषात वाक्यात वापरण्यासारखी पदे तयार होत नाहीत.

२. उपसर्ग, प्रत्यय वगैरे लागल्यामुळे धातूत होणारे बदल या भाषांमध्ये सारखेच आहेत.

३. सर्वनामे, संख्यावाचके आणि नातेवाचक शब्द समान आहेत. हे शब्द दुसऱ्या भाषेशी संबंध आला तरी बदलत नाहीत.

इण्डोयुरोपीय भाषेची वरील लक्षणे वाचून संस्कृत व इंग्रजी यांचा उगम समान आहे हे म्हणणे कितपत टिकते ते पाहू.

१. इंग्रजीमध्ये पाच लाख शब्द आहेत. यापैकी २५००० पेक्षा जास्त शब्दांचे धातू संस्कृत धातूशी समान नाहीत. उदाहरणार्थ Come, dirnk, read, send वगैरे शतशः शब्दांचा संस्कृत धातूशी संबंध जोडणे कठीण जाईल. या शब्दांचे संस्कृत पर्याय आयाहि, पिब, वाचय, प्रेषय वगैरे आहेत. यांचा व इंग्रजी शब्दांचा संबंध काय?

२. इंग्रजीची नामे व क्रियापदे धातूपासून बनत नाहीत वर उल्लेखिलेली इंग्रजीची क्रियापदे कोणत्या धातूपासून बनलेली आहेत? तसेच पितृ, वगैरे संस्कृत शब्दाशी सहोदर म्हणून सांगितले जाणारे इंग्रजी शब्द कोणत्या इंग्रजी धातूपासून झाले आहेत?

३. फादर या शब्दाला ली प्रत्यय लावून फादरली होते. संस्कृतमध्ये असा प्रत्यय लावून पितृतुल्य वगैरे शब्द होत नाहीत. तुल्य हा प्रत्यय नसून शब्द आहे.

४. इंग्रजीची सर्वनामे he, she, it, the ही आहेत. संस्कृतची सः सा तद् आणि ते हे समान आहेत. he she it the व सः, सा, तद्, ते यात फक्त ते व they यांचे साम्य आहे. जर सा आणि she मधील स आणि श यांच्या साम्यावरून संस्कृत व इंग्रजी यांची ही सर्वनामे एका कुळातली मानली तर मग संस्कृतचे अहम् आणि तमिळचे यान आणि नान् यात अनुनासिक समान आहे व तमिळ या व संस्कृत वयम् मध्ये य व म समान आहेत म्हणून तमिळ व संस्कृतची सर्वनामे एका कुळातली का मानू नयेत?

तात्पर्य इंग्रजी इण्डोयुरोपीय असेल तर संस्कृत इण्डोयुरोपीय नाही.

दुसरे असे की धातूची समानता एका भाषेने दुसऱ्या भाषेपासून शब्द उसने घेतल्याने देखील निर्माण होऊ शकते. मराठीत इंग्रजीचे शेकडो शब्द आले आहेत. उदाहरणार्थ पास, स्टेशन, मॅच, बस, हॉटेल, मोटार, स्टोव्ह, ड्रायव्हर, मैल, टायर, ट्रक, टेबल.



इत्यादि. आजकाल मराठी वृत्तपत्रांनी इतके इंग्रजी शब्द वापरायला सुरुवात केली आहे की इंग्रजी न शिकलेल्या माणसाला हे मराठी कळू शकणार नाही. इतक्या इंग्रजी शब्दावरून मराठी इंग्रजीपासून निघाली आहे असे म्हटले तर ते बरोबर होणार नाही. कारण मराठी इंग्रजीपेक्षा प्राचीन आहे हे आपल्याला माहीत आहे. असे म्हणण्यात येते की केवळ शब्द उसने घेतले जातात पण त्यापासून होणारी रूपे स्वतःच्या भाषेप्रमाणेच होतात. पण हे खरे नाही. मराठीत कोणीही बसा हे बसचे अनेक वचन, मॅचा हे मॅचचे अनेक वचन करीत नाही.

जिव्हाळ्याच्या कौटुंबिक नात्यांचे शब्द कोणीही दुसऱ्या भाषेपासून घेणार नाही व म्हणून मदर व मातृ आणि फादर व पितृ या शब्दांचा एक तिसराच समान उगम आहे हे अनुमान तर डॅडी/मम्मी संस्कृतीने धडधडीत असत्य ठरविले आहे. आपण 'काला आदमी' नसून साहेब आहोत असे वाटावे म्हणून या शब्दाचा वापर करण्याची प्रवृत्ती जास्तच प्रबल असू शकते. मराठी संख्यावाचके तर शहरातून लुप्तच झाली आहेत. फेरीवाले देखील आपल्या किमती इंग्रजीत सांगतात. सर्वनामे उसनी घेतली जात नाहीत हे म्हणणे सगळ्यात खरे आहे. 'ही गेला' 'शी आली' असे अजून तरी कोणी म्हणत नाही. पण तथाकथित इण्डोयुरोपीय भाषांची सर्वनामे तरी एक कोठे आहेत?

## इण्डो युरोपियन भाषेची पुनर्रचना

इण्डोयुरोपियन भाषाच्या स्वरूपाबद्दलचे वरील वर्णन वाचूनच आज इण्डोयुरोपिअन म्हणून मानल्या गेलेल्या भाषांच्या आधारे मूळ इण्डोयुरोपीय भाषेची पुनर्रचना करण्याचा जो खटाटोप पाश्चात्त्य भाषाशास्त्रज्ञांनी केला आहे, त्याचे वैय्यर्थ्य स्पष्ट होते. एका सभेतील सर्व लोक एका कुटुंबातील आहेत असे आनुवंशिक नसलेल्या गुणधर्मांच्या आधारे मानले व मग त्या एका कुटुंबाचे वांशिक गुणधर्म निश्चित करण्याचा प्रयत्न केला तर ते गुणधर्म स्वच्छन्दी व जितके ठरविणारे आहेत तितक्या प्रकारचे ठरतील.

या बाबतीतली दुसरी अडचण अशी की भाषेत होणारे बदल अमुकच क्रमाने होतात असे नाही. मॅक्समूलर म्हणतो की भाषेतील बदल चक्राकार असतात. संश्लेषणात्मक भाषा विश्लेषणात्म होतात व विश्लेषणात्मक भाषा संश्लेषणात्मक होतात. विश्लेषणात्मक भाषा म्हणजे ज्या भाषेतील प्राकृतिक शब्द व त्याला लागणारे प्रत्यय वा उपसर्ग हे काही परिवर्तन न करता वापरले जातात. उदाहरणार्थः

इंग्रजी ही विश्लेषणात्मक भाषा व मराठी ही संश्लेषणात्मक भाषा आहे. व्हौश या शब्दाची सप्तमी in the home व पंचमी from the home अशी होईल. पण मराठीत घर या शब्दाची सप्तमी घरात व पंचमी घराहून अशी होईल. म्हणजे घर शब्दाचे घरा होईल व आत याचे नुसते त राहील व हून हा प्रत्यय दुसऱ्या कोणत्या शब्दाला न जोडता स्वतंत्रपणे वापरला तर त्याचा काहीच अर्थ होणार नाही. उलट इंग्रजीतील in from हे

शब्द स्वतंत्रपणे वापरले तरी त्यांचा अर्थ कायम राहतो. मॅक्समूलरचे म्हणणे असे की मराठीसारख्या भाषा हळू हळू विश्लेषक होतील. व मूळ इंग्रजी संश्लेषणात्मक असली पाहिजे. इंग्रजी व मराठी यांच्या मुळापर्यंत शोध घेत गेले तर हे विधान खरे आढळेल काय या वादात शिरण्याचे कारण नाही. मॅक्समूलरच्या या मताप्रमाणेच इंग्रजी व संस्कृत या एका कुळाच्या मानून त्यांच्या मुळाचा शोध घेणे व्यर्थ आहे. कारण संस्कृतचे मूळ विश्लेषणात्मक व इंग्रजीचे संश्लेषणात्मक असले पाहिजे.

तेव्हा जर कोणती गोष्ट निश्चित असेल तर ती ही की इण्डो युरोपियन म्हणविल्या जाणाऱ्या भाषांचे कोणतेही मूळ स्वरूप भाषेत होणाऱ्या ज्ञात फरकांच्या आधारे ठरविता येणार नाही. त्यांच्यात जे साम्य आहे ते परस्परापासून देवाणघेवाण झाल्यामुळे आले आहे. कोणत्या भाषेची मूळभाषा कोणती होती यावरून नाही.

इण्डोयुरोपियन भाषेचे मूळ स्वरूप ठरविण्यात दुसरी अडचण ही आहे की इण्डोयुरोपीय भाषा ५० च्या घरात आहेत. इण्डोयुरोपीय भाषेचे मूळ स्वरूप ठरवू पाहणाऱ्या कोणत्याही भाषाविदाने या सगळ्या पन्नास भाषांचा विचार करून इण्डोयुरोपीय भाषेचे स्वरूप ठरविले नाही. ग्रीक, लॅटिन, संस्कृत वगैरे तीन चार भाषांच्या आधारेच हे स्वरूप ठरविले जाते. त्यामुळे या तोटक्या आधारावर इण्डो युरोपीय भाषेचे मूळ स्वरूप ठरविणे अशक्य आहे हे बरोने कबूल केले आहे.

पण हे कबूल करूनही बरोने इण्डोयुरोपीयभाषी युरोपातून भारतात आले असे मानण्यासाठी एक विचित्र युक्तिवाद केला आहे. तो म्हणतो -

युरोपातील भाषा इण्डोयुरोपीय कुलातील असल्या तरी एकमेकापासून बऱ्याच भिन्न आहेत. उलट उत्तर भारतातील भाषा एकमेकाशी अधिक समान आहेत. भाषा आपल्या मूल स्थानाच्या दूर गेली की एकरूप राहण्याची तिची प्रवृत्ती असते. उलट ती आपल्या मूल स्थानी असली की तिच्यात बहुरूपता निर्माण होते.

माझ्या पामर बुद्धीला हा युक्तिवाद अनाकलनीय आहे. भाषा मूलस्थानातच जास्त एकरूप राहू शकते व मूलस्थानापासून जितकी दूर जाईल तितकेच तिच्यावर मूलस्थानापेक्षा भिन्न असे प्रभाव पडून तिच्यात बहुरूपत्व येईल हे उघड आहे. बरोच्या युक्तिवादावरून भारत हेच इण्डोयुरोपीय भाषेचे मूलस्थान ठरते.

युरोपीय भाषांची स्थिती आग्नेय आशियातील भाषांसारखी आहे. आग्नेय आशियातील भाषांत बरेच संस्कृत शब्द आहेत. भाषा इण्डोनेशिया हे इण्डोनीशियन भाषेचे नाव आहे. तेथे वाहने थांबण्याच्या जागेला वाहनस्तम्ब म्हणतात. थायलॅण्डमध्ये दूरभाषला दूरशब्द म्हणतात. असे असले तरी भाषाशास्त्रज्ञांच्या मते थाई भाषा चीनीच्या अधिक जवळची व इण्डोनीशियन भाषा एका स्वतंत्र कुलातली समजली जाते.

इण्डोयुरोपीय मानलेल्या भाषा एका कुळातल्या नाहीत व त्यांच्यातील साम्य उसनवारीने



निर्माण झालेले आहे असे स्पष्ट मत ट्रबेटस्कॉय, सोल्टा, पिसानी आणि ॲलन या चार जगत्प्रसिद्ध भाषाविदांनी मांडले आहे. पण भारतातील बड्या बड्या भाषाविदांना त्यांचे नावही माहीत नाही असे त्यांच्याशीच चर्चा करताना मला आढळून आले आहे.

**कॉल्डवेलचे अज्ञान**

ॲलन, ट्रबेट्स्कॉय, सोल्टा व पिसानी या भाषाविदांचे नावही आमच्या भाषाशास्त्रज्ञांना माहीत नाही. यापेक्षाही आश्चर्याची गोष्ट ही आहे की, उत्तर भारतातील सर्व भाषा व त्या जिच्यापासून निघाल्या आहेत ती संस्कृत यांच्याहून तमिळ वेगळी आहे हे संस्कृत व उत्तर भारतीय भाषा न येणाऱ्या कॉल्डवेल या मिशनऱ्याने मांडलेले मत त्यांनी शिरोधार्य मानले आहे. कॉल्डवेलने आपल्या मताच्या समर्थनार्थ दहा मुद्दे मांडले आहेत, ते असे-

I

१. तमिळमध्ये विभक्ति प्रत्यय नाहीत. प्रत्ययांच्या जागी शब्दाहून भिन्न असलेले शब्द वापरले जातात.

एकवचन व बहुवचन यात फरक असा की एकवचनात प्रत्यय मूळ शब्दाला लावला जातो व बहुवचनामध्ये बहुत्व दर्शविणाऱ्या रूपानन्तर प्रत्यय लावला जातो. बहुवाचक प्रत्यय लावल्यावर सर्व नामांना, मग त्याचे लिंग व वचन काहीही असले तरी सारखेच प्रत्यय लावले जातात.

**इंग्रजी**

लागू नाही

**हिंदी**

सेवकने, सेवकको, सेवकसे, सेवकोंने, सेवकको, सेवकगणने

**मराठी**

सेवकाने, सेवकाला, सेवकांनी, सेवकांना, सेवकासारख्यांना, सेवकगणाने

**इंग्रजी**

विभक्ती नाहीत. विभक्तीचा अर्थ इन ऑन वगैरे शब्दयोगी अव्ययांनी व्यक्त केला जातो.

II

कु, क्कि आणि गे हे तमिळमध्ये चतुर्थीचे प्रत्यय म्हणून वापरले जातात.

संस्कृत, मराठी व इंग्रजीला लागू नाही. हिंदीमध्ये १९ व्या शतकापर्यंत कु हा चतुर्थीचा प्रत्यय म्हणून वापरला जात होता. गंगासागर आणि हरयाणामध्ये क ऐवजी ग वापरला जातो.

III

(१) इण्डोयुरोपीय भाषांतील उपसर्गांच्या ऐवजी तमिळमध्ये प्रत्यय वापरले जातात.

हे प्रत्यय स्वतंत्र पदे नसतात. ते गुण वा संबंध यांचे वाचक आणि अर्थबोधनास साहाय्यक होत असतात.

(२) क्रियाविशेषणे ही नामे वा कृदन्त असतात आणि ज्या क्रियापदाची ती विशेषणे असतात त्याच्या पूर्वी वापरली जातात.

**संस्कृत**

१. सेवकेन विना, सेवकेन सह, सेवकादन्तरा, येथे विना, सह व अन्तरा ही स्वतंत्र पदे नाहीत. पदे सुवन्त वा तिडन्त असतात.

२. वेगेन गच्छ, पठितुं गच्छ, रात्रौ पठ

**हिन्दी**

१. सेवकके बिना, सेवकके सह

२. तेज़ीसे पढो, पढने जाओ, रातमे पढो

**मराठी**

१. सेवकाच्या विना, सेवकाच्या सह, सेवकाच्या वाचून

२. वेगाने जा, जेवायला ये, रात्री वाचा.

**इंग्रजी**

लागू नाही

## IV

तमिळमध्ये विशेषणे 'चालविली' (decline) जात नाहीत. पण ती जेव्हा नामासारखी वापरली जातात तेव्हा चालविली जातात.

**संस्कृत**

शूरेण, शूरसैनिकेन

**हिंदी**

शूरोने, शूर सैनिकोंने

**मराठी**

शूरांना, शूर सैनिकांनी

इंग्रजीत 'चालविणे' (declension) हा प्रकार नाहीच.

## V

तमिळमध्ये कृदन्तांचा विशेषणे म्हणून उपयोग होतो. ती क्रियेचा अर्थही द्योतवितात.

**संस्कृत**

हसन्वसन्तः। मृतः अश्वः।

**हिन्दी**

हसती दुनिया, मृत अश्व



**मराठी**

हसता वसन्त, मृत अश्व

**इंग्रजी**

Laughing gas, scented food

## VI

प्रथम पुरुषी बहुवचनी सर्वनामाचे तमिळमध्ये दोन प्रकार आहेत. एकात ऐकणाऱ्याचा समावेश होतो व दुसऱ्यात होत नाही.

**संस्कृत**

वयम्, अस्मादिकाः

**हिन्दी**

हम् अप्पन

**मराठी**

आम्ही, आपण

इंग्रजीत We हे एकच ऐकणाऱ्याच्या अंतर्भाव न करणारे प्रथमपुरुषी बहुवचनी सर्वनाम आहे.

## VII

तमिळमध्ये कर्मणि व भावे प्रयोग नाही. कर्मणि व भावे प्रयोग व्यक्त करण्यासाठी प्रयोजकाचा उपयोग करावा लागतो.

**संस्कृत**

संस्कृतमध्ये कर्मणि व भावे प्रयोग आहेत. पण हे अर्थ व्यक्त करण्यासाठी प्रयोजकांचा देखील वापर करता येतो. उदाहरणार्थ कृष्णेन अर्जुनःयोधायितः। तेन निद्रितम्।

**हिन्दी**

श्रीकृष्णने अर्जुनको लढवाया।

**मराठी**

श्रीकृष्णाने अर्जुनाला लढविले.

**इंग्रजी**

इंग्रजीत कर्मणि प्रयोग आहे. The book was torn by me पण प्रयोजक नाही. प्रयोजकांचा भाव व्यक्त करण्यासाठी made to चा उपयोग करावा लागतो. He was made to go

## VIII

तमिळमध्ये आणि या शब्दाचा उपयोग न करता चालविता न येणाऱ्या कृदन्तांचा उपयोग करण्याची जास्त चाल आहे.

एखाद्या वाक्यप्रयोगाची जास्त चाल असणे हा शैलीचा फरक आहे. व्याकरणाचा नाही. तरी इतर भाषातील उदाहरणे पाहू.

**संस्कृत**

स भुक्त्वा शालां गत:। किंवा, स: अभुक्त शालां च गत:।

**हिन्दी**

वह भोजन करके शाला गया । उसने भोजन किया और फिर शाला गया।

**मराठी**

तो जेवून शाळेत गेला। तो जेवला आणि शाळेत गेला।

**इंग्रजी**

Having taken meals he went to office or He took meals and went to office

## IX

तमिळमध्ये नामाऐवजी कृदन्त वापरले जातात

**संस्कृत**

भटकत राहणाऱ्यालाच मध सापडतो.

चरन्वै मधु विन्दति ऐवजी यश्चरति स मधु विन्दति ।

**हिन्दी**

डूबता क्या न करता?

**मराठी**

जो बुडतो त्याला काडीचा आधार ऐवजी बुडत्याला काडीचा आधार.

**इंग्रजी**

Those who win clap ऐवजी The winning clap

## X

तमिळ वाक्यरचनेचे खालील विशेष आहेत-

१. कर्ता वाक्याच्या सुरवातीला असतो व क्रियापद शेवटी असते.
२. विशेषण विशेष्यापूर्वी येते.
३. क्रियाविशेषण क्रियापदाच्या पूर्वी येते.
४. कर्म व कर्माची सर्व विशेषणे क्रियापदाच्या पूर्वी येतात.
५. विशेषणार्थी कृदन्त विशेष्याच्या पूर्वी ठेवले जाते.
६. भावरूप अभावरूपाच्या पूर्वी ठेवले जाते.
७. स्वामी स्वच्या पूर्वी ठेवला जातो.
८. कारक उपसर्गाने न दाखविता प्रत्ययाने दाखविले जातात.



**संस्कृत**

१. राम: गच्छति। २. बुद्धिमान् बालक:। ३. वेगेन धावती। ४. तेन स्वादु पौष्टिकम् अन्नं भुक्तम्। ५. तिष्ठन् गौ: ६. न हि गच्छति ७. गृहस्य स्वामी

वरील सर्व वाक्यात प्रत्यय प्रकृतीच्या पुढे आहेत.

**हिंदी**

१. राम गया। २. होशियार बालक ३. तेजीसे चलो ४. उसने अच्छा मीठा खाना खाया ५. दौडता घोडा ६. नही जाऊंगा ७. मकान का मालिक

या सर्व वाक्यात प्रत्ययाने कारक दाखविले आहेत.

**मराठी**

१. राम गेला. २.हुषार मुलगा. ३. भरभर चला. ४.त्याने चांगले सुग्रास अन्न खाल्ले ५.धावता घोडा ६. नाही जाणार ७. घराचा मालक

या सर्व वाक्यात कारक प्रत्ययांनीच दाखविले आहेत.

**इंग्रजी**

2. clever boy 4. He ate wholesome and delicious food 5. standing instructions 6 will not give 7. owner of the house

दहापैकी फक्त चार विशेष इंग्रजीला लागू आहेत.

वरील उदाहरणावरून खालील तालिका करता येते.

तमिळची वैशिष्ट्ये

| भाषा | पूर्णतया लागू | अंशत: लागू | मुळीच लागू नाहीत |
|---|---|---|---|
| संस्कृत | ६ | २ | २ |
| हिन्दी | सर्व | ० | ० |
| मराठी | ८ | १ | १ |
| इंग्रजी | ३ | ३ | ४ |

वरील तालिकेवरून हिन्दी, ही कॉल्डवेलच्या मते शंभर टक्के व मराठी ही ऐंशी टक्के द्रविड भाषा ठरते. उत्तर भारतातली प्रमुख भाषाच जर द्रविड आहे व दक्षिण भारतात मोडणारी मराठी ही देखील ऐंशी टक्के द्रविड आहे तर उत्तर भारतातील भाषा आर्य व दक्षिण भारतातील द्रविड या म्हणण्याला काय अर्थ उरला?

**इंग्रजी यातली नव्हे.**

शिवाय इंग्रजी व उत्तर भारतातील भाषा यांचे कुळ एक आहे हे म्हणणेही या

तालिकेवरून खोटे ठरते. कारण ज्या तमिळशी इंग्रजी अत्यन्त भिन्न आहे तिच्याशी हिन्दी व मराठी बऱ्याच सदृश आहेत, म्हणजे त्या इंग्रजीहून अत्यंत भिन्न आहेत.

दक्षिणी भाषांतील लिंगभेद नैसर्गिक आहे. उलट उत्तर भारतातील भाषेमध्ये तो स्वच्छन्दी आहे. यावरून उत्तर भारतीय भाषा या दक्षिण भारतीय भाषांहून वेगळ्या वंशाच्या आहेत असे म्हणणारे इंग्रजीची नैसर्गिक लिंगे विसरून इंग्रजीला मात्र आर्य भाषा म्हणायला तयार आहेत.

व्याकरणीय लिंगे जाऊन नैसर्गिक लिंगे वापरण्याचे स्थित्यंतर प्राकृत भाषामध्ये दिसून येते. पण प्राकृत भाषांना कोणी अनार्य भाषा म्हणत नाही.

अप, अव आणि निर् हे उपसर्ग प्राकृतामध्ये बदलले आहेत. दक्षिण भारतीय भाषातले शब्द संस्कृतपासून काढायचे असतील तर प्राकृतांची मध्यस्थी स्वीकारावी लागेल. उदाहरणार्थ संस्कृत प्रति, प्राकृत परि, आणि तेलगू पै.

द्राविडी म्हटल्या जाणाऱ्या भाषातून संस्कृत शब्द व तद्भव शब्द काढले की त्या भाषा मानवाच्या न्युनतम गरजा भागविण्यास देखील समर्थ उरणार नाहीत.

दक्षिणी भाषांतील संख्यावाचके उत्तर भारतातील संख्यावाचकापेक्षा वेगळी आहेत याचे काल्डवेलने भांडवल बनविण्याचा व ती सीथियन भाषात हुडकण्याचा प्रयत्न केला आहे. पण इंग्रजीचे वन (One) व दक्षिणेतील 'हे' सारखे आहेत यावरून इंग्रजीला त्याने द्रविड कुलात का ओढू नये? तेलगूमध्ये बाले व अशिक्षित, दोनला दोनु म्हणतात. हे मराठी दोनशी सदृश आहे. मग पाश्चात्यांचे वर्गीकरण कोठे गेले?

ध्वनिशास्त्राच्या दृष्टीने द्रविड भाषा आवेस्ता आणि ग्रीक या 'आर्य' भाषापेक्षाही ऋग्वेदाच्या अधिक जवळच्या आहेत. या भाषातील पुष्कळशा प्राचीन शब्दांचे संस्कृतशी साम्य आहे. भाषाशास्त्राने मानलेल्या अनेक विशेषाच्या बाबतीत द्राविड भाषा संस्कृतच्या सहोदर आहेत. सेल्टिक आणि संस्कृत यामधील फरक द्राविड भाषा व संस्कृत यातील फरकापेक्षा जास्त आहे. प्रमाणभूत द्राविड भाषापेक्षाही या भाषांच्या बोल्यांमध्ये संस्कृतशी साम्य अधिक आढळते.आर्य द्राविड भेद निर्माण करण्यासाठी केलेले भाषांचे वर्गीकरण हा एक पत्त्यांचा बंगला आहे. चिकित्सेच्या एका झुळुकेने देखील तो कोसळतो.

भारताबाहेरून आलेल्या आर्यांनी उत्तर भारतात राहणाऱ्या द्रविडांची कत्तल केली व त्याना दक्षिणेत हाकून दिले असा मिशनरी इतिहास आहे. पण प्रत्यक्षात सगळ्यात प्राचीन म्हणविणारी द्राविड भाषा जी तमिळ ती ख्रि. पू. ६०० च पूर्वी अस्तित्वात असल्याचा पुरावा नाही. उपलब्ध असलेले सगळ्यात प्राचीन तमिळ साहित्य ख्रि.पू. ४०० च्या सुमाराचे आहे. शिलप्पाधिकारम् या ग्रंथाच्या नावातच संस्कृत शब्द आहेत. सिन्धुसंस्कृतीचे लोक द्रविड होते असे म्हणायला या ग्रंथाच्या पूर्वी हजारो वर्षे तमिळ वा इतर कोणती द्रविड भाषा अस्तित्वात असल्याचा पुरावा नाही. बरे आर्यांनी केलेल्या कत्तलीला भिऊन



जे दक्षिणेत पळून गेले त्यांच्या अतिप्राचीन वाङ्मयात या भयंकर प्रसंगांच्या काही स्मृति असायला पाहिजे होत्या. पण त्या कुठेच नाहीत. उलट सुमारे अडीच हजार वर्षापूर्वीचे पाण्ड्य राजे आपल्या पूर्वजांनी भारतीय युद्धात भाग घेतला असे म्हणण्यात अभिमान बाळगताना दिसतात. इंद्राचा सण साजरा करतात व वैदिक लोकाप्रमाणे अश्वमेध करतात.

उत्तर भारताला आर्यावर्त म्हणतात यावरून वैदिक संस्कृति उत्तरेतून दक्षिणेत आल्याचे सूचित होते.दक्षिणेत जाणारा पहिला ऋषी अगस्त्य हा होता. त्यानेच तमिळ भाषेचे व्याकरण लिहिले. अगस्त्य दक्षिणेत आला तो तेथेच वसती करून राहिला. त्याच्या मागोमाग इतरही उत्तरनिवासी दक्षिणेत आले असणार.

रामाच्या आधी अगस्त्य दक्षिणेत आश्रम करून राहिला होता असे रामायणात वर्णन आहे. असे अनेक ऋषींचे आश्रमही रामाच्या वेळी दक्षिणेत होते. दण्डकारण्यात प्रवेश केल्याबरोबर रामाने अनेक ऋषींची भेट घेतली असे वर्णन करणारा महर्षीसङ्ग या नावाचा एक सर्गच रामायणात आहे. शरङ्भग, सुतीक्ष्ण, सातकर्णि वगैरे इतर अनेक ऋषींचे आश्रम रामाच्या वेळी दक्षिणेत होते.

**रामाचा काल**

१. त्याच्या जन्माच्या वेळी चैत्र हा हिवाळ्याचा शेवटचा महिना होता.

२. ज्या महिन्यात पुष्य नक्षत्र रात्रभर आकाशात दिसत होते त्या महिन्यात हेमंत सुरू होत असे व

३. भाद्रपद महिन्यात हिवाळा सुरू होत असे या उल्लेखावरून व युद्धकांडात वर्णिलेली शस्त्रात्रे ताम्ब्याचे शोध लागण्याच्या आधीची आहेत यावरून खिस्तपूर्व ३७०० हा ठरतो. रामायण या ग्रंथाचा फारच थोडा भाग इतका प्राचीन आहे. तेव्हा रामायणात लिहिलेले सर्व रामाच्या काळचे असू शकत नाही. पण रामाच्या पूर्वीच ऋषींची वसती दक्षिणेत झाली होती अशी परंपरा फार प्राचीन आहे असे म्हणण्यास हरकत असू नये.

हा विस्तार करण्याचे कारण असे की राम हा दक्षिणीय द्रविडावर स्वारी करणारा आर्य राजा होता व त्याने इंग्रजांनी जसा अमेरिका, ऑस्ट्रेलिया वगैरे खण्डातील आदिवासींचा निःपात करून आपल्या वंशाच्या लोकांची वसती केली तसा द्रविडांचा निःपात करून आर्यांची दक्षिणेत वसती केली असा प्रचार केला जातो. प्रत्यक्ष रामायणात या भाकडकथेला पुष्टिदायक असे काही नाही. दक्षिणेत वसती करून राहणाऱ्या राक्षस व वानर या दोन जमातींचा उल्लेख रामायणात आहे. या पैकी कोणतीही जमात अनार्य असल्याचा व त्यांचा रामाने उच्छेद केल्याचे वर्णन रामायणात नाही. रावण हा ब्राह्मण होता. तो यज्ञ करीत असे व संस्कृत बोलत असे. रामाने राक्षस जमातीचा उच्छेद केला नाही. युद्ध जिंकल्यावर त्याने लंकेत शिरून तेथील नागरिकांच्या कत्तली केल्याचे रामायणात वर्णन नाही. उलट त्याने रावणाचा भाऊ बिभीषण याला लंकेच्या राज्यावर

बसविले व त्याच्याकडून खंडणी देखील न घेता तो दक्षिणेत परत आला. रामाबरोबर सीता व लक्ष्मण हे दोघेच दक्षिणेत आले होते व तेही रामाबरोबरच परत गेले. रामाच्या दक्षिण विजयाचा वृत्तान्त हा असा आहे. त्यात व गोऱ्या जमातींच्या वसाहतवादात ज्यांना साम्य दिसते त्यांना कोठेही काहीही दिसू शकेल.

दुसरी जमात जे वानर ते रामाचे साहाय्यकच होते. हनुमान संस्कृतच बोलत असे. वाली संध्या करीत असे. रामाने वालीचा भाऊ सुग्रीव यालाच राज्यावर बसविले.

राक्षस व वानर हे कोण होते याबद्दल उपलब्ध वाङ्मयावरून एवढेच म्हणता येते की त्या उत्तरेतूनच आलेल्या वैदिकांच्या जमाती होत्या. वाली हा इंद्राचा पुत्र होता. राम हा विष्णूचा म्हणजे इंद्राच्या सख्याचा अवतार होता. वालीच्या जमातीचे नाव वानर पडले. कारण ऋग्वेदातला वृषाकपि हा वानरदेखील इंद्राला इतका प्रिय होता की इन्द्राणीला त्याचा फार मत्सर वाटू लागला. जातीचे नाव वानर होते यावरून शेपुटवाल्या माकडांचा तो कळप होता असे ठरत नाही. आजचे नागा लोक नाग नाहीत. ते तुमच्या आमच्या सारखेच मानव आहेत.

रावण हा पुलस्त्य ऋषीला केकसी या राक्षसीपासून झालेला होता. यावरून तो अर्धा अनार्य होता असे अनुमान निघत नाही. कारण राक्षस हे अवैदिक असल्याचे कोठेही वर्णन नाही. त्यांच्या राक्षस या नावाची व्युत्पत्ति रक्षण करणे या धातूपासून आहे. म्हणजे राक्षस ही क्षत्रियांचीच एक जात होती. पेंढारी हे जसे मूळचे पेशाने सैनिक होते पण इंग्रजांनी एतद्देशीय राजांची सैन्ये बरखास्त केल्यामुळे बेकार झाले व बेकारीमुळे लुटालूट करू लागले तसेच राक्षस हे सैनिकांचे लुटारू झाले असले पाहिजेत.

अगस्त्याने तमिळ भाषेचे व्याकरण लिहिले या परंपरेतला अगस्त्य रामकालीन असू शकत नाही. कारण तमिळ भाषा ख्रि.पू. ६०० च्या पूर्वी अस्तित्वात असल्याचा पुरावा नाही. पण अगस्त्याने दाक्षिणात्यांच्या भाषेचे व्याकरण लिहिले अशी प्राचीन परंपरा दक्षिणेत असली पाहिजे. दक्षिणेमध्ये उत्तरेतली संस्कृत भाषा बोलणाऱ्यांना अभ्यास केल्याशिवाय येणार नाही अशा भाषा असल्याच पाहिजेत. त्यापैकी एखाद्या प्रमुख भाषेचे अगस्त्याने व्याकरण लिहिले असेल. पण ती भाषा हीच आजच्या तमिळची मूळ भाषा असे म्हणता येत नाही. कारण तमिळची उत्पत्ति इतर भारतीय भाषांप्रमाणेच संस्कृतोद्भव प्राकृतातून झाली आहे असे दाखवून देता येते. तमिळचा बान्धा हिन्दीशी अत्यन्त समान आहे. यावरून या विधानाला पुष्टि मिळते. रामाच्या काळी अगस्त्याने ज्या भाषेचे व्याकरण लिहिले ती वानरांची वा राक्षसांची भाषा नव्हती. कारण हे दोन्ही समूह संस्कृतभाषी होते. राक्षस व वानर यांच्या भाषेहून भिन्न असलेल्या रामकालीन भाषा वन्य जमातींच्या व फार थोड्या लोकांच्या असल्यामुळे त्या राक्षस व वानर यांच्या संस्कृतोद्भव भाषातच सामावून गेल्या असे मानणे सर्व उपलब्ध पुराव्याशी सुसंगत होईल. ब्रिटनमधील गेलिक व वेल्श



या भाषा इंग्रजांच्या संख्येपुढे या भाषा बोलणाऱ्यांशी संख्या नगण्य असल्यामुळे इंग्रजीतच सामावून गेल्या.

सारांश, संस्कृतभाषी उत्तरभारतनिवासी लोकांचा जो दक्षिणेत प्रवेश झाला तो चीन व जपानमध्ये झालेल्या बुद्धधर्माच्या प्रसाराप्रमाणे शान्ततामय मार्गाने झाला. त्याच्याशी गोऱ्यांच्या मूलवासींचा उच्छेद करणाऱ्या वसाहतवादाशी तुलना करणे हा मिथ्या प्रचार आहे. अशोकाच्या कालापर्यंत तमिळ ही संस्कृतोद्भव भाषांपेक्षा फारशी वेगळी नव्हती. याचा पुरावा हा आहे की तमिळ प्रदेशाच्या जवळ जे अशोकाचे प्रस्तरलेख सापडले आहेत ते उत्तरेतील प्रस्तरलेखा प्रमाणेच पालीमध्ये आहेत. अशोकाने धर्मप्रसारासाठी हे प्रस्तरलेख लिहिले. त्यामुळे ते लोकांना समजावेत अशीच त्याची इच्छा असणार.

✠

प्रकरण -४

# ऋग्वेदात 'आर्य अनार्य' संघर्ष आहे काय?

ऋग्वेदाबद्दल सर्वसाधारण प्राचीन इतिहासवाचकांच्या अशा समजुती आहेत की त्यात सर्वत्र आर्य व अनार्य याच्या लढायांची वर्णने आहेत. तसेच आदिवासी हा शब्द इतका सार्वत्रिक झाला आहे की आज आदिवासी म्हणून म्हणविले जाणारे लोक वेदकालापासूनच आदिवासी म्हणविले जात आहेत असे लोकांना वाटते. वस्तुतः ब्रिटिश काळापूर्वी आदिवासी हा शब्द आमच्या भाषात नव्हताच. आज ज्यांना आदिवासी म्हणण्यात येते त्यांना ब्रिटिशपूर्व काळात वनवासी म्हणत होते. गोण्डांना आज आदिवासी म्हणण्यात येते. पण ब्रिटिशपूर्व काळात गोण्ड हे राजे होते व ते स्वतःला क्षत्रिय म्हणवीत. त्यांना आदिवासी तर काय वनवासी देखील म्हणत नव्हते. कारण ते वनात राहत नव्हते. नागपूरचे राज्य भोसल्यांनी घेण्यापूर्वी तेथे गोण्डच राज्य करीत होते. भोसल्याप्रमाणे गोण्डांच्या वंशजांचेही महाल नागपुरात आहेत. त्यांचे राज्य साऱ्या मध्यप्रदेशात पसरले होते. गडमण्डळच्या राणी दुर्गावतीचा एक संस्कृत शिलालेखदेखील उपलब्ध आहे.

तसेच हे आवर्जून सांगणे आवश्यक आहे की आर्य नावाचे कोणी लोक होते या अर्थी आर्य हा शब्द ब्रिटिश कालापूर्वी कोणीही वापरत नव्हते. आर्य या शब्दाचे अर्थ अमरकोशात दिले आहेत ते असे. १. महान कुलात जन्मलेला, २. सभ्य, ३.सज्जन, ४. साधू म्हणजे सरळ स्वभावाचा. आर्य हे एखाद्या समाजाचे नाव आहे असे या कोशात कोठेही सांगितलेले नाही. इंग्रजीतील sir हा शब्द आर्यपासून आलेला आहे असे भाषाशास्त्रात सांगितले आहे. सर हे अत्यंत प्रतिष्ठित माणसाचे संबोधन आहे. जसे सर आयझॅक न्यूटन. सर हे एखाद्या जातीचे नाव नाही. ती व्यक्तीची पदवी आहे. तेव्हा 'भारतावर आर्य लोकांनी स्वारी केली.' असे म्हणणे म्हणजे भारतावर सर लोकांनी स्वारी केली असे म्हणण्यासारखे आहे. सर आयझॅक न्यूटनला सर म्हणत होते तसेच चाणक्याला आर्य चाणक्य म्हणत होते. प्रतिष्ठित पुरुषाप्रमाणेच प्रतिष्ठित स्त्रीला 'आर्ये!' म्हणून संबोधीत असत.

गीतेत श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतो की 'मी लढणार नाही' हे तुझे म्हणणे अनार्यजुष्ट म्हणजे अनार्यांनाच शोभणारे आहे. येथे अनार्य हे लढाईतून पळ काढण्यासाठीच प्रसिद्ध असलेल्या एखाद्या जमातीचे नाव नाही. अशी कोणतीही जमात इतिहासाला ज्ञात नाही. अनार्यजुष्ट म्हणजे अप्रतिष्ठित लोकांना शोभणारे.

अरब, तुर्क, अफगाण व मुघल यांच्यापूर्वी भारतावर राज्य करणारे सर्व लहान मोठे राजे भारतीय युद्धात भाग घेणाऱ्या राजापर्यंत आपला वंशवृक्ष नेऊन भिडवीत. शक व हूण राजे असेच करीत असे म्हणण्यास आधार नाही. पण त्यांनी आल्याबरोबर आपल्या मूळभाषा भारतात आणल्या नाहीत. त्यांनी संस्कृत भाषा व हिंदू धर्म यांचा सर्वस्वी स्वीकार केला. तरी त्यांची राज्ये जाऊन ते येथील समाजात पूर्णपणे विलीन होण्याच्या आधी ते परदेशातून आले होते हे सर्वांना माहीत होते. अरब, तुर्क, अफगाण व मुघल यांनी तर उघडपणेच आपण परकीय आहोत हे सदासर्वदा जाहीर केले होते. इंग्रजांचीही हीच स्थिती होती. तेव्हा भारतात प्राचीन कालापासून परकीय कोण व स्वकीय कोण हे पक्के माहीत होते. असे असता आर्य नावाचे कोणी परके येथे आले होते याची कोणाला ओळख नव्हती ही गोष्ट प्रथमतः आर्याक्रमणाच्या ऐतिहासिकतेवर संशयाचे जाल पसरविणारी आहे. ऋग्वेदात आर्य शब्द ३१ वेळा आला आहे. त्यात कुठेही तो एखाद्या जमातीचा वाचक नाही.

'कृण्वन्तो विश्वमार्यम्।' हे प्रसिद्ध वचन घ्या. 'आम्ही सर्व विश्वाला आर्य करू असे वैदिक लोक म्हणत असत.' असा या वचनावरून प्रचार केला जातो. पण हे वाक्य सोमाला उद्देशून आहे पूर्ण ऋचा अशी आहे.

**इन्द्रं वर्धन्तो अप्तुरः कृण्वन्तो विश्वमार्यम् । अपघ्नन्तो अराव्णः ।**

(मंडल ९, सूक्त ६३, ऋचा ५, यापुढेही असे आकडे येतील तेथे मंडळ सूक्त ऋचा असाच क्रम समजावा)

इन्द्राला वाढविणारे पाणी टाकले की तुरूतुरू धावणारे व अदात्यांचा नाश करणारे हे सोम साऱ्या विश्वाला आर्य करतात. सोमाचा नैवेद्य मिळाला की इन्द्र आनन्दाने फुलतो; म्हणून सोम इन्द्राला वाढविणारे आहेत असे म्हटले आहे. सोमाची पाने कुटल्यावर पाट्यावर पाणी टाकून ते कुटलेल्या सोमासकट पात्रात टाकतात. सोम याप्रकारे अप्तुर म्हणजे पाण्याने वाहणारा आहे. तसेच सोम अप म्हणजे कर्माला (कार्य)प्रवृत्त करतात. सोमाने आतिथ्य केले की सोम देणाऱ्याला काय देऊ व काय नाही असे कृपणाला देखील वाटू लागते. या प्रकारे सोम सर्व जगाला आर्य म्हणजे उदार करतात.

सोमाची प्रत्येक ऋचा सोम या वनस्पतीला त्याचप्रमाणे चंद्राला उद्देशून आहे. संस्कृतात सोम म्हणजे चंद्र असाही अर्थ आहे. वरील ऋचेचा चंद्रपर अर्थ असा -

इन्द्राला म्हणजे प्रत्येक पदार्थातील सर्वोत्कृष्ट अंशाला वाढविणारे अप्तुरः म्हणजे कर्माची प्रेरणा देणारे, कृपण मनोवृत्तीचा नाश करणारे हे सोम - म्हणजे प्रतिदिनी दिसणाऱ्या चन्द्राच्या कला - साऱ्या विश्वाला आर्य म्हणजे आदरणीय बनवितात.

एते धामानि आर्या: शुक्रा ऋतस्य धारया वाजं गोमन्तमक्षरन्। ९/६३/१४

हे आर्य व धवल सोम आपल्या ऋत म्हणजे निसर्गरम्य धारेने वा प्रकाशाच्या झोताने जणू दुग्धरूपी वा किरणरूपी धनाचाच वर्षाव करीत आहेत.

## सोम म्हणजे भांग

ऋग्वेदात सोमाला भङ्ग म्हणजे भाङ्ग असेही म्हटले आहे. भांग प्याल्याने सर्व विश्व टवटवीत दिसू लागते असे कोलेमनच्या Abnomal Psychology मध्ये म्हटले आहे. यावरून सोमरस विश्वाला आर्य करतात असे का म्हटले आहे हे स्पष्ट होईल. मिशनऱ्याप्रमाणे आम्ही साऱ्या जगाला आर्य बनवू म्हणजे आपल्या धर्मात आणू असा जो याचा अर्थ केला जातो तो अज्ञानजन्य आहे. ऋग्वेदकाली यज्ञाव्यतिरिक्त दुसऱ्या काही उपासनापध्दती भारतात नव्हत्या असे मानता येत नाही. माझा इंद्र म्हणजे इंद्राची मूर्ती दहा गायींना कोण विकत घेईल या प्रश्नावरून ऋग्वेदकाली मूर्तिपूजा प्रचारात होती हे उघड आहे. यज्ञापेक्षा ही उपासना कमी दर्जाची आहे असा उल्लेख कोठेच नाही. ऋग्वेदात ३३ च्यावर देव आहेत. अमुक देव खरा व अमुक खोटा अशी भाषा कुठेही वापरलेली नाही. तेव्हा खोट्या उपासना पध्दती मोडून काढून आम्ही आपल्या उपासनापध्दति सर्वत्र पसरवू हा अर्थ कृण्वन्तो विश्वमार्यम् । या वचनात पाहणे व्यर्थ आहे.

वरील ऋचेप्रमाणेच सोम म्हणजे भांग असे स्पष्टपणे वर्णन करणाऱ्या ऋचा डझनावारी आहेत.

उदाहरणार्थ :-

उपो षु जातमप्तुरं., भङ्गं गोभिःपरिष्कृतं इन्दु देवा अयासिषुः १९/६१/१३

सुजात म्हणजे चांगल्या जातीचा वा अमृतमन्थनासारख्या महान् प्रयासातून जन्मलेला, भांग म्हणजे भङ्ग वा पूर्ण नसलेला चंद्र, दुधाने रुचकर केलेला वा किरणांनी कान्तिमान् दिसणारा असा सोम म्हणजे सोमरस वा चंद्र देवांनी मिळविला.

शंकराला भांग फार आवडते म्हणून शिवपूजेचे भांग हे एक अङ्ग झाले आहे. या प्रथेची परम्परा ऋग्वेदापर्यंत भिडते ती अशीः-

अयं सोमः कपार्दिने घृतं न पवते मधु । आभक्षत्कन्यासु नः १९/६७/११

अग्नीला अर्पण केलेले तूप ज्याप्रमाणे वितळून अग्नीत विलीन होते त्याप्रमाणे हा सोम महादेवाला अर्पण केला की मधाच्या धारांप्रमाणे वाहतो. तो आम्हाला तरुण स्त्रियांच्या बाबतीत भाग्यवान् करा.

महादेव हा तपोभङ्ग केला म्हणून साक्षात् मदनाला भस्मसात् करणारा देव आहे. तो प्रसन्न झाला की मदनावर आपला ताबा होणारच असा यात आशय दिसतो. भाङ्गेच्या सेवनाने त्याचप्रमाणे चंद्रप्रकाशाने रतिक्रीडेचा आनंद द्विगुणित होतो.

यावरून सोम ही भारतात न सापडणारी वनस्पती असल्यामुळे सोम पान करणारे आर्य भारताच्या बाहेरून आले हे सदासर्वदा मांडले जाणारे अनुमान निराधार आहे हेही सिध्द होते.



ऋग्वेदातील आर्य या शब्दाचे काय अर्थ आहेत हे आणखी काही उदाहरणावरून स्पष्ट होईल. अग्नि, वायू व सूर्य तिन्ही जगात वीर्यसेक करतात. त्यापासून तीन प्रकारची आर्य सन्तति निर्माण झाली. त्यातली पहिली प्रकाश ही आहे. या तिन्ही उषेशी सङ्गत होतात. वसिष्ठांना हे सर्व माहित आहे. (७/३३/७)

इन्द, स्वर्मीढ युध्दांनी यज्ञकर्त्या आर्यांचे रक्षण करतो. तो मानवासाठी व्रतांचे पालन न करणाऱ्यांना शासन करतो. काळ्या त्वचेला त्याने सोलून काढले. साऱ्याच विश्वाला जणू जाळीत तो सर्व घातकांना मारतो (१/१३०/८)

येथील स्वर्मीढ शब्द महत्वाचा आहे. मीढ म्हणजे शिंपडलेले. म्हणजे दासांशी झालेले हे संग्राम स्वर्गात शिंपडलेले आहेत. म्हणजे या संग्रामात जे रक्त शिंपडले जाते ते स्वर्गात शिंपडले जाते, या पृथ्वीतलावर नव्हे. दुसरा महत्वाचा शब्द मानवासाठी-मनवे-हा आहे. अर्थात् हा संग्राम फक्त आर्यांसाठी झालेला नसून सर्व मानवजातीच्या हितासाठी झालेला आहे. आजकालची सरकारे देखील आम्ही साऱ्या मानवजातीच्या हितासाठी लढतो असा दावा सांगतात. तसला हा प्रकार नाही. कारण हे युध्द मुळी भूतलावर झालेलेच नाही.

## काळे व गोरे

ऋग्वेदात इंद्राला केलेल्या बहुतेक प्रार्थना पावसासाठी असतात हे लक्षात घेतले की या ऋचेतील काळी त्वचा कोणा अनार्याची नसून ढगांची आहे हे स्पष्ट होते. हे संग्राम स्वर्गात शिंपडलेले आहेत यावरून देखील पावसाचे प्रतिपाद्य स्पष्ट होते. पणि ही पाऊस रोखून धरणारी शक्ति मानली आहे. इंद्राची पावसासाठी प्रार्थना केली की तो या पणींना मारतो.

काळ्या वर्णाबरोबरच असुर्य वर्णाचा उल्लेख ९/७१/२ मध्ये आहे. याचा देखील अनार्यांच्या त्वचेच्या वर्णाशी काही संबंध नाही. हा कोणा मानवाचा वर्ण नसून सोमाचा वर्ण आहे. असुर्य हा शब्द असु म्हणजे प्राण या शब्दापासून झालेला आहे. असुर्य वर्ण म्हणजे रसरसलेला वर्ण.

आर्य गोरे होते असे ऋग्वेदात कुठेही म्हटलेले नाही. पण इंद्राचे काही शत्रू काळे असल्याचे म्हटले आहे त्यावरून या शत्रूंचे शत्रू आर्य गोरे हाते असे अनुमान काढले आहे. उदाहरणार्थ खालील ऋचा घ्या.

कृष्णाने आपल्या दहा हजार सहकाऱ्याबरोबर अंशुमतीमध्ये आश्रय घेतला. इंद्राने मोठ्याने श्वास घेणाऱ्या त्या कृष्णाचे रक्षण केले व तो चिकटून बसला असता त्याला सोडविले.

या ऋचेत कृष्णाला उद्देशून द्रप्स हा शब्द वापरला आहे. द्रप्स म्हणजे जलबिंदू असे वेदाच्या एकमात्र उपलब्ध संपूर्ण भाष्याचा कर्ता सायण म्हणतो. अर्थात् हा कृष्ण कोणी

अनार्य मानव नसून थेंब होता व तो दहा हजार अन्य थेंबासह दीप्तिमान् म्हणजे रुपेरी कडा असलेल्या ढगात लपला होता. इंद्राने हे दहा हजार म्हणजे पुष्कळ जलबिंदु मोकळे केले म्हणजे पाऊस पाडला.

इंद्राने काळ्या अनार्यांनाच केवळ नव्हे तर त्यांच्या गर्भवती स्त्रियांना देखील मारले असे सांगितले जाते. संबधित ऋचा अशी आहे:-

तुम्ही आपली गीते पेयासह मदोन्मत इंद्राला अर्पण करा. त्याने ऋजिश्वासह कृष्णगर्भांना मारले. (१/१०/१)

इंद्राची सूक्ते म्हणताना त्याला सोम अर्पण करतात व मग इंद्र प्रसन्न होऊन काही कर्मे करतो. अर्थात् कृष्णगर्भांना मारणे हे इंद्राचे कर्म आहे. इंद्र हा देव आहे. त्याची प्रार्थना मुख्यतः पावसासाठी करतात. कुणाच्या गर्भवती स्त्रियांना मारण्यासाठी नव्हे. तेव्हा इंद्राने कृष्णगर्भांना मारले म्हणजे काळ्या मेघांना मारले- त्यांना पाऊस पाडायला लावले. पाऊस पडल्यावर मेघ नाहीसाच होतो. त्यामुळे मेघांना पाऊस पाडायला लावणे म्हणजेच त्यांना ठार मारणे. ऋजिश्वनाने यज्ञ करून इंद्राला अशी विनंती केली होती म्हणून ऋजिश्वनासह इंद्राने हे कृत्य केले असे म्हटले आहे.

४/१६/१३ म्हणते हे इंद्रा, तू विदथीचा पुत्र ऋजिश्वा याच्यासाठी पिप्रु, मृगय वगैरे बृहदाकार झालेल्यांना मारलेस. एखादा जुना टोप फोडावा त्याप्रमाणे तू २५००० कृष्णपुरे फोडून साफ केलीस.

येथेही विदथीचा पुत्र ऋजिश्वा हा यजमान आहे. पिप्रु व मृगय हे राक्षस आहेत. काळी पुरे हे ढग आहेत.

ऋग्वेदातील काळ्या त्वचेचा उल्लेख हा ढगांचा वा रात्रीचा उल्लेख आहे हे अनेक उल्लेखांवरून स्पष्ट आहे.

अव्रतांना मारणारी शुध्द तेजाची चंद्राची किरणे, सङ्गीताच्या स्वराप्रमाणे द्यावापृथिवींना व्यापून राहिली आहेत. ती रात्रीची कृष्ण त्वचा सोलून काढीत आहेत. (९/७३/५)

येथे कृष्ण त्वचा सोलणारा कुणी आर्य मानव नाही, तो चंद्र आहे. जी त्वचा सोलली जाते ती कोणा अनार्य मानवाची नाही. ती रात्रीची आहे.

हे कान्तिमान् सोम तुरुतुरू जमून वाढत जाणाऱ्या गायींच्या कळपाप्रमाणे आपल्या किरणांनी कृष्ण त्वचांना दूर सारतात.(९/४१/१)

अंधार दूर करणाऱ्या चंद्रकिरणांचे हे वर्णन आहे हे स्पष्ट आहे. आर्यांच्या कल्पनेला काही आधारच उरत नाही. ४/१७/१४ म्हणते-

या ऋचेतील शब्दप्रयोग समजण्यासाठी ऋग्वेदातील काही तार्किक कल्पना समजून घेतल्या पाहिजेत. त्वचाहे शरीराचे आवरण आहे. शरीराचे आवरण न म्हणता नुसतेच आवरण म्हटले तर ज्याला आवरण घालायचे असे काही असल्याशिवाय आवरणाला अर्थ उरत नाही.

**श्यामला कवयित्री**

ज्याला आवरण घातले जाते ते आकाश - space आहे. म्हणून आकाशाला व अवकाशाला त्वचेचा बुंधा म्हणजे आवरणाचा आधार म्हटले आहे. तसेच रजस् म्हणजे त्याला इंग्रजीत region म्हणतात ते. रीजन म्हणजे जागा, ठिकाण वा स्थान हे शब्द वापरता येण्यासाठी अवकाश वा आकाश म्हणजे space ही कल्पनाही आवश्यक आहे. वरील ऋचेत त्वचेचा आधार व रजाचे उगमस्थान असे आकाशाचे वर्णन केले आहे. ऋचेचा अर्थ असा आहे:-

हा काळा इंद्र सर्वांना आवरण घालणारी जी त्वचा तिला बुंध्यासारख्या म्हणजे आधारासारख्या असणाऱ्या आकाशात वृष्टि करतो.

ऋग्वेदात काळा हा शब्द कुत्सेने वापरलेला नाही. सायण म्हणतो की १०/३/३ या ऋचेत अभिराम हा शब्द रात्रीच्या काळेपणाला उद्देशून वापरला आहे. राम हा शब्द रम् म्हणजे रममाण होणे या धातूपासून आलेला आहे. राम या नावाचाही हाच अर्थ आहे. रात्र काळी असल्यामुळेच अभिराम आहे.

आर्य हे सर्वस्वी काल्पनिक लोक असल्यामुळे ते गोरे होते की नाही याची चर्चा गगनारविन्द सुगंधी आहे की नाही या चर्चेसारखे वायफळ आहे. पण वैदिक लोक गोरे होते का याचा निकाल लावता येतो १/१७/७ म्हणते अश्विनी कुमारांनी आपल्या भक्ताला पुत्र दिला. १०/१०/३, ११ सांगते की अग्नीने काळ्या कण्वाला ऋत दिले. ८/८५/८७ व १०/४२/४३ या ऋचा कृष्ण अंगीरसाने रचलेल्या आहेत. ऐतरेय ब्राह्मण ३/३४ यात अंगीरसांचा जन्म कोळशापासून झाला होता असं म्हटले आहे. कृष्णिय म्हणजे काळ्या बापाचा एक ऋचाकार १/११६/२३ व १/११७/७ मध्ये उल्लेखिलेला आहे.

ऋग्वेदावरून स्पष्ट आहे की वैदिक लोक आजच्या प्रमाणेच मिश्र होते. वसिष्ठ गोरे होते असे मुद्दाम सांगितले आहे यावरून हे स्पष्ट आहे आणि हेच अपेक्षित आहे. भारतात गोऱ्या लोकांचे प्रमाण उत्तरेकडून दक्षिणेकडे कमी होत जाते. कारण याच दिशेने हवामानाची उष्णता वाढत जाते. त्वचेचा वर्ण हवामानावर देखील अवलंबून आहे. तो सर्वस्वी आनुवांशिक नाही.

कौतुकही नव्हते. आमची मुले पिशङ्ग वर्णाची होऊ द्या अशी २/३/९ मध्ये प्रार्थना आहे. पिशङ्ग म्हणजे गव्हासारखा पिवळसर वा बदामासारखा लालसर तपकिरी.

वेदोत्तर वाङ्मयात देखील गोऱ्या वर्णावर भर नाही. राम व कृष्ण काळे होते पण ते पुरुष म्हणून सोडले तरी त्रैलोक्यसुंदरी द्रौपदी काळी होती. विष्णूने मोहिनीचे रूप घेतले तरी आपला काळा वर्ण सोडला नाही.

कोणताही रंग मुळात सुंदर वा असुंदर नाही. एका रंगावर सौंदर्य अवलंबून नसून रंगसंगतीवर अवलंबून आहे असे कोणताही रंगकार सांगेल. पृष्ठभाग गुळगुळीत व कान्तिमान् असेल तर तो कोणत्याही रंगाचा असला तरी सुंदर दिसतो.

गोरा वर्ण सुंदर व काळा असुंदर ही कल्पना भारतावर अरब, तुर्क, अफगाण, मुघल व इंग्रज या गोऱ्या जमातींचे राज्य अनेक शतके राहिल्यामुळे उद्भवली आहे. मुघल हे मुळात मध्य एशियातले असल्यामुळे ते गोरे वा पिवळेच असले पाहिजेत. अरब, तुर्क व अफगाण हे गोरे असतात याची खात्री त्यांच्या देशात जाऊन आजही पटवून घेता येण्यासारखी आहे. ही राज्ये भारतात स्थापन होण्यापूर्वी गोरा = सुंदर हे समीकरण रुढ झाले नव्हते हे सुंदर स्त्रीला संस्कृतात श्यामा म्हणतात यावरून स्पष्ट आहे. श्यामा म्हणजे तप्तकांचनवर्णाभा अशी व्याख्या असल्यामुळे श्यामा स्त्री काळी नव्हती असे म्हणणाऱ्यांनी तप्त कांचन पाहिले नसेल असे म्हणावे लागते. सोने पूर्णपणे शुध्द असेल तरच तापविल्याने काळे दिसत नाही. पण सोने बहुधा पूर्णपणे शुध्द नसतेच. त्यामुळे सोनाराच्या भट्टीत जे सोने दिसते ते श्यामच असते.

आठव्या व नवव्या शतकाच्या मध्यावर झालेली विज्ञकानामक कवयित्री म्हणते:-

नीलोत्पलदलश्यामां विज्ञकां मामजानता ।<br>
वृथैव दण्डिना प्रोक्तं सर्वशुक्ला सरस्वती ।।

दण्डी म्हणतो की सरस्वती गोरी आहे. त्या पामराने नीलकमलासारखा वर्ण असलेल्या मला पाहिले नव्हते.

एक स्त्री आपल्या काळेपणाचे एवढे अभिमानाने वर्णन करते यावरून या काळात गोरा म्हणजे सुंदर ही कल्पना रुढ झाली नव्हती हे स्पष्ट आहे. अजूनही गोरा म्हणजे सुंदर ही कल्पना फक्त मानवाच्या बाबतीत आहे. काळा घोडा वा कुत्रा कुरुप व पांढरा सुंदर असे कोणीही समजत नाही.

आर्य गोरे होते याचप्रमाणे ते धारदार नाकाचे होते व त्यांचे शत्रु अनार्य हे चपट्या नाकाचे होते असा प्रचार केला जातो. आर्य धारदार नाकाचे होते असा ऋग्वेदात कुठेही उल्लेख नाही. पण अनार्य चपट्या नाकाचे होते व त्यांची भाषा आर्यांच्या पेक्षा वेगळी होती हे सिध्द करण्यासाठी अनासो दस्यूनमृणो वधेन नि दुर्योणे आवृणङ्मृध्रवाचः । (५/२९/१०) या ओळीचा आधार दिला जातो. या ओळीचा शब्दशः अर्थ असा-

हे इंद्रा तू अनास् दस्यूना व विकट स्थानात जाऊन मृध्रवाक लोकांना मारलेस.

इथे आनास् शब्दाचा अर्थ चपट्या नाकाचे असा करण्यात आला आहे. वस्तुतः त्याचा शब्दशः अर्थ बिननाकाचे असा होतो. बिननाकाचा माणूस असूच शकत नाही. म्हणून अनुदरा दारा याचा अर्थ जसा कृशोदरी असा होतो तसा अनास् याचा अर्थ लहान नाकाचा असा होऊ शकतो. चपट्या नाकाचा असा होऊ शकत नाही. कारण चपटे नाक मोठे असू शकते व धारदार नाकही लहान असू शकते.

दस्यूंना लहान नाकाचे म्हटल्याने देखील त्यांचे नाक आर्यांच्या नाकापेक्षा वेगळे होते हे मानावेच लागते असे या वाक्यावरून सिध्द होत नाही. ज्या दस्यूंना मारले त्यांचे नाक लहान होते. आर्यांच्या सारखेच नाक असणारे दस्यू देखील होते असे मानणे निराधार ठरत नाही. इंग्रजांनी शीख युध्दात दाढीवाल्या भारतीयांना मारले असे म्हटल्याने इंग्रज दाढी ठेवीत नव्हते व भारतीयात सगळे दाढीदीक्षित होते असा अर्थ निघत नाही.

वस्तुतः अनास् या शब्दात नाकाचाच उल्लेख आहे असाही आग्रह धरता येत नाही. आस् म्हणजे बसणे व अनास् म्हणजे न बसणारे वा गतिमान असा अर्थ होऊ शकतो व युध्दाच्या संदर्भात हाच अधिक युक्त आहे. लहान नाकाच्या योद्ध्याला मारणे यात विशेष वर्णन करण्याजोगा पराक्रम नाही. उलट हालचाली करणाऱ्या शत्रूला मारण्यास कौशल्य लागते.

दुसरा शब्द मृध्रवाचः असा आहे. याचा अर्थ आर्यांच्या भाषेहून वेगळी भाषा बोलणारे असा करण्यात आला आहे, पण हिंसितवागिन्द्रियाः म्हणजे ज्यांचे बोलण्याचे इंद्रिय म्हणजे तोंड व जीभ यांना इजा झाली आहे असाही अर्थ होऊ शकतो. ही इजा वाचा नष्ट होण्याइतकी देखील मोठी असू शकते.

'वागिन्द्रियाला इजा झालेले' असाच अर्थ केला पाहिजे असेही नाही, 'ज्यांच्या बोलण्यात दोष आहे असे' असाही अर्थ होऊ शकतो. म्हणजे दस्यू आर्यांचीच भाषा बोलत होते पण ती दोषपूर्ण रितीने बोलत होते एवढाच अर्थ होतो.

दस्यूंच्या एकन्दर वर्णनावरून ते मानव नव्हतेच हे लक्षात घेतले की ते न बोलताच कहर करीत होते हेच अभिप्रेत दिसते.

६/२२/१० म्हणते - 'हे इन्द्रा तू आमचे असे कल्याण कर की ज्यायोगे आमचे दास शत्रू आर्य होतील...'

दास आर्य होतील या विधानावरून दास हे आर्यांपेक्षा वेगळ्या वंशाचे आदिवासी नव्हते हे स्पष्ट होते. अमेरिकेतील रेड इण्डियन व ऑस्ट्रेलियातील मावरी युरोपीय होऊ शकत नाहीत.

१/५१/८ मध्ये इन्द्राला आर्य कोण व दस्यू कोण हे ओळखण्याची विनंती केली आहे. यावरून आर्य व दस्यू हा भेद जित आदिवासी व जेते याच्या भेदासारखा नव्हता हे निर्विवाद. अमेरिकेत नीग्रो व गोरे यांना ओळखण्याची 'आकाशातल्या बापाला' विनंती करावी लागणार नाही.

## दस्यु कोण?

ऋग्वेदात शरीरलक्षणांनी ओळखू येणारी आर्य प्रजाति सापडू शकत नाही याची जाणीव झाल्यावर मॅक्समूलरने आपला पवित्रा बदलून आर्य ही जन्मसिद्ध प्रजाति नसून भाषिक प्रजाति आहे असे म्हणण्यास सुरवात केली.

वर सांगितलेलेच आहे की वैदिकांचे शत्रू वैदिकांचीच भाषा बोलत होते पण अशुद्ध रीतीने बोलत होते. असुरांच्या बाबतीत हे सिद्ध झालेले आहे. 'इन्द्रशत्रुर्वर्धस्व' असे एका असुराने म्हटले. 'इंद्राचा शत्रू' असे म्हणायचे असेल तर शत्रू शब्दावर उदात्त स्वर असायला पाहिजे. उलट 'इन्द्र ज्याचा शत्रू आहे' असे म्हणायचे असेल तर इन्द्र शब्दावर उदात्त स्वर पाहिजे. त्या असुराने इन्द्र शब्दावर उदात्त स्वर उच्चारल्यामुळे 'ज्याचा शत्रू म्हणजे शातयिता म्हणजे कापणारा इन्द्र आहे' असा अर्थ झाला व त्याने इन्द्राला मारण्याऐवजी त्यालाच इन्द्राने मारले. महाभाष्य सांगते की असुरांनी 'हे अरय' म्हणजे 'हे शत्रूंनो' असे न म्हणता 'हे अलय:' म्हणजे 'हे भुंग्यांनो' असे म्हटले म्हणून त्यांचा पराभव झाला.

ऋग्वेदाच्या प्राचीन भागात असुर हा शब्द चांगल्या अर्थी वापरला आहे. महद्देवानामसुरत्वमेतद् म्हणजे देवांचे असुरत्व महान् आहे असे ऋग्वेदीय वचन आहे. नंतर मात्र असुर म्हणजे देवांचा शत्रू असा अर्थ झाला.

झरथुष्ट्राचे अनुयायी स्वत:ला असुर म्हणवितात. त्यांच्या आवेस्त्याची भाषा वैदिक भाषेतच काही उच्चारभेद केल्यामुळे तयार झाली आहे. म्हणजे उच्चारभेदामुळे वेदांच्या जशा शाखा झाल्या आहेत तशीच आवेस्ता ही एक शाखा आहे.

वरील गोष्टीवरून वैदिकांचे प्रतिस्पर्धी वैदिकांचीच भाषा बोलत होते हे स्पष्ट आहे. भाषाभेदाने आर्य व अनार्य असा भेद करण्यास ऋग्वेदात काही आधार नाही.

ऋ म्हणजे जाणे या धातूपासून आर्य शब्दाची व्युत्पत्ति सांगून काही लोक आर्य ही भटकी जमात होती व भटकत भटकत आली असे सांगतात. पण ऋग्वेदात या अर्थी आर्य शब्दाचा कोठेही प्रयोग नाही. शिवाय संस्कृतमध्ये गत्यर्थक धातूचे कोणत्याही क्रियेला वा ज्ञानाला देखील लागू होणारे अर्थ होतात. मॅक्समूलरने अर् म्हणजे शेती करणे या धातूपासून आर्य शब्दाची व्युत्पत्ति सांगितली आहे असे म्हणतात. (मला मॅक्समूलरच्या ग्रंथात त्यांचे हे विधान सापडले नाही) पण हे खरे असेल तर त्याच्या आर्याक्रमणाच्या सिद्धांताशी ते मुळीच जुळत नाही. शेतीवर जगणारे लोक देशान्तर करीत नसतात. शिवाय



पाणिनीच्या (संस्कृत भाषेचा व्याकरणकार) धातुपाठात असा धातू सापडत नाही.

ऋग्वेदात सर्वत्र दास, दास्य व पणि यांच्याशी वैदिकांचे संग्राम वर्णिलेले आहेत यावरूनच आर्य/अनार्य संघर्ष सिद्ध होतो असे काही लोक म्हणतात. त्यामुळे दास, दस्यु व पणि यांचे उल्लेख या दृष्टीने तपासले पाहिजेत.

ऋग्वेदात दस्यु शब्द ८६ वेळा आला आहे. ८/७०/८१ मध्ये दस्यूंचे वर्णन अन्यव्रत, अमानुष, अयज्वन् व अदेवयु असे केले आहे. यातील अमानुष शब्दावरून दस्यु हे मानव नव्हते हे दिसते. अमानुषचा अर्थ निर्दय असा नाही हे अनेक उल्लेखावरून खाली दाखविले आहे.

अन्यव्रत म्हणजे इतरांपेक्षा वेगळी व्रते करणारे, अयज्वन् म्हणजे यज्ञ न करणारे व अदेवयु म्हणजे देव न मानणारे. हे सर्व भेद उपासनापद्धतीचे आहेत. ऋग्वेदकाली साऱ्या उत्तर भारतात एकच उपासनापद्धती होती असे गृहीत धरणे अवास्तव होईल. दास, दस्यु व पणि यापैकी कोणालाही एतद्देशीय असे कुठेही म्हटलेले नाही. आदिवासी हा शब्द ऋग्वेदातच काय समग्र संस्कृत वाङ्मयात कोठेही नाही.

दस्यु हे मानव नसून अतिमानवी दुष्ट शक्ती होत्या अशी स्पष्ट वर्णने ऋग्वेदात आहेत. १/३/३७ म्हणते की इन्द्र/दस्यु युद्ध 'रजस: पारे' म्हणजे भूमीच्या पलीकडे झाले आणि इन्द्राने दस्यूंना आकाशात जाळले. १/१००/१८ म्हणते दस्यूंना मारल्यामुळे पाणी व सूर्य मुक्त झाले. १०/१७०/२ दस्युवधामुळे प्रकाश फाकला असे म्हणते. दस्यु हे प्रकाश व पाणी कोंडून ठेवू शकणाऱ्या शक्ती होत्या असे मानल्याशिवाय या वचनांचा अर्थ लागत नाही.

## दस्युहन्ता इन्द्र

४/१६/१२ दस्यूंना मारून इन्द्राने सूर्याचे चक्र सोडले असे सांगते. यावरून दस्युवध हे मानवी युद्ध नसून एक वैश्विक घटना आहे असे दिसते. ज्यांना हेही वर्णन अलंकारिक भाषेत मानवी घटना सांगणारे आहे असे वाटते त्यांना ईश्वराने सात दिवसांत जग निर्माण केले हा बायबलातील वृत्तांत देखील एखाद्या नैसर्गिक घटनेचे काव्यात्मक वर्णन वाटू शकते.

८/५०/८ म्हणते 'हे इन्द्रा तुझ्या घोड्यांनी वाऱ्याला फिरण्याची शक्ती येते. त्याच शक्तीच्या साह्याने तू मानवांच्या दस्यूंना मारलेस. 'मानवाच्या दस्यूंना' म्हणजे मानवाला उपद्रव करणाऱ्यांना. याचा अर्थ असा की दस्यु हे साऱ्याच मानव जातीचे शत्रू होते. केवळ वैदिकांचे नव्हे ८/७६/११ म्हणते 'हे दस्युहत्या, आकाश व पृथिवी तुझे अनुकरण करो', 'हे अफजलमर्दक शिवाजीराजा! आकाश व पृथ्वी तुमचे अनुकरण करोत' असे कुणी म्हणेल काय?

आत्तापर्यंत सर्वसम्मत अर्थांच्या आधारे दस्यु अमानव असल्याचे दाखवून दिले. माझ्या मते १/१०४/५ मध्ये देखील दस्यु अमानव असल्याचा उल्लेख आहे. पण त्यासाठी सायणाच्या अर्थापेक्षा थोडा वेगळा अर्थ करावा लागेल.

आम्ही हा मार्ग कुठे जात आहे हे पुरे माहीत असूनही दस्यूंच्या घराकडे जाणारा मार्ग पाहिला म्हणजे निवडला. हे इंद्रा ज्याप्रमाणे लुबाडणाऱ्याचे धन त्याला सोडून जाते त्याप्रमाणे तू आम्हाला सोडून जाऊ नकोस.

सायण चर्कृताद् याचा अर्थ असुरांच्या कृत्यापासून असा करतो. पण येथे असुरवाचक असा कोणताही शब्द नाही. ऋचाकार स्वतःच्या चर्कृताबद्दल बोलत आहे. नः चर्कृताद् या शब्दप्रयोगावरून हे स्पष्ट आहे. दुसरा नः 'आम्हाला सोडू नकोस' या विनवणीचा भाग आहे. हा नः जर चर्कृताबरोबर घेतला नाही तर तो सन्दर्भविहीन लटकत राहतो.

एकूण अर्थ स्पष्ट आहे. 'दस्यूच्या घराकडे जाणारा मार्ग म्हणजे कुमार्ग. तो आम्ही जाणून देखील निवडला म्हणून इंद्र आमच्यावर नाराज होईल. 'तो दस्यूंना मारतो तसाच आपल्याला मारील ही भीती इथे विवक्षित नाही. या ऋचेत दस्यु शब्दाने आदिवासी विवक्षित आहेत.' असे म्हणणे जडच आहे. आपण रेड इण्डियनांच्या मार्गाने चाललो तर आपला देव आपल्यावर नाराज होईल असे अमेरिकनांना कधी वाटले आहे काय?

कीथ व मॅक्डोनेल यांना दस्यु हे मानव नव्हते हे मान्य आहे. पण क्षणभर सरळ झालेले शेपूट पुनः वाकडे होते. ते म्हणतात की नंतरच्या काळी दस्यु, दास वगैरे शब्द मानवाला लागू झाले. पण मानवाला लागू झाले तरी आदिवासी वा नेटिव्ह या अर्थी वापरले जाऊ लागले नाहीत. नंतरच्या वाङ्मयात दस्यु या शब्दाचा चोर असा अर्थ झाला आहे, नेटिव्ह हा अर्थ कुठेही नाही. विश्वामित्राच्या वंशातील ५०० लोक दस्यु होते असे ऐतरेय ब्राह्मण सांगते. विश्वामित्राच्या संततीला ब्राह्मण ग्रंथ आदिवासी म्हणणार नाहीत.

काही लोक असे म्हणतात की इन्द्राने दस्युंना मारले असे इन्द्रभक्त इन्द्राची कृपा स्मरून म्हणतात, वस्तुतः दस्युंना त्यांनी मारले. पण असा अर्थ करणे म्हणजे आपले पूर्वग्रह ऋग्वेदावर लादणे आहे. गजेन्द्रमोक्षाच्या कथेत गजाची प्रार्थना ऐकून विष्णूने नक्राला मारले असे म्हटले आहे. गजेन्द्राने स्वतःच मारले नाही. येथेही आर्याक्रमरवादानप्रमाणे नक्र हा आदिवासी होता व गजेन्द्राने विष्णूच्या कृपेने त्याला मारले असे का म्हणू नये? नक्र हाच वस्तुतः पाण्याचा निवासी आहे. हत्ती हा पाण्यात उपरा आहे असे म्हणून हत्ती व नक्र हे रूपक आर्य व अनार्य यांना लागू होण्यासारखे आहे. असेही तारे तोडता येतील.

१/३३/४ मध्ये दस्यूंना धनी म्हटले आहे. यावरून ते मानव होते व आक्रमक आर्यांनी त्यांना लुटले असे सिद्ध होत नाही. सायण येथे दस्यू हे वृत्राचे विशेषण समजतो व या वृत्राने सर्व प्रकाश, विद्या व नैवेद्य हडप केली होती असे सांगतो. हे एखाद्या मानवी



हडप्याचे काम असू शकत नाही.

**दासांची जातकुळी**

१/३३/४ म्हणते 'हे अश्विनींनो, दस्यूंना सोमबिंदूनी मारून आम्ही आपल्या इच्छा तृप्त करू. येथे सोमयागाचा संदर्भ स्पष्ट आहे. इंद्राला यज्ञात सोमाचा नैवेद्य दाखविल्याने तो दस्यूंना मारतो अशी श्रद्धा होती.

दस्यु या शब्दाप्रमाणेच दास या शब्दावर देखील बरेच वादंग माजले आहे.

५/३०/९ सांगतेः दासाने एक स्त्रियांचे सैन्य इन्द्राविरुद्ध पाठविले. इन्द्र म्हणाला, 'या स्त्रिया माझे काय वाकडे करणार?' इन्द्राने त्या स्त्रियांपैकी दोन आपल्या अन्तःपुरात घातल्या व तो दस्यूंशी लढण्यास पुढे आला. येथे सेना दासाने पाठविली व इन्द्र दस्यूशी लढण्यास पुढे आला यावरून दास व दस्यु हे समानार्थी देखील वापरले जात होते हे उघड आहे.

१०/२२/८ ची पहिली ओळ दस्यूंची विशेषणे सांगते व लगेच दुसरी ओळ हे दास म्हणून त्याच दस्यूंचा उल्लेख करते. अर्थात् दास व दस्यु हे एकरूपच होते व त्यामुळे दस्यूप्रमाणेच दासही अमानव होते. वरील ऋचेत ते मानव होते असे समजण्यास वाव असला तरी ते आदिवासी होते असे समजण्यास काहीही आधार नाही.

कुठे कुठे वृत्र आणि अहि यांना ऋग्वेदात दास म्हटले आहे. १/३२/११ दासांनी अडविलेले पाणी वृत्राला मारल्यामुळे मोकळे झाले असे म्हणते. वृत्र या शब्दाची व्युत्पत्ति वृ म्हणजे आवरण घालणे या धातूपासून आहे. मॅक्समूलरच्या मते अहि हा शब्द गोठणे या अर्थाच्या धातूपासून आहे. यावरून स्पष्ट होते की वृत्र आणि दास या पाणी आणि प्रकाश यांचा अवरोध करणाऱ्या शक्ती होत्या. म्हणजेच दस्यूप्रमाणेच दासही अमानव होते.

४/३०/१४ शम्बराला दास म्हणते. ऋग्वेदातला शम्बर हा मानव नाही हे मॅक्डोनेलने मान्य केले आहे. ५/३०/७ मध्ये नमुचि या असुराला दास म्हटले आहे. १०/४/९६ मध्ये दासासारखा वृत्र असा शब्दप्रयोग आहे. वृत्र आणि अहि यांना मॅक्डोनेल अन्तराळातील राक्षस म्हणतो.

अर्थात् दासांना अमानुप म्हटले आहे ते वाच्यार्थाने. याबद्दल काही शंका असेल तर ती १०/९९/६ मध्ये तीन डोक्याचा व सहा डोळ्यांचा दास वर्णिला आहे त्यावरून दूर व्हावी.

२/२०/६ मध्ये दास नमुचीला मानवासाठी मारून देवाप्रत जाण्याचा मार्ग मोकळा करण्याकरता आला असे सांगितले आहे. २/२०/६ व २/२०/७ या दोन्ही ऋचात दस्यूंना मानवहितासाठी मारले असे म्हटले आहे. दुसऱ्या महायुद्धात ब्रिटिश लोक देखील

मानवी हितासाठी हिटलरचा नाश करण्याची भाषा बोलत होते. यावरून हिटलर हा मानव नव्हता असे अनुमान निघत नाही. पण पाणी आणि पृथ्वी यांची निर्मिती (२/२०/७) व पाण्याचे विमोचन; १/३२/११, ५/३०/५, ८/९८/१८, ८/३२/२ या गोष्टी दस्युवधाने साधतात असे म्हटले आहे. हिटलरचा नाश केल्याने असे काही साधले असे म्हणता येणार नाही.

दस्युवध या मानवी इतिहासातल्या घटना नव्हत्या हे ऋग्वेदात स्पष्टपणे सांगितलेले आहे.

२/११/४ म्हणते, दस्यूचे प्रदेश व सन्तति आम्हाला सूर्यामुळे सहनीय कर! म्हणजे दस्यूवर सूर्य हा रामबाण होता. कारण दस्यू प्रकाशरोधक होते. ५/३३/४ म्हणते की सूर्याच्या निवासातून दस्यूंचे उच्चाटन केल्याने पाऊस पडेल. सूर्याचा निवास म्हणजे आकाश. या आकाशातच पर्जन्यरोधक दस्यु राहतात.

६/२६/५ मध्ये शम्बराला पर्वतशिखरावरून फेकले असे वर्णन आहे. शम्बर या शब्दाचा एक अर्थ पाणी असा आहे. येथे गोठलेले पाणी असा अर्थ केला तर गोठलेले पाणी वितळले व ते पर्वतशिखरावरून ओघळले असा अर्थ होतो.

२/१२/११ मध्ये शम्बर पर्वतात जाऊन लपला असे वर्णन आहे. हा पर्वतातील प्रवाहातले पाणी गोठल्याचा संकेत आहे. १०/३४/१ मध्ये दासाने द्यावपृथिवींना भिवविले, तेव्हा त्यांनी इन्द्राची प्रार्थना केली, इन्द्राने दासाला मारून देवांचे रक्षण केले असे म्हटले आहे. द्यावापृथिवींना भिववू शकणारा दास रानटी आदिवासी असू शकत नाही.

**दासही मानव नव्हते**

१/३८/३ म्हणते, 'जेव्हा दासाला कसे नमवावे याचे तंत्र आर्य इन्द्राला कळले तेव्हा सूर्याने आपले घोडे आकाशात सोडले.' येथे दास हे ग्रहण, वा काळे ढग असू शकतात. ८/४०/६ आपण दासाचे दडविलेले धन इन्द्राबरोबर वाटून घेऊ असे म्हणते. येथे अनार्य आदिवासींना लुटणाऱ्या परकीय आर्यांचे कुणाला दर्शन होईल. पण इतर ऋचांशी सुसंगत असा अर्थ केला तर हे दडविलेले धन म्हणजे दासाने रोखलेला पाऊस असा अर्थ करण्यात काही अडचण नाही. पाऊस पडून भूमी सस्यश्यामल झाली की इन्द्राला आहुत्या देऊन मानव त्याच्याबरोबर आपली समृद्धी वाटून घेत असतो.

१०/८३/३ मध्ये 'आमचा शत्रू वा दास आर्य कोणीही असो, त्याला तोंड देण्याचे सामर्थ्य आमच्यात असो.' असे प्रार्थिते. यावरून दासाप्रमाणेच आर्यांशी देखील वैदिकांच्या लढाया होत असे दिसते. येथे मॅक्समूलरप्रमाणे आर्य या शब्दाचा शेतकरी असा अर्थ केला तर दासाप्रमाणेच ऋचाकारांच्या भाऊबंदाशी देखील लढाया होत असे



म्हणता येते. हिमालयापासून रेवेपर्यंत व गांधारपासून आसामपर्यंत पसरलेल्या वैदिक भारतात वैदिकांच्या अनेक टोळ्या नव्हत्या व त्यांची आपसात युद्धे होत नव्हती असे मानता येत नाही.

७/१९/२ मध्ये शुष्ण व कुयव या दासांचा उल्लेख आहे. शुष्ण याचा अर्थ शुष्क करणारा व कुयव याचा अर्थ वाईट मिश्रण करणारा वा दूषक. यु मिश्रणे असा धातू आहे. अर्थात् शुष्णामुळे कोरडा दुष्काळ पडतो व कुयवामुळे पाणी दूषित हाऊन रोग पसरतात.

मॅक्डोनेल इलीबिश या शब्दात एखाद्या दासाचा उल्लेख असला पाहिजे असे म्हणतो. पण त्याबरोबरच या शब्दाचा अर्थ कसा करावा हे समजत नाही असेही म्हणतो! या शब्दाचा अर्थच जर मॅक्डोनेलला लागत नाही तर हे दासाचे नाव आहे असे तरी त्याने का म्हणावे? सायण या शब्दाचा 'भूमीच्या उदरात दडलेला' असा अर्थ करतो. इली म्हणजे इला वा पृथिवी बि हे बिलचे संक्षिप्त रूप व श हे शेते म्हणजे पहुडतो या धातूचे समासान्त रूप. येथे बिलचा ल का गळला याचे समर्थन हिरण्यामयचे हिरण्मय होते यावरून देता येईल. हा भूमीच्या उदरात दडलेला आर्यांचा शत्रू म्हणजे पर्वतांच्या खोल बिळामध्ये कोंडून राहिलेले पाणी. इंद्राने अशाही इलीबिशाला मारले याचा अर्थ सूर्याची उष्णता तेथेही पोचली व ते पाणी वितळले.

संस्कृत पंडित प्रा. रा. ना. दांडेकर पाश्चात्य संशोधकांची री ओढीत म्हणतात की दास हा शब्द पश्चिम एशियातील दाहे या आर्यविरोधी टोळ्यांवरून आला आहे. या शब्दात झालेल्या बदलावरून आर्यांचे स्थलांतर पश्चिमेकडून पूर्वेकडे झाले हे सिद्ध होते! यावर असे का म्हणू नये, की दास या शब्दाचे दाहे झाले व उच्चाराबरोबच अर्थही बदलला, यावरून आर्यांचे स्थलांतर पूर्वेकडून पश्चिमेकडे झाले!

दास हा शब्द मानवांना कुठे लागू नाही असे नाही. ८/५६/३ सांगते की पौतक्रताने १०० दास दिले. हे उषे, आम्हाला दासबहुल सम्पत्ती मिळो अशी १/९२/८ प्रार्थना करते. यावरून दास हे देण्यासारखे सेवक होते असे म्हणता येते. पण याचा आर्याक्रमणाशी काही संबंध आहे असे मानले तर दासप्रथा ग्रीक व रोमन समाजात देखील असल्यामुळे ग्रीस व रोमवरही आर्याक्रमण झाले असा सिद्धांत करता येईल.

८/४६/३२ मध्ये बल्बूथ दासाने विप्रांना शेकडो (गायी किंवा निष्क) दिले. 'बल्बूथ नावाचा दास राजाचा अधिकारी असताना' असा सायण अर्थ करतो. ऋग्वेदाचे एक भाष्यकार श्री. चित्राव हे बल्बूथ हाच यजमान होता असा अर्थ करतात. हाच अर्थ योग्य दिसतो, कारण यजमानाला धन द्यायचे असेल तरच त्याने अधिकृत केलेला अधिकारी धन देईल ना? पण सायणाला दास यज्ञ करीत होता व विप्र त्याचे पौरोहित्य करीत होते हे विचित्र वाटले. त्यामुळे त्याने यजमानालाच नोकर बनविले. निष्कासारखी दक्षिणा यजमान

स्वत: देऊ शकेल. पण गोधनासारखी दक्षिणा द्यायची असेल तर ती एखाद्या सेवकाकरवीच पोचविणार ना? निष्कांची दक्षिणा देखील शेकडो ब्राह्मणांना द्यायची असेल तर सेवकाकरवी द्यावीच लागेल. रमणबागेत दक्षिणा वाटण्यास पेशवे स्वत: बसत नव्हते!

**पणि व वणिक्**

वैदिक काळात अनेक शूद्र राजे होते व त्यांना दास म्हणत असत असे दाशराज्ञ युद्धाचा जेता सुदास याच्या उदाहरणावरून डॉ.आंबेडकर म्हणतात. सुदास या शब्दांचा अर्थ सुष्ठूंचा दास. म्हणजे सज्जनांचा दास असा असू शकतो. नुसते दास या नावाने कोणा राजाला संबोधले आहे असे दिसत नाही. दास शब्द हा दा धातूपासून मानला तर दास या शब्दाचा अर्थ दानी असादेखील होतो. तेव्हा मुळात दास या उपद्रव करणाऱ्या अतिमानवी शक्ती, नंतर उपद्रव करणारे मानवी शत्रू व सेवक असा अर्थ झाला. हे दास दिले घेतले जात असल्यामुळे गुलाम अशा अर्थाबरोबरच दास म्हणजे दानी असा देखील अर्थ झाला.

दास दिले जात होते एवढ्यावरूनच दासांना गुलाम म्हणता येत नाही. कन्यादान शब्दावरून कन्या ही गुलाम ठरत नाही. वैदिक वाङ्मयात दास विकले जाण्याचा कुठेच उल्लेख नाही. हल्ली देखील एका खात्याचे अधिकारी दुसऱ्या खात्याला दिले जातात. ते दास म्हणजे नोकर असले तरी गुलाम नसतात. या देण्याच्या पद्धतीला डेप्युटेशन म्हणतात. 'आर्यांमध्ये गुलामगिरीची प्रथा नाही' असे म्हणतात.ते ग्रीक व रोमन समाजाच्या तुलनेने म्हणतात. ग्रीसमध्ये ३/४ लोकसंख्या गुलामांची होती. सॉक्रिटीस, प्लेंटो व अरिस्टेटॉल यांनी गुलामगिरीचे समर्थन केले आहे. संस्कृत वाङ्मयात उल्लेखलिले गुलाम पण ते गुलाम कर्ज फेडू न शकल्यामुळे गुलाम झालेले असतात. कर्ज फेडल्यावर त्यांची मुक्ती होत असे. दुसरा कोणी त्यांचे कर्ज फेडील तर मूळ मालकापासून ते मुक्त होत. संस्कृतमध्ये गुलाम या शब्दाचा अर्थ नि:सन्दिग्धपणे व्यक्त करणारा शब्द नाही.

चाणक्याचा अर्थशास्त्र हा एकमेव ग्रंथ उपलब्ध आहे. चाणक्य 'आर्यात चाल नाही' असे म्हणतो तेव्हा सुसंस्कृत लोकात चाल नाही, असा त्याच्या म्हणण्याचा अर्थ आहे. आर्यावर्त म्हणजे सुसंस्कृत लोकांचा देश असा मनुस्मृतीत उल्लेख आहे. यावरून आर्य हे एका राष्ट्रीय मानवसमूहाचे नाव आहे असे ठरत नाही. जसे पाकिस्तान म्हणजे पाक वा पवित्र लोकांचा देश यावरून पाक हे पाकिस्तानी लोकांचे नाव आहे असे सिद्ध होत नाही.

मेगॅस्थेनिस व चाणक्य भारतात गुलामगिरीची प्रथा नाही असे म्हणतात, ते ग्रीक व रोमन समाजाच्या तुलनेने म्हणतात. ग्रीसमध्ये ३/४ लोकसंख्या गुलामांची होती, सॉक्रिटीस, प्लेटो व अरिस्टॉटल यांनी गुलामगीरीचे समर्थन केलं आहे. तसे गुलामगिरीचे समर्थन संस्कृत ग्रंथात आढळणार नाही. कोणत्याही नागरिकाने एखाद्या गुलामाला



चाबकाने मारले तर काही विशेष घडले असे ग्रीस व रोममध्ये कोणाला वाटत नसे. रोमन साम्राज्यात करमणुकीसाठी गुलामांच्या कत्तलींचा समारंभ होत असे.

दास शब्द दा म्हणजे देणे या धातूपासून होत असल्यामुळे सेवा देणारा तो दास या अर्थी शूद्रांना देखील तो शब्द लावीत असावे. पण दस्यु हा शब्द दा धातूपासून व्युत्पादिता येत नाही, म्हणून दस्यु शब्दाचा अर्थ सेवक असा न होता बाधा करणारा चोर व दरोडेखोर असाच कायम राहिला.

सायण दास याचा 'जे शत्रूला पीडा देतात ते' असा अर्थ करतो. असे लोक म्हणजे सैनिक. ते सेवकही असतात व पीडाही देतात. तेव्हा दास हा शब्द फक्त सैनिक रूपाने सेवा करणारे व नंतर कोणत्याही प्रकारची सेवा करणारे असा झाला.

दास आणि दस्युप्रमाणेच पणि हे वैदिकांची तिसरे शत्रू म्हणून अनेक वेळा उल्लेखिलेले आहेत.

१०/१०/८ हे सूक्त पणीबद्दलचे प्रधान सूक्त आहे. या सुक्तात म्हटले आहे की सरमा ही कुत्री पणींनी चोरलेल्या गायींच्या शोधासाठी इन्द्राने पाठविलेली असते. पणी तिला प्रलोभने दाखवून फितवू पाहतात, पण ती बधत नाही.

सरमा पणींचा शोध घेत रसा पार करून आली असे वर्णन आहे. रसा ही सिंधूची उपनदी आहे. यावरून स्वारी करून येणारे आर्य रसेच्या पश्चिमेकडे राहत होते व पणी या अनार्यांनी आर्यांच्या गायी पळवून रसेच्या पूर्वेकडील आपल्या निवासाकडे नेल्या असे अनुमान काढण्यात येते. पण रसा पार करून येणे हा फार मोठा पराक्रम आहे असे पणी का समजत होता? वैदिक काळी समुद्रावर चालणाऱ्या नौका वापरात होत्या. त्यामुळे वेदामध्ये रसा पार करणे हा फार मोठा पराक्रम समजण्याचे कारण नव्हते. शिवाय रसा पार केल्यावरही पूर्वेकडून पश्चिमेकडे वा पश्चिमेकडून पूर्वेकडे जाता येते. तेव्हा या वाक्यावरून आर्याक्रमणाची दिशा ठरविता येणार नाही.

रसा या शब्दाने एखादी नदी विवक्षित नाही. सायण रसा ही आकाशातली नदी आहे असे म्हणतो, ते खरेच आहे. रसा शब्दाची व्युत्पत्ती सायण रस म्हणजे निनादणे या धातूपासून देतो. निनादणारी व पाण्याने तुडुंब भरलेली आकाशातली नदी म्हणजे गंगा. इंद्र पूर्वदिशेस राहतो अशी समजूत आहे. पूर्वबिन्दु हा क्षितिजाला टेकलेला आहे. म्हणजे इंद्राचा निवास आकाशात असला तरी ढगांच्या खाली आहे. त्यामुळे सरमेला पणींच्या शोधासाठी पाण्याने ओथंबल्या ढगाच्या पार जावे लागले.

सरमा म्हणजे कुत्री. ग्रीकांनी दोन ताऱ्यांना कॅनिस मेजर व कॅनिस मायनर : (लहान व मोठा) कुत्रा म्हटले आहे. या ताऱ्यांना भारतीय खगोलात व्याध म्हणजे शिकारी म्हटले आहे. पण कुत्रा हा देखील शिकारी असू शकतो.

## पणी देखील अमानव

ढगांच्या पलिकडे व्याधाच्या ताऱ्याजवळ राहणारे पणि हे मानव असू शकत नाहीत. पण् धातूचा अर्थ व्यापार करणे असा आहे. पणींना लावलेला दुसरा शब्द बेकनाट असा आहे. सायण याचा विग्रह द्वि एक, नाट म्हणजे नाचविणे या तीन शब्दात करून एक दोन वगैरे तोंडी हिशेब सांगून नाचविणारे असा करतो.

तिसरा शब्द ग्रथी असा आहे. ग्रथी याचा अर्थ बांधून ठेवणारे असा होतो. आपल्याला फायदेशीर असे करार करून लोकांना वांधून ठेवणारे असा शब्द स्पष्ट आहे.

अक्रतु, अयज्वे व अश्रद्ध ही विशेषणे स्पष्ट आहेत. ती दास व दस्यूंना देखील लावलेली आहेत. ती साऱ्याच अतिमानवी शक्तींना लागू होतात.

वरील विशेषणांवरून पणी हे मानव होते असे वाटेल. पण हे अनुमान घाईचे आहे. हे पुढील वर्णनावरून स्पष्ट होते. 'हे मित्रा वरुणांनो, पणींना तुमच्यासारखे देवत्त्व प्राप्त करता आले नाही' असे १/१५/१९ म्हणते ही भाषा कवडीचुंबक व्यापाऱ्याबद्दल कोणीही वापरणार नाही. पणी अतिमान होते. व ते आपली शक्ति मानवाला त्रास देण्यासाठी वापरत होते. मित्रावरूण पाऊस पडून मानवाला समृद्धि प्रदान करीत होते, उलट पणि पाऊस रोखून जनतेला उपाशी मारू इच्छित होते.

१/१८/२३ अश्विनीकुमारांना प्रार्थिते की पणींना मारून तुम्ही विप्रासाठी प्रकाश निर्माण करा. पुष्कळ वेळा नको असलेल्या वेळी आकाशात पावसाचे काळे ढग जमतात पण ते पाऊस पाडत नाहीत. यापेक्षाही ते सूर्यप्रकाश अडवितात याचे दुःख जास्त असते. अभ्राच्छादित आकाशाला दुर्दिन म्हणतात. कारण त्यामुळे विमनस्कता येते. 'मेघालोके भवति सुखिनोऽप्यन्यथावृत्ति चेतः' सुखी माणूसदेखील आकाशात काळे ढग जमले की विषण्ण होतो. 'हे कालिदासाचे वचन प्रसिद्ध आहे. प्रकाश अडवून असा दुर्दिन निर्मिणे हेही पणींचे काम आहे. ४/५८/४ म्हणते पणींनी तीन प्रकारचे तूप गायींमध्ये अडवून ठेवले. पण इन्द्राने दूध, सूर्याने दही व अग्नीने तूप मोकळे केले. याचा अर्थ स्पष्ट आहे. पणींनी पाऊस रोखल्यामुळे गायींना चारा मिळेना त्यामुळे त्या आटल्या. इन्द्राने पाऊस पाडून त्यांना चारा दिला. त्यामुळे त्या दूध देऊ लागल्या, सूर्याने त्या दुधाला आंबवून त्याचे दही करण्याचे काम केले. या दह्यातून लोणी तयार झाले. मग अग्नीने लोण्याचे तूप करण्याचे काम केले.

वर सांगितलेली कृत्ये करणारा पणि मानव असू शकत नाही.

६/१३/३ म्हणते, हे अग्ने, विजेसोबत तू कुणालाही पाठविलेस तरी तो वृत्राचा वध करतो व पणींचे धन व शक्ती हरण करतो. येथे विवक्षित असलेला अग्नि ऋतजात म्हणजे यज्ञात पेटविलेला आहे. यज्ञाने पाऊस पडतो अशी श्रद्धा होती. यज्ञाग्नि वृत्रास मारतो



असेही मानीत. वृत्राला मारल्याने पाण्याचा अडथळा दूर होतो व पाऊस पडल्याने होणाऱ्या समृद्धीने पणींची न्यूनताजनक शक्ति नष्ट होते व समृद्धि नान्दते अशी ही विश्वासपरंपरा आहे.

१०/६७/६ मध्ये गायी दडवून ठेवणाऱ्या बलाला इन्द्राने फक्त ध्वनीने मारले. त्याने मरुताशी सख्य केले. पणींना रडविले आणि गायी सोडवून आणल्या. येथे इन्द्र, बल व मरुत् हे तिघेही अतिमानव आहेत. मग पणींनाच तेवढे मानव का म्हणावे? या ऋचेत काय म्हटले आहे ते स्पष्ट आहे. पर्जन्यदेव इन्द्राने पणींना कोंडून ठेवलेल्या मेघांना योग्य ठिकाणी आणले व पाऊस पडला तेव्हा पणि रडू लागले.

फक्त मानवांनाच कंजूष म्हणता येते असे नाही. १/३३/३ मध्ये इन्द्राला आपल्या भक्ताशी वागताना तू पणि होऊ नकोस असे म्हटले आहे. ८/४५/१ मध्ये इन्द्रालाच पणि म्हटलेले आहे. यावरून 'कशास रोधू देवा तुमचे कृपणाचे दार?' ही नामदेवाची उक्ती आठवल्याशिवाय राहणार नाही.

नंतरच्या संस्कृत वाङ्मयात गो हा शब्द गाय या अर्थीच वापरला आहे. कोशात त्याचा अर्थ पाणी असा दिला असलातरी त्या अर्थी त्याचा वापर विरळा आहे.

## अन्तराळातील राक्षस

९/१०८/६ मध्ये खडकात दडलेल्या गायी सोडविल्याचे म्हटले आहे. १०/३८/१० ची हीच भाषा आहे. तेव्हा या गायी म्हणजे दूध देणारे चतुष्पाद नव्हेत. गौना अप्या म्हटले आहे. तेव्हा येथले पाणी हे खडक फोडून केलेल्या विहिरीतले वा काळ्या ढगातले आहे.

ऋग्वेद काळात खडक फोडण्यास सुरुंग उपलब्ध नव्हते हा आक्षेप गैरलागू आहे. खडक ठोकून फोडता येतो. कापून वा खणून नव्हे. तेव्हा ऋग्वेदकाली ताम्ब्यापेक्षा कठिण धातू उपलब्ध नसली तरी ताम्ब्याच्या हातोड्याने खडक फोडणे शक्य होते.

१/३२/१ म्हणते : ज्याप्रमाणे पणींनी गायी आटविल्या होत्या त्याचप्रमाणे दास आणि अहि यांनी पाणी अडविले.

एकूण असे दिसते की गौ म्हणजे एक संपत्ती मोजण्याचे परिमाण होते. ४/२४/१० अनुसार गायी हेच विनिमयाचे माध्यम म्हणून वापरीत. वैदिक समाज शेतकऱ्याचा होता. जनतेला कृष्टी म्हणजे कास्तकार असे म्हटले आहे. जनतेचे मुख्य दैवत पाऊस पाडणारा इन्द्र हे आहे. अवृष्टि व अतिवृष्टि हे शेतकऱ्यांचे दोन शत्रू आहेत. या दोन्हींचा विध्वंस करण्याची प्रार्थना इन्द्राला सततच केली जाते. पणीसारखे शत्रू कोणतेही संकट न कळता निर्माण करतात. कुठे गायींमध्ये रोग पसरवून किंवा पिकांना टोळांच्या भक्ष्यस्थानी घालून. गायी चांगले दूध देत असता मध्येच चारापाण्याची ददात निर्माण करून गायींना

आटवून टाकतात. लवाड सावकाराप्रमाणे ते असा हिशेब करतात की आम्हाला नेहमीत जे मिळायला पाहिजे त्याच्यापेक्षा पुष्कळच कमी मिळते.

१०/१०/८ म्हणते 'ज्या गायी ब्रह्मणस्पति सोम व सोम कुटणारा वरवंटा आणि ऋषि यांनी मिळविल्या त्या निसर्गक्रमानेच बाहेर येवोत. पणि नावाच्या मानवी शत्रूंना मारून जर या गायी हस्तगत करायच्या असत्या तर ब्रह्मणस्पति व सोम कुटणारा वरवंटा यांना त्या मिळोत असे म्हणण्यात काहीच अर्थ नव्हता. त्या यज्ञ केल्याने मिळतात म्हणून यज्ञात सहभागी असलेल्या सर्वांना त्या मिळोत अशी इच्छा व्यक्त केली आहे. या गायी यज्ञ केल्याने निसर्गक्रमाने येतात. त्यांना दाव्याला बांधून आणावे लागत नाही.

मॅक्डोनेल पर्णींना अंतराळातील राक्षस म्हणतो. पण लगेच पुढील काळी हा शब्द अनार्य शत्रूंना लावू लागले असे म्हणतो. या पुढील काळातल्या ऋचा कोणत्या हे तो सांगत नाही. तेव्हा आपणच हे काम करून पाहू.

१०/६०/६ असमातीला म्हणते, 'अगस्त्यांच्या हितासाठी आपल्या रथाचे घोडे जोड. अदात्या पर्णींर चाल कर.' येथे मानवी शत्रूवर चाल करायची आहे, असे वाटेल. पण असमातीने तसे काही केले नाही. त्याने अग्नीची प्रार्थना करून सुबन्धूला जिवंत केले. तेव्हा असमातीला ज्या पर्णींवर चाल करायला सांगितले आहे तो अकाल मृत्यू घडवून आणणारा आहे.

बृहद्देवतेमध्ये वरील सूक्ताचा संदर्भ सांगितला आहे. अगस्त्याची बहिण व सुबन्धूची आई यांनी असमातीला वरील सूक्तातली विनंती केली आहे. अग्नीने सुबन्धूला कसे जिवंत केले हे विसाव्या व अकराव्या ऋचेत सांगितले आहे.

सायण या सूक्तावर भाष्य करताना खालील कथा सांगातो. असमाति हा इक्ष्वाकु वंशातला राजा होता. बंधू, सुगन्धु, श्रुतबन्धु आणि विप्रबन्धु हे त्याचे चार पुरोहित होते. असमातीने त्यांना बडतर्फ करून जादूमध्ये प्रवीण असलेले असुर पुरोहिताचे काम करण्यास नेमले. बडतर्फ पुरोहित नाराज झाले व त्यांनी राजावर चेटुक करण्यास सुरुवात केली. असुरांना हे कळले तेव्हा त्यांनी सुबन्धूला मारले. सुबनधूच्या भावाने वरील ऋचा म्हणून प्रार्थना केली.

बृहद्देवतेनुसार किरात आणि आकुलि या दोन असुरांनी असमातीचे मन कलुषित केले. त्याच्या करवी सुबन्धूला मारविले. आणि त्याच्या लहान भावांना हद्दपार केले. पण हे खरे मानले तर असमाति हा सुबन्धुचा शत्रू ठरतो व त्याने सुबन्धूच्या वतीने प्रार्थना करणे विचित्र वाटते. त्यामुळे पर्णींच्या विरुद्ध रथ जोडण्याची विनन्ति इन्द्राला केली आहे, असमातीला नव्हे, असे मानले पाहिजे. सायणाला चिकटून राहायचे तर सुबन्धूच्या मातेने असमातीची करुणा भाकल्यामुळे तो प्रसन्न झाला असे मानता येते. ते कसेही



असले तरी येथे कोणत्याही मानवी युद्धाचा उल्लेख नाही.

**यज्ञ आणि युद्ध**

दास व दस्यु हे शब्द उत्तर कालात मानवांना उद्देशून वापरले गेले. पण पणी हा शब्द नन्तरच्या संस्कृतात कुठेच वापरलेला नाही. व्यापाऱ्याला वणिक् हा शब्द वापरलेला आहे. 'प' चा 'व' होऊ शकतो.

पुढील काळातील फोनीशियन व्यापारी हे पणींचे पूर्वज आहेत अशी आर्याक्रमणवाद्यांची एक कल्पना आहे. पणि म्हणजे व्यापारी या अर्थाने फोनीशियनांना पणि हा शब्द लागू होउ शकतो. याव्यतिरिक्त त्याचा वैदिक पर्णींशी काही सम्बन्ध दाखविता येत नाही. मूळ भाषेत व्युत्पत्तिमान् असणारा शब्द दुसऱ्या भाषेने घेतला तर व्युत्पत्तिहीन होतो या न्यायाने पणि हा शब्द फोनीशियनपेक्षा प्राचीन ठरतो व शब्दांचे स्थलान्तर भारतातून पश्चिमेकडे झाले या सिद्धान्ताला पाठबळ मिळते. यज्ञात देवांना प्रार्थना करण्यासाठी रचल्या गेल्या हे लक्षात ठेवले की दास, दस्यु व पणि यांना मारण्यासाठी या ऋचांत केलेल्या प्रार्थना या यज्ञातल्या प्रार्थना होत्या व या दुष्ट शक्तींशी केलेले संग्राम म्हणजे हे यज्ञच हे स्पष्ट होते. ३/२/९९ वर भाष्य करताना सायण म्हणतो की वेदामध्ये यज्ञ हा शब्द युद्ध या अर्थी वापरला गेला आहे. १०/२७/२४ म्हणते 'आदित्य हा तुमचा प्राण आहे. त्याला ओळखा. समर्यामध्ये लपवून ठेवू नका. आदित्याने आकाश प्रकाशते, पणींनी ते अन्धारते. त्या शुद्धात्म्याचे गमन कधी थाम्बतच नाही.' येथे समर्य म्हणजे यज्ञ असा अर्थ केल्यानेच संगती लागते. युद्ध असा अर्थ केल्याने घोटाळाच होतो. 'भाण्डू नका. तुमच्या भाण्डणाने सूर्य झाकला जातो. सूर्याला झाकू नका. त्याला जाणण्याचा प्रयत्न करा.' असा शिपायांना उपदेश करणे विचित्र आहे. सूर्य झाकला जाणे हा युद्धाचा सर्वात मोठा दुष्परिणाम आहे काय? समर्य या शब्दाचा सायणानुसार यज्ञ असा अर्थ केला तर नीट अर्थ लागतो. कर्मकाण्ड काटेकोर पाळल्याने पुण्य मिळत असेल पण ज्या देवतेचे आराधन करण्यासाठी कर्मकाण्ड पाळले त्या देवतेचे स्वरूप कळण्यास या कर्मकाण्डाने काही मदत होईल काय? त्यासाठी मन्त्रामध्ये वर्णिलेले त्या देवतेचे स्वरूप सतत चिन्तनाने मनावर ठसले तर देवतेचे ज्ञान अधिक होईल.

१०/८/७४ म्हणते: 'हे अग्ने, आमच्या सूक्तांनी व यज्ञांनी तुझे बाण तीक्ष्ण होऊन तू राक्षसांच्या हृदयावर त्यांनी प्रहार करावेस' म्हणजे ऋचांनी अग्नीचे बाण तीक्ष्ण होतात व तो मन्त्र गायकाच्या शत्रूंवर त्या बाणांनी प्रहार करतो.

समर शब्द यज्ञाला लावल्यामुळे व ऋग्वेदात यज्ञाचे सन्दर्भ विपुल असल्याने ऋग्वेदात युद्धेच युद्धे आहेत ही कल्पना फोफावली. वस्तुतः ऋग्वेदात दाशराज्ञ युद्धाखेरीज दुसरे युद्ध नाही.

दास दस्यु व पणी यांना मारण्याचे काम इन्द्र स्वतः करतो. इन्द्राच्या कृपेने वैदिक लोक ते काम करतात असे वर्णन नाही. यावरूनही दास / दस्यु / पणि यांचा संहार हे आर्य / अनार्यांचे मानवी युद्ध नव्हते ही गोष्ट स्पष्ट होते. कधी कधी अग्नि वा अश्विनीकुमार हे काम करतात.

या पेचातून सुटण्यासाठी पेरी या आर्याक्रणवाद्याने इन्द्रालाच मानव व आर्यांचा राजा करून टाकले. साहेबानेच तसे केल्यावर रा.ना.दाण्डेकरही तसेच म्हणाले.

वस्तुतः इन्द्र हा मेघगर्जना व पाऊस यांच्याशी सतत जोडलेला असतो. पावसाळ्यात आकाशात दिसणारे सप्तरङ्गी धानुष्य इन्द्राचे धनुष्य म्हणून प्रसिद्ध झाले. मरूत् म्हणजे वादळी वारे हे त्याचे मित्र आहेत. पृथ्वी दहापट मोठी झाली तरी इन्द्राला सामावून घेऊ शकणार नाही असे इन्द्राचे वर्णन करणारे सूक्तकार काय एखाद्या मानवाचे वर्णन करीत होते ? इन्द्रानेच आकाशात सूर्याची स्थापना केली व उडणाऱ्या पर्वतांना स्थिर केले. आकाश आणि पृथिवी पूर्वी एकमेकाला चिकटलेले होते. ते इन्द्रानेच वेगळे केले.

**इन्द्राची जातकुळी आणि लिंगपूजा**

रथाचा अक्ष ज्याप्रमाणे दोन चाकांना दूर ठेवतो तसे इन्द्राने द्यावापृथिवींना एकमेकांपासून दूर ठेवले व मानवाला राहण्यासाठी जागा केली. (२/१२)

अशा इन्द्रालाही पेरी व दाण्डेकर मानव म्हणायला धजावतात व याला आधार ३/४८ व ४/१८ मध्ये इन्द्राचा जन्म वर्णिलेला आहे हा देतात. पण या जन्माच्या वर्णनातच हा मानवाचा जन्म नव्हे हे पुरेपूर स्पष्ट केले आहे. इन्द्राने जन्मल्याबरोबर त्वष्ट्याला मारले. हे बाळ कधी दूध प्यालेच नाही. त्याचे अन्न सोमच होते. तो अदितीच्या गर्भात हजार वर्षे होता. तो कधी तान्हा नव्हताच, एकदम तरुण म्हणूनच जन्माला आला.

जन्मल्याबरोबर इन्द्राने बाण हातात घेतला व दरडावून 'कोण उग्र आहे?' असे विचारले (८/४५/४) जन्मल्याबरोबर त्याने आकाशाचे फिरणेच बन्द केले. (८/७९/१५). ही सर्व मर्त्य मानवाच्या जन्माची वर्णने आहेत असे समजणे हास्यास्पद आहे.

इन्द्र सोमाचा भोक्ता आहे हे त्याच्या मानवत्त्वाचे लक्षण आहे असे दाण्डेकर समजतात. मग त्याच न्यायाने शिवही सोमाचा भोक्ता म्हणून मानव का समजू नये? ५/२९/७ सांगते की इन्द्राने सोमाची तीन सरोवरे पिऊन फस्त केली. हे मानवाचे वर्णन आहे काय?

इन्द्राप्रमाणेच राम आणि कृष्ण यांची देखील अद्‌भुत अमानवी कर्मे वर्णिली आहेत. रामाने शरसन्धान करून समुद्राला शरण आणले. कृष्णाने गोवर्धन उचलला व परीक्षिताल जिवन्त केले. तरी राम आणि कृष्ण हे ऐतिहासिक पुरुष होते असे काही इतिहासकारही समजतात. कारण जन्मापासून मृत्यूपर्यन्त त्यांचे चरित्र विस्ताराने वर्णन केले आहे. त्यांच्या जन्माच्या तिथ्या दिल्या आहेत. त्याच्या जीवनात अद्‌भुत कृत्ये फार थोडी आहेत.



रामाने समुद्रावर सेतु बान्धला म्हणजेच त्याला वठणीवर आणले. हीच गोष्ट काव्यमय रीतीने वर्णिण्यासाठी आपल्या बाणाचा धाक दाखवून रामाने समुद्राला सेतूच्या बन्धनात टाकले असे वर्णन केले आहे. राम / कृष्णांच्या चरित्रातून असम्भव भाग काढून टाकला तरी ते चरित्र सुसंगत रीतीने माण्डता येते. पण इन्द्राच्या करामतीतील साराच अद्‌भुत भाग काढायचा प्रयत्न केला तर काही उरणारच नाही. राम व कृष्ण मानव असल्याचे रामायण / महाभारतातच उल्लेख आहेत. इन्द्र मानव असल्याबद्दल एकही उल्लेख ऋग्वेदात नाही.

इन्द्राला मानव मानण्याचा खटाटोप केल्यावरही आर्याक्रमणवाद्यांना चैन पडणार नाही असे भाग इन्द्राच्या चरित्रात उरतात. सेग म्हणतो की व्यंस दास हा इन्द्राचा बाप होता. ज्या वृत्राला इन्द्र मारतो तो त्वष्टा या वैदिक देवाचा मुलगा असतो. त्वष्ट्याने ब्रह्मणस्पतीला निर्माण केले. म्हणजे त्वष्टा हा ब्राह्मण होता व वृत्राला मारल्याने इन्द्राला ब्रह्महत्येचे पाप लागले.

'लिंगपूजा व एकूणच मूर्तिपूजा ही अनार्यांची पूजापद्धति होती, आर्यांची यज्ञ करणे ही होती. इन्द्र हा आर्यांचा देव व शिव हा अनार्यांचा. ऋग्वेदात लिंगपूजकांचा धिःकार केला आहे' असे एक आर्य / अनार्य संघर्षाचे स्वरूप सांगण्यात येते.

ऋग्वेदात लिंगपूजेचा वा मूर्तिपूजेचा धिःकार आहे या म्हणण्याला काडीचाही आधार नाही. ऋग्वेदकाली मूर्तिपूजा अस्तित्वात होती हे दाखविणारे उल्लेख पूर्वी सांगितलेच आहेत.

७/२/१५ मध्ये 'शिस्नदेव आमच्या यज्ञात न येवोत' अशी प्रार्थना आहे. यावरून याजक व लिंगपूजक यांच्यातील वैराचे अनुमान काढण्यात आले आहे. पण असे अनुमान त्यातून निघत नाही. लिंगपूजक यज्ञाचा विध्वंस करण्यासाठी येत होते असे वर्णन नाही. ते येऊ नयेत अशी इच्छा व्यक्त केलेली असल्यामुळे ते अनाहूत होते असे म्हणावे तर ते 'तुम्ही यज्ञास येत जाऊ नका' असे म्हटल्यावरही निर्लज्जासारखे येतच होते असे समजायचे काय? तसे येत असतील तर त्यांचे निवारण करण्याचे सामर्थ्य वैदिकांजवळ नव्हते असा निष्कर्ष काढावा लागतो.

वाजवी निष्कर्ष असा की लिंगपूजक लोक यज्ञसंस्थेला नाकारणारे नव्हते. पण काही वैदिकांना त्यांच्यापासून दूर राहायचे होते. लिंगपूजकांनी येऊ नये असा उघड निर्बन्ध करणे शक्य नव्हते. का शक्य नव्हते हे आज कळायला हरकत असू नये. लिंगपूजेबद्दल लाज बाळगणारे आजही अनेक हिन्दू आहेत. पण माझ्या घरी लिंगपूजकांनी येवू नये असा दण्डक घालू शकत नाहीत. कारण हा पूजाविधि समाजमान्य आहे. तेव्हा आपण मज्जाव केल्याशिवाय तेच स्वतः न आल्यास बरे असे कोणाला वाटू शकते.

काही लोक असे म्हणतात की लिंगपूजक कोण हे ओळखणे शक्य नव्हते असे मानून

लिंगपूजक म्हणजे कामपरवश असा अर्थ केला पाहिजे. कामपरवश कोण हे ओळखू येत नाही. त्यामुळे इन्द्रासारख्या दैवी शक्तीचे साहाय्य हा ऋचाकार मागत आहे. शिस्नेन दीव्यन्ति म्हणजे लिंगाशी खेळणारे वा आत्ममैथुनी लोक अभिप्रेत आहेत असेही मत आहे. ही मते बाजवी असली तरी शिस्नदेव हा लिंगपूजकांचा स्पष्टपणे वाचक शब्द वापरून आडवळणाने हा भाव व्यक्त करण्याची काय जरूर होती हा प्रश्न उरतोच.

लिंगपूजक याचा अर्थ आर्याक्रमणवाद्यांना पाहिजे तसाच केला तरी त्यावरून फक्त वैदिक समाजातच आजच्या हिन्दू समाजाप्रमाणेच लिंगपूजा प्रचारात होती असे सिद्ध होईल. लिंगपूजा करणारे वैदिक समाजापेक्षा वेगळे असे आदिवासी लोक होते व वैदिक परकीय होते या मताचा वासही त्यात येणार नाही.

१०/९/९३ मध्ये इन्द्राने शिस्नदेवाच्या पुरावर हल्ला करून त्यांना मारले असा स्पष्ट उल्लेख आहे. एकूण शिस्नदेवांना इन्द्रच मारतो व तोही यज्ञातल्या प्रार्थना ऐकून. यावरून हे शिस्नदेव नुसते मानवी शत्रू नव्हते. शिस्नदेव कोण हे फक्त इन्द्रालाच कळू शकत होते. याच सूक्तात 'शतदुरस्य वेदो' म्हणजे 'शम्भर दारात बन्द असलेल्याचे सत्य' इन्द्राने ओळखले असे म्हटले आहे. तेव्हा अशा ऋचामध्ये शिस्नदेव ही कामविषयक पापे गुप्तपणे करणारे होते व हे त्यांचे बिंग इन्द्रालाच कळत होते असे अनुमान निघते. अर्थात् शिस्नदेव हे आदिवासी अनार्य नव्हते.

शिस्नदेवाबद्दलच्या दूषक उद्‌गारांवरून येथे वैष्णव करीत असलेला लिंगपूजक शैवांचा दुःस्वास पाहणे योग्य नाही. कारण विष्णूचे देखील शिपिविष्ट असे एक नाव होते असे ७/१००/६ मध्ये म्हटले आहे. या नावाचा अर्थ लिंगासारखा विष्ट म्हणजे प्रविष्ट असा होतो. विश् म्हणजे शिरणे या धातूला ष्णु हा नामसाधक प्रत्यय लावून विष्णु शब्द तयार होतो व असाच अर्थ त्यातून निघतो. नवनवीन तऱ्हेच्या कपड्यांचा शोध लागल्यावर शरीर उघडे ठेवणे जवळपास बन्द झाले व जननेन्द्रियाबद्दलची जुगुप्सा वाढत गेली. पूर्वी उष्ण ऋतूमध्ये देखील सर्वच अङ्ग झाकलेले असावे असा कटाक्ष बाळगण्याचे कारण नव्हते. देवतांची कल्पना लिंगरूपाने करण्याची प्रवृत्ती या काळची असली पाहिजे. लिंगामध्ये स्वयमेव घाणेरडे असे काही नाही. त्याचा संबंध विसर्जनाशी असल्यामुळे त्याची जुगुप्सा वाटते. पण ज्याकाळी कमीत कमी वस्त्रे वापरण्याची चाल होती तेव्हा लिंगाचे दर्शन अधिक सहजतेने होत होते व ते नेहमी घाणेरडेच वाटत होते असा संभव नाही. जनन हे त्याचे काम असल्यामुळे ते पूज्य देखील वाटू शकते.

लिंगाबद्दलच्या या दोन परस्पर विरुद्ध भूमिका आधुनिक समाजातही आहेत. डी. एच. लॉरेन्सची लिंगाबद्दलची वृत्ती अश्लील आहे म्हणून त्याच्या लेडी चॅटर्लीज लव्हर या कादंबरीवर बंदी घालण्यात यावी अशी मागणी करण्यात आली होती. न्यायालयाने या



कादंबरीतील वर्णने उत्तान असली तरी अश्लील म्हणजे घाणेरडी नाहीत, त्यात साहित्यिक गुण आहेत असा निर्णय दिला. एकाच इंग्रज समाजात एक कादंबरी काही लोकांना अश्लील वाटली उलट दुसऱ्यांना तिच्यात साहित्यिक सौंदर्य दिसले. त्याचप्रमाणे काही लोकांना लिंगपूजा घाणेरडी वाटली तरी काही लोकांना तिच्या द्वारे भक्तीचा व पावित्र्याचा अनुभव येऊ शकतो. त्यामुळे लिंगपूजा व तिला विरोध हे दोन्ही एकाच संस्कृतीत व एकाच समाजात नांदू शकतात.

## पुरंदर इन्द्र

शिवपूजेला एतद्देशीय व शिवनिन्देला जेत्याशी संबंधी ठरविण्यासाठी आणखीही काही युतिवाद केले जातात. शतरुद्रीयात रुद्राला चोरांचा राजा म्हटले आहे. नंतरच्या वाङ्मयात त्याला उच्छिष्टमाक् असे देखील म्हटले आहे. याचे कारण सगळ्या देवांना त्यांचा भाग दिल्यावरच रुद्राला नैवेद्य दिला जातो. अग्निहोत्रामध्ये प्रजापतीला दिलेल्या दुसऱ्या आहुतीनंतर पळीची विशिष्ट हालचाल करून पुरोहित रुद्राला जायला लावतो. या सगळ्यावरून रुद्र ही सुरवातीला अनार्यांची देवता होती असे दांडेकर अनुमान काढतात.

रुद्रा हा चोर/भूत/प्रेतादिकांचा पति आहे कारण ते फक्त रुद्राची आज्ञा पाळतात. इतर देवांना ते जुमानीत नाहीत. पळीने रुद्राचे विसर्जन हा रुद्राचा अपमान नाही. गणपतीची स्थापना आणि विसर्जन केले जाते. विसर्जन हा गणपतीचा अपमान आहे असे कोणीही समजत नाही.

रुद्र ही ऋग्वेदातली एक प्रधान देवता आहे. १/११४/३ मध्ये रुद्राला म्हटले आहे 'हे रुद्रा, यज्ञ करून आम्ही तुझा अनुग्रह संपादितो.'

'घ्नन् शिस्नदेवान' या शब्दप्रयोगावरून वैदिक लोक शिवपूजेच्या विरुद्ध होते असे मानले तर १०/२३/५ मध्ये 'इंद्राने अशिवांना मारले' या शब्दप्रयोगावरून आर्य शिवाला न मानणाऱ्यांना शत्रू समजत होते असे का म्हणू नये?

ऋग्वेदात क्वचित् असुर हेही वैदिकांचे शत्रू म्हणून वर्णिलेले आहेत. पण एका ऋचेत महद्देवानामसुरत्वमेतद् - देवांचे असुरत्व महान् आहे - असेही म्हटले आहे. पारशांच्या आवेस्त्यात असुर हा शब्द गौरवार्थी व सुर हा शब्द निन्दार्थी आहे. याचे कारण ऋग्वेदात एके काळी आदराने संबोधलेले व नंतर निन्देस पात्र झालेले असुर हेच झरथुष्ट्राचे अनुयायी होत. असुर हा शब्द असु म्हणजे प्राण या शब्दापासून झाला आहे अर्थात् असुर म्हणजे जीवनोत्फुल्ल. आवेस्त्यात 'येथे माझे कोणी एकेत नाही म्हणून मी देशत्याग करतो' असे झरथुष्ट्राच्या तोंडी उद्‌गार आहेत. आवेस्त्याची भाषा व ऋग्वेदाची भाषा यातील फरक फक्त उच्चारांचा आहे व उच्चारपरिवर्तनाचे नियम लावले की ऋग्वेदाचे आवेस्त्याच्या भाषेत व आवेस्त्याचे ऋग्वेदाच्या भाषेत परिवर्तन होऊ शकते असे मॅक्डोनेल म्हणतो. यावरून

त्याने ऋग्वेद आवेस्त्याहून ५०० वर्षे प्राचीन आहे असे अनुमान काढले आहे. तात्पर्य ऋग्वेदात पश्चिमेकडून आलेल्या लोकांचे स्थलांतर वर्णिले असणे तर दूरच राहिले, भारतातूनच इराणकडे स्थलान्तर झाल्याचा पुरावा आहे.

इंद्र शत्रूची पुरे फोडीत असे व त्यामुळे त्याला पुरंदर म्हटले आहे. इन्द्राने फोडलेली ही पुरे म्हणजे मोहंजोदरोत सापडलेली भग्न तटबंदीची शहरे असे म्हणण्यात आले आहे. पण मोहेंजोदरो व हरप्पा येथील अवशेषात सापडणारी संस्कृती पूर्णपणे वैदिक आहे, ती कुणी मुद्दाम नष्ट केल्याचा काहीच पुरावा नाही. येथे या संबंधीच्या वैदिक ऋचांचा विचार केला पाहिजे.

१/१/३/१४ म्हणजे 'हे इन्द्रा, तू शारद पुरे फोडून अयज्व्यांना शासन केलेस आणि पृथ्वी व पाणी यांना ओढून काढलेस.'

येथे शारद याचा अर्थ शरदृतूतली. शरदृतूत हिमालयावर पाणी गोठण्यास सुरुवात होते व सारे दळणवळण रुद्ध होते. ते दक्षिणायनाच्या सुमारास सूर्याचे प्रखरत्व परत येऊ लागून वितळू लागते व दळणवळण सुरू होते याला उद्देशून ही ऋचा आहे.

पाश्चात्त्य पण्डितांचा युक्तिवाद त्यांच्याच गळ्यात उतरविता येईल असा मसाला या ऋचेत आहे. 'काळा' शब्द दिसला की पाश्चात्त्यांना तो काळ्या आदिवासींचा उल्लेख वाटतो. मग वरील ऋचेत 'शारदीः पुरः' पांण्ढरी पुरे या शब्दांनी गोऱ्या लोकांचे किल्ले अभिप्रेत आहेत व भारतीय काळ्या आर्यांनी युरोपातल्या गोऱ्या अनार्यांवर कसे जय मिळविले याचे या ऋचेत वर्णन आहे असे म्हटले तर त्यावर काय उत्तर मिळू शकते?

**दाशराज्ञ युद्ध**

वस्तुतः ऋग्वेदात पुर हा शब्द तटबंदी या अर्थी वापरलेला आहे. पाण्याला रोखून धरणारी ही तटबंदी म्हणजे काळे ढग वा गोठलेले बर्फ.

८/१२/८ मध्ये इन्द्राने फोडलेले पुर चरिष्णु म्हणजे फिरते होते असे वर्णन आहे. ढगाचा यापेक्षा जास्त निःसंदिग्ध उल्लेख कोणता असू शकतो?

६/२७/५ मध्ये हरिपिया येथे झालेल्या युद्धाचे वर्णन आहे. काहींच्या मते सिन्धुसंस्कृतीचे हरप्पा हे हरियूपिया. पुढच्याच ऋचेत यव्यावती हे नाव आले आहे ते हरियूपियाचेच दुसरे नाव आहे असे सायण म्हणतो.

६/२७/५ म्हणते, अभ्यावर्ती चायमानासाठी इन्द्राने वरशिखाचे उरलेले स्वजन मारले. हरियूपियाच्या पहिल्या अर्धात त्याने वृचीवानाला मारले तेव्हा दुसरे अर्ध भीतीनेच गारद झाले. येथे अभ्यावर्ती चायमान, वरशिख व वृचीवान् यापैकी कोण आर्य होते व कोण अनार्य याचा खुलासा नाही. दुसरे असे की हा पराक्रम अभ्यावर्ती चायमानाने केलेला नसून इन्द्राने केलेला आहे. म्हणजे अभ्यावर्ती चायमान हा यजमान आणि इन्द्राने प्रसन्न



होऊन त्याच्या शत्रूंना मारले आहे, त्याने स्वतः नव्हे. हे पूर्व अर्धात इन्द्राने मारल्यामुळे दुसऱ्या अर्धात केवळ भीतीने शत्रू मेला यावरून दिसते. दाशराज्ञ युद्धात देखील इन्द्राने सुदासाच्या शत्रूंना मारले असे वर्णन आहे. कारण ते शत्रु नदीच्या प्रवाहात बुडून मेलेले आहेत. सुदासाच्या शस्त्राने नव्हेत. याच युद्धात एक चायमान पराभूत झाल्याचा उल्लेख आहे. तात्पर्य चायमानाशी झालेला संघर्ष हे वैदिकांचे आपसातले होते.

६/१७/१८ मध्ये अभ्यावर्ती चायमान हा पार्थव होता असे म्हटले आहे. पुराणात पृथू नावाचा एक राजा आहे. तेव्हा पार्थव म्हटल्याबरोबर अभ्यावर्ती चायमान हा अभारतीय ठरत नाही. पार्थिया हा इराणचा वायव्य प्रांत आहे. अभ्यावर्ती चायमान हा तेथील राजा असू शकतो. कारण ऋग्वेदाच्या प्रथम कालखंडातच झरथुष्ट्र व त्याचे अनुयायी भारत सोडून इरातणात गेले असे वेदातील सुर व असुर या शब्दांच्या व पुराणातील देवासुर संग्रामाच्या वृत्तांतावरून दिसेत. पार्थिया हे नाव पृथु या राजापासून आले आहे. कारण पृथु या राजाच्या नावाव्यतिरिक्त पार्थिया या शब्दाची व्युत्पत्ती लागत नाही.

ऋग्वेदातील पर्शू हा शब्द पारसीकांचा उल्लेख करतो असे चित्राव म्हणतात. पण १/१०५/८ मध्ये पर्शु म्हणजे पाठाची हाडे होत व ती दुखत आहेत अशी तक्रार आहे. १०/८६/२३ मध्ये वृषाकपि एकाच प्रसूतीत २० अपत्यांना जन्म देणाऱ्या पर्शु नावाच्या मानवीचा उल्लेख करतो. येथेही पारसी लोक दूरान्वयानेही प्रतीत होत नाहीत. ७/८३/१ मध्ये 'पृथुपर्शु असे लोक गायींच्या शोधात पूर्वकडे गेले' असे म्हटले आहे. दांडेकर पर्शु म्हणजे परशियन लोकांनी पूर्वेकडे केलेल्या स्वारीचा हा उल्लेख मानतात. पण पृथपर्शु म्हणजे लठ्ठ पारशी असा अर्थ करायचा काय? शिवाय इतरांनी केलेले अर्थ का मानायचे नाहीत याची दांडेकर चर्चा करीत नाहीत.

सरदार पणीकरांशी चर्चा करताना मी त्यांना विचारले की ऋग्वेदात भारतीय व अभारतीय यांच्या एखाद्या युद्धाचा उल्लेख आहे काय? या प्रश्नाचे उत्तर म्हणून त्यांनी दाशराज्ञ युद्धाचा उल्लेख केला, असाच उल्लेख या विषयावर बोलताना अनेक वेळा केला जातो. शिवाय दोन मानवी समूहातले हेच एकमात्र युद्ध ऋग्वेदात वर्णिलेले आहे. या युद्धाचे ऋग्वेदीय उल्लेख येणेप्रमाणे आहेत -

**सुदास व त्याचे शत्रू**

हे इन्द्रावरुणांनो, दहा अयज्वे राजे सुदासाशी लढण्यास एकत्र येऊनही त्याच्याशी लढू शकले नाहीत. ऋषींची यज्ञसूक्ते सफल झाली. त्यांच्या बोलावण्याने देव आले. ७/८३/७

हे इन्द्रा, सशस्त्र भेद जवळ येण्याच्या आधीच तू सुदासाचे रक्षण केलेस. तृत्सूच्या प्रार्थना ऐकल्यास त्याचे पौरोहित्य धन्य झाले. ७/८३/४

सुदासाचा शत्रू भेद हा मानव असल्याचे दिसत नाही कारण सुदासाचे रक्षण यज्ञात ऋचांच्या प्रभावाने झाले आहे. दहा राजे एकत्र झाले तरी त्यांचे सुदासाशी युद्ध झाल्याचे दिसत नाही. न युयुधुः म्हणजे ते लढलेच नाहीत असे स्पष्टच म्हटले आहे. ते सैन्यासकट पुरात बुडून मेले असे दिसते.

७/१८/५ म्हणजे इन्द्राने उसळ्या मारणारे पाणी सुदासासाठी उथळ केले. स्तुत्य इन्द्राने नदींचा शाप अशस्त म्हणजे अहिंसक केला.

७/१८/९ मध्ये सुदासाच्या शत्रूंना सुतुक म्हणजे सुपुत्र व वध्रिवाक् म्हणजे बडबडे म्हटले आहे. या शत्रूंना मनुषे म्हणजे मानवासाठी वा मानवलोकात मारले असा अर्थ होतो. पण या शत्रूंचे जे गुण दिले आहेत त्यात मानवताविरोधी वा अमानवीय शत्रूत असलेल्या गुणासारखे काहीच दिसत नाही. इतरत्र सायण सुतुक म्हणजे घातक व वध्रिवाक् म्हणजे दूषित वाणीचे असे अर्थ करतो. हेच अर्थ सुदासाशी झालेल्या युद्धाच्या संदर्भात योग्य वाटतात. मनुषे म्हणजे मानवासाठी असा अर्थ करायचा असेल तर मनुषे ही हलन्त शब्दाची चतुर्थी मानता येते. काहींच्या मते ७/१८/१५ मध्ये तृत्सूला सुदासाचा शत्रू मानले आहे.

इन्द्राने वेविषाण असे तृत्सु खाली वाहणाऱ्या पाण्याप्रमाणे पळाले. कुमित्र, अज्ञ व खिळखिळे झालेल्यांनी सुदासासाठी पुष्कळच भोग्य पदार्थ मागे ठेवले.

येथे इन्द्राच्या पुढे 'लढून' असा पदरचा शब्द घालून तृत्सू इन्द्राशी लढले असा अर्थ केला जातो. पण वेविषाण म्हणजे पाठबळ मिळालेले असा अर्थ होतो. म्हणजे इन्द्राचे पाठबळ मिळालेले तृत्सू खाली वाहणाऱ्या पाण्याप्रमाणे पळाले नाहीत, तर इन्द्राया साहाय्यार्थ धावले. तृत्सू हे भरत असल्यामुळे सुदासाचे साहाय्यकर्ते होते. शत्रू नव्हते. दुसऱ्या ओळीत सुदासासाठी अनेक भोज्य पदार्थ सोडणारे सुदासाचे शत्रू होते. तृत्सू नव्हे.

इतर ऋचा याच अर्थाचे अनुमोदन करतात. ७/८३/८ म्हणते की सुदासाला जेव्हा युद्धास जावे लागले तेव्हा इन्द्र व यमुना यांनी त्यांचे साहाय्य केले. पांढऱ्या केसांच्या बुद्धिमान तृत्सूंचे हार्दिक नमनाने स्वागत करण्यात आले. ७/३३/६ म्हणते की वसिष्ठाच्या पौरोहित्याने तृत्सूंची सन्तति भरभराटली.

एकूण तृत्सू हे सुदासाचे शत्रू होते असे सूचित करणारे दाशराज्ञ युद्धाच्या वृत्तान्तात काहीही नाही.

३/५३/११ म्हणते, 'हे कुशिकांनो या. सुदासाचा घोडा सोडून त्याला स्फूर्ति त्या जेणेकरून तो समृद्धि प्राप्त करील. सर्व दिशांनी वृत्राला मारीत तो राजा यज्ञ करो.'

या ऋचेतले युद्ध अतिमानवी शत्रूशी आहे.



दांडेकरांच्या मते ७/१८/७ मध्ये उल्लेखिलेले पक्थ, अलिन्द आणि शिव हे अनार्य होते. ही ऋचा अशी आहे -

पक्थ, भलानस अलिन्द, विषाणी आणि शिव सूक्ते म्हणते झाले. आर्यासाठी लढणारा तो इन्द्र तृत्सूसाठी गोधन प्राप्त करता झाला.

## परचक्राचा मागमूसही नाही

येथे पक्थ, भलानस, विषाणी आणि शिव हे सहप्रार्थी होते असे म्हटले आहे. ते शत्रुपक्षात होते वा अनार्य होते असे दाखविणारा शब्द नाही. इतर ऋचांत तृत्सू हे जेते म्हणून सांगितले असल्यामुळे या ऋचेत तृत्सुभ्यः याचा अर्थ तुत्सूपासून असा न करता तृत्सूसाठी असाच केला पाहिजे.

वर उल्लेखिलेल्या जमातीपैकी पक्थ ही जमात आजही त्याच नावाने अस्तित्त्वात आहे. वायव्य प्रांतातील पख्तूनिस्तान हा त्यांचा निवास आहे. अब्दुल गफारखान आपण याच जमातीचे आहोत असे सांगत असत. भलानसचा अर्थ भद्रमुख असा सायण करतो. अनस् म्हणजे आनन. भला हा शब्द हिंदीत रुढ आहे. सायणानुसार अलिन्द म्हणजे अपरिपक्व. डोक्यावर शिंगाचे टोप घालणारे लोक विषाणी म्हणवीत, असे लोक सिंधुसंस्कृतीतील मुद्रात कोरलेले आहेत.

एकूण वरील ऋचेत आर्य, अनार्य संघर्षाचा पुसटसादेखील उल्लेख नाही. सुदासाचे शत्रू अयज्वे म्हटलेले आहेत. ते यज्ञविरोधी असतील. ऋग्वेदकाली साऱ्या उत्तर भारतात यज्ञसंस्था सगळ्यांनाच मान्य होती असे गृहीत धरता येणार नाही. उपनिषदात देखील यज्ञसंस्थेची निन्दा आहे.

३/५३/१४ म्हणते, 'कीकटामध्ये गायींचा काय उपयोग? तेथे दुधात सोम मिसळला जात नाही. तेथले लोक यज्ञाग्नि पेटवीत नाहीत. आम्हाला प्रमगन्द व नैचाशाख यांचे धन दे.' नैचाशख म्हणजे अनुलोम विवाह करणारे व प्रमगन्द म्हणजे पणि असे अर्थ सांगण्यात आले आहेत. यापैकी पणींची चर्चा पूर्वी केलीच आहे. नैचाशाख शब्दाचा आर्य/अनार्य संघर्ष सिद्ध करण्यास काहीच उपयोग नाही. कीकट हा यज्ञशून्य प्रदेश भारताबाहेर असो की भारतात त्यांच्याशी यज्ञकर्त्यांचे संग्राम झाल्याचे वर्णन केलेले नाही.

ऋग्वेदात वायव्य भारतातून पश्चिम भारताकडे स्थलांतर झाल्याचा उल्लेख सापडतो असे म्हणतात. पण ऋग्वेदात पूर्व व पश्चिम या दोन्ही समुद्रांचा उल्लेख आहे (१०/१३/६५) व कोणत्याही स्थलांतराचा उल्लेख नाही.

एकूण भारताच्या बाहेरून आलेल्या कोणत्याही जमातीने येथील रहिवाशांशी युद्धे केल्याचा पुसटसा देखील उल्लेख ऋग्वेदात नाही!

✠

प्रकरण- ५

# पुराणातील कथांचा अर्थ कसा लावायचा?

आजच्या भारतात जाती या राजकीय दृष्ट्या पूर्वी कधी नव्हत्या एवढ्या प्रभावी झाल्या आहेत. ब्रिटिश काळापूर्वी राजकारणात जातींचे अस्तित्वही जाणवत नव्हते. जाती म्हणजे साधारणपणे रोटी/बेटी व्यवहाराच्या बाबतीत बंदिस्त असलेला समूह होता. 'साधारणपणे' असे म्हटले आहे कारण आंतरजातीय विवाहाची अनेक उदाहरणे आहेत व संकरजातींची संख्या लक्षात राहणार नाही इतकी मोठी आहे. जातींनी विशिष्टच धंदा करावा हा निर्बन्ध नियमापेक्षा अपवादातच जास्त दिसतो. ब्रिटिशपूर्व काळात पौरोहित्याचे काम जन्मसिद्ध ब्राह्मणाव्यतिरिक्त कोणी करीत होते असे दिसत नाही. पण क्षत्रियाचे काम करणारे अनेक जातीत विखुरले होते. महार रेजिमेन्ट केवळ इंग्रजांनी निर्माण केले नाही. पेशव्यांची देखील महार फौज होती. युद्धाचा व्यवसाय इतका सार्वत्रिक होता की कलियुगात क्षत्रिय वर्णच नाही अशी समजूत रुढ झाली. म्हणजे शिवाजीच्या क्षत्रियत्वाविरुद्धच फक्त वाद झाला असे नव्हे. 'कलावाद्यन्तयोः स्थितिः' या नियमाप्रमाणे रजपूत देखील क्षत्रिय नाहीत; पण क्ष जो स्वतःच वर्ण म्हणून सांगतो तोच क्षचा वर्ण समजावा या न्यायाप्रमाणे शुग राजे ब्राह्मण होते.रजपूत क्षत्रिय आहेत. पुराणानुसार नन्द व मौर्य हे शूद्र होते. गुप्त हे त्यांच्या नावावरूनच वैश्य वाटतात. सम्राट हर्षवर्धन वैश्य होता असे ह्यूएन्त्संग म्हणतो. नागपूरचे गोण्ड राजे स्वतःला क्षत्रिय म्हणवीत. पण हल्ली स्वतःला मागासलेले म्हणविण्यात जी चढाओढ लागली आहे त्याअनुसार ते स्वतःला वन्य जमातीत टाकणार !

क्षत्रियांप्रमाणेच वैश्यांचा व्यवसाय देखील जन्मसिद्ध होता असे दिसत नाही. मृच्छकटिक नाटकाचा नायक चारुदत्त हा ब्राह्मण होता पण त्याचा व्यवसाय शेठाचा होता. विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे पूर्वज अफू विकण्याचा धंदा करीत. वऱ्हाडात बरेच ब्राह्मण सावकारी करीत. तेव्हा गीतेतील 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः।' (चातुर्वर्ण्य जन्मसिद्ध नसून गुण व कर्म यावर विभागलेले आहे) हे वचन खरे होते असे म्हटले पाहिजे. ज्यांचा चातुर्वर्ण्यात समावेश होत नाही त्या अंत्यजांचे काम मात्र चातुर्वर्ण्यात समाविष्ट असलेले लोक करीत होते असे दिसत नाही.

ब्रिटिशपूर्व काळात जातींच्या आधारावर राजकीय भांडणे होत नव्हती. अमुक राजा हा अमुक जातीचा म्हणून दुसऱ्या एखाद्या जातीच्या राजाने त्याचे राज्य हिरावून स्वतःच्या जातीचे राज्य स्थापण्याचा प्रयत्न केला असे उदाहरण नाही. बाळाजी विश्वनाथला पेशवा करण्याचा प्रस्ताव जेव्हा छत्रपति शाहू महाराजांसमोर आला तेव्हा रामचंद्रपंत अमात्याने



पेशवाई देशस्थाकडे असावी अशी परंपरा असल्याच्या आधारावर पेशवाईवर स्वतःचा हक्कच सांगितला होता असे ब्रिटिश कालीन पोवाड्यात उल्लेख आहेत. समकालीन कागदपत्रात नाहीत. छत्रपती शाहू महाराजांनी रघूजी भोसल्यांना पेशवाई देऊ केली होती पण त्यांनी ती नाकारली असा इतिहासात उल्लेख आहे. त्यावरून मंत्री ब्राह्मण जातीचा असावा अशी परंपरा नव्हती हे सिद्ध होते. कोकणस्थ व देशस्थ यांचे भांडण मिटविण्यासाठी नानासाहेब पेशव्याने देशस्थ मुलीशी लग्न केले असे सांगण्यात येते. पण हे कोणते भांडण होते याचा उल्लेख समकालीन कागदपत्रांत सापडत नाही. प्रभु लोक स्वतःला क्षत्रिय मानून उपनयनाचा अधिकार मागत होते असे उल्लेख आहेत व या बाबतीत रघुनाथराव प्रभूंच्या बाजूचा व नारायणराव त्यांच्याविरुद्ध होता असे सरदेसाई म्हणतात. तेव्हा या भांडणाला जातीय भांडण म्हणता येत नाही. फक्त ब्राह्मण प्रभूंचा अधिकार अमान्य करीत होते व इतर जाती त्यांना क्षत्रिय मानण्यास तयार होत्या, असे असते, तर हे ब्राह्मण व प्रभु यांचे भांडण जातीय म्हणता आले असते.

मराठेशाहीत राजकीय भांडणे झाली ती शिवाजी व संभाजी, संभाजी व सोयराबाई, रघुनाथराव व माधवराव पेशवे अशी कौटुंबिक भांडणे होती. शिंदे/होळकरांचे भांडण हे जातीवरून नव्हते. जातीभेदांमुळे मराठ्यांचा इंग्रजांनी पराभव केला असे म्हणण्याची आजकाल फॅशन आहे. पण या मताचे आपल्या 'मराठे व इंग्रज' या ग्रंथात विस्तृत परीक्षण करून न. चिं. केळकर यांनी ते निराधार असल्याचे दाखवून दिले आहे.

जातींची भांडणे ही ब्रिटिशांची देणगी आहे म्हणूनच राजगोपालाचारी म्हणत It is not caste but the political exploitation of caste that is the real curse!

**पुराणातील ब्राह्मण/ब्राह्मणेतर**

जातिकलह ही ब्रिटिशांची देणगी नाही. ब्राह्मण/ब्राह्मणेतर कलहाचे मूळ पुराणाइतक प्राचीन आहे असे ज्योतिबा फुले मानतात. यासाठी त्यांनी बळीला पाताळात धाडण्याच्या कथेचा उल्लेख केला आहे.

बळी हा ब्राह्मणेतरांचा राजा, त्याचे राज्य इन्द्राला हिसकायचे होते. म्हणून त्याने 'बम्ब्या ब्राह्मणाला' म्हणजे वामनाला बळीकडे पाठवले व वामनाने बळीला पाताळात म्हणजे अमेरिकेत धाडले. अमेरिकन हे ब्राह्मणेतरांचे वंशज आहेत व ते अठराव्या शतकात ब्राह्मणेतरांच्या उद्धारासाठी भारतात आले व त्यांनी येथील ब्राह्मणांचा म्हणजे पेशव्यांचा पराभव करून ब्राह्मणेतरांचे राज्य स्थापिले.' असे म. फुले यांचे म्हणणे आहे.

वस्तुतः पुराणात दिलेली कथा अशी आहे : बळीने शंभर अश्वमेध केले व इन्द्राला पदच्युत करून त्याचे पद हिसकण्याचा प्रयत्न केला. त्याचा बंदोबस्त करण्यासाठी इन्द्राने विष्णूची मदत मागितली विष्णूने बटूचे रूप धारण केले व तो वामन या नावाने बळीच्या

भेटीस गेला.

बळीने त्याला दक्षिणा मागायची विनंती केली तेव्हा वामन म्हणाला, 'मला फार काही नको, फक्त तीन पावले भूमी पाहिजे.' बळी कबूल झाला, पण त्याचा पुरोहित शुक्राचार्य याने वामनाचे कपट ओळखले व तो दानोदक सोडण्याच्या झारीत लपून बसला.

शुक्राचार्याने दानोदक अडविल्यामुळे ते झारीतून बाहेर पडेना. वामनाने हे कपट ओळखले व एका दर्भाने झारीचे तोंड साफ केले. दान याप्रमाणे हाती पडल्यावर वामनाने त्रिविक्रमाचे रूप धारण केले. एका पावलाने सारी भूमी व्यापली, दुसऱ्या पावलाने सारे आकाश व्यापले व बळीला विचारले, 'तिसरे पाऊल कुठे टाकू?' बळीने आपल्या डोक्यावर हात ठेवला. तेव्हा त्रिविक्रमाने तिसरे पाऊल बळीच्या डोक्यावर ठेवले व बळीला पाताळात धाडले. बळी पाताळात गेल्यावर रावणाने त्याला सोडविण्याचा प्रयत्न केला पण तो सफल झाला नाही.

वरील कथा आर्याक्रमणाचा पुरावा म्हणून पुष्कळ वेळा उद्घृत करण्यात येते. आश्चर्य असे की 'मराठी विश्वकोशा'ने देखील हे मत उचलून धरले आहे. पण वरील कथेत बळी, इन्द्र वा वामन यापैकी कोणीही अभारतीय असल्याचा उल्लेख नाही. केरळात ओनम् नावाच्या सणात बळीची पूजा होते. यावरून केरळीय हे बळीचे पूजक अनार्य होते व वामन आणि इन्द्र हे आर्य होते असा युक्तिवाद मी प्रत्यक्ष केरळच्या गव्हर्नरच्या तोंडी ऐकला. पण बळीची पूजा महाराष्ट्रात देखील बलिप्रतिपदेला होते. त्याचेही समर्थन महाराष्ट्रीय हे देखील आर्य नसून सीथोद्रविड आहेत असे म्हणून केले जाईल.

पण कुणी बळी हाच आर्य होता व इन्द्र आणि वामन हे अनार्य होते असे म्हटले तर याच्याविरुद्ध आर्याक्रमणवादी काही प्रमाण देऊ शकणार नाहीत.

बळी हा ब्राह्मणेतरांचा राजा होता या म.ज्योतिबा फुल्यांच्या मताचा तरी आधार काय? बळी हा कश्यपाचा वंशज होता व कश्यप हा ब्रह्मदेवाचा पुत्र होता. ब्राह्मण या शब्दाचा अर्थच ब्रह्मदेवाचा पुत्र असा आहे. तेव्हा बळी ब्राह्मण असला पाहिजे. शिवाय बळीचे शत्रू जे इन्द्र व वामन ते ब्राह्मण होते हे म्हणणेही चूक आहे. हे दोघेही देव होते. देवाला जात नसते. वामन हा अवतार मानलेला असला तरी राम हा अवतार क्षत्रियाच्या पोटी आला म्हणून क्षत्रिय मानला जातो तसा वामन कोणा ब्राह्मणाच्या पोटी आलेला नव्हता. विष्णू वामनाचे सोंग घेऊन आला होता. ब्राह्मणाचे सोंग घेऊन जे कृत्य केले जाते ते ब्राह्मणाने केले असे म्हणता येत नाही.

बळीला वाचवू पाहणाऱ्यांत शुक्राचार्य व रावण यांचे नाव आले आहे. शुक्राचार्य अर्थात्च ब्राह्मण होता. रावण हा ब्राह्मण होता हे तर प्रसिद्धच होते. तेव्हा बळीच्या कथेत ज्यांना ब्राह्मणेतरवाद दिसतो त्यांना तो कोठेही दिसू शकेल.



ज्योतिबा फुल्यांनी पाताळ म्हणजे अमेरिका असा अर्थ करून बळी पाताळात गेला त्याचे वंशज म्हणजे आजचे अमेरिकन, ते अत्यंत पुढारलेले व बलिष्ठ आहेत व आज आपल्या ब्राह्मणेतर बांधवांच्या रक्षणासाठी ब्राह्मण पेशव्यांचा पराभव करून भारतावर राज्य करीत आहेत असे मत मांडले आहे.

भारतावर राज्य करणारे इंग्रज इंग्लंडमधील नसून अमेरिकेतील इंग्रज आहेत असे ज्योतिबांना वाटत होते का काय? भारतावर राज्य करणारे इंग्रज इंग्लंडमधून आले होते. अमेरिकेतून नव्हे. तसेच इंग्रजांनी फक्त ब्राह्मण पेशव्यांचेच राज्य बुडविले असे नाही त्यांनी शिंदे, होळकर, भोसले, रजपूत व शीख या ब्राह्मणेतरांची राज्ये देखील बुडविली.

## परशुरामकथा

ब्राह्मण/ब्राह्मणेतर कलह पुरातन आहे असे सिद्ध करण्यासाठी पुराणातले दुसरे उदाहरण परशुरामाने २१ वेळा क्षत्रियांचा संहार केला हे देण्यात येते. परशुराम चिरंजीव आहे अशी समजूत आहे. त्यामुळे आपल्या काळी देखील तो जिवंत आहे व गुप्तरूपाने वावरतो आहे, एवढेच नव्हे तर वर्तमानपत्रे देखील वाचतो अशा समजुतीने ज्योतिबांनी त्याच्या नावे वर्तमानपत्रात एक नोटिस दिली की 'बेट्या परशुरामा! ही नोटिस वाचून तू मुदतीच्या आत माझ्यासमोर हजर हो. नाहीतर मी तुझ्या ब्राह्मणबच्च्यास खेचून मारीन.' पण मुदत गेली तरी परशुराम ज्योतीबांपुढे हजर राहण्याचे धैर्य करीना.

ब्राह्मणांनी लिहिलेली पुराणे ही भाकडकथा आहेत असे म्हणायचे व त्यांच्या कथावर इतका विश्वास ठेवायचा की परशुराम चिरंजीव आहे व तो वर्तमानपत्रे वाचतो असे समजून त्याला नोटिस पाठवायची!

परशुराम हा जमदग्नि ऋषी व रेणुका ही क्षत्रिय कन्या यांचा मुलगा. रेणुका चित्ररथ गंधर्वाकडे आकृष्ट झाली असा संशय येऊन जमदग्नीने तिचा वध करण्याची आज्ञा आपल्या पुत्रांना केली. त्या पुत्रांपैकी फक्त परशुरामाने ती आज्ञा मानली व रेणुकेचा वध केला. त्याच्यावर संतुष्ट होऊन जमदग्नीने वर मागण्यास सांगितले. तेव्हा परशुरामाने 'रेणुकेला जिवंत करावे' असा वर मागितला. म्हणून जमदग्नीने रेणुकेस जिवंत केले.

पुढे सहस्रबाहू असलेल्या कार्यवीर्य या क्षत्रियाने जमदग्नीची कामधेनू पळविली. तेव्हा परशुरामने कार्तवीर्याचा वध केला. कार्यवीर्याचा वध झाल्यामुळे त्याची मुले संतप्त झाली व परशुराम आश्रमात नाही असे पाहून त्यांनी जमदग्नीच्या आश्रमावर हल्ला केला व त्याला ठार मारले. तेव्हा परशुराम कृद्ध झाला. व त्याने एकवीस वेळा सर्व क्षत्रियांचा संहार केला व आपल्या उजव्या कानात २१ मणी असलेली रुद्राक्षांची माळ घालण्यास सुरवात केली.

आपण एवढी हत्या केली हे पाप आहे अशी रुखरुख लागून परशुरामाने त्याचे क्षालन

करण्यासाठी यज्ञ केला. त्याचा पुरोहित कश्यप होता. यज्ञ झाल्यावर परशुरामाने कश्यपाला जिंकलेल्या सगळ्या पृथ्वीचे दान केले. तेव्हा कश्यप म्हणाला, 'एवढ्याने तुझ्या पापाचे क्षालन होत नाही. तू ही पृथ्वी सोडून निघून जा.' तेव्हा पृथ्वीवर आपल्याला राहण्यास जागा नाही असे पाहून परशुरामाने आपल्या बाणाने समुद्र हटविला व सह्याद्री आणि पश्चिम समुद्र यांच्यामध्ये असलेली कोकण ते केरळ ही भूमी निर्माण केली व तो तिथे राहू लागला.

परशुरामाचे पश्चिम समुद्राच्या तीरावरील जीवन निवृत्त वृद्धाचे जीवन होते. पण तो मधून मधून प्रकट होत असे. रामाने धनुर्भंग केला तेव्हा आपल्याहून वरचढ अशा क्षत्रियाने आपला अपमान केला असे मानून त्याने रामाला आव्हान दिले की 'तू वाकविलेले शिवधनुष्य जीर्ण झालेले होते. माझ्या हातातील वैष्णव धनुष्य वाकून दाखव. असे केलेस तर माझा पराभव झाला असे मी समजेन.' रामाने लीलेने ते धनुष्य वाकविले तेव्हा परशुराम शरण आला.

परशुराम अमर असल्यामुळे तो कृष्णाच्या काळी देखील हयात होता. त्यावेळी तो गोमन्त पर्वतावर राहात होता. जरासंधाने मथुरेवर सतरा वेळा स्वारी करून श्रीकृष्णाचे तेथील जीवन असह्य केले. तेव्हा श्रीकृष्ण जरासंधाचा प्रतिकार कसा करावा याबद्दल सल्ला मागण्यास गोमन्त पर्वतावर परशुरामाकडे गेला. परशुरामाने सल्ला दिला की मथुरे-सारख्या जमिनीवर असणाऱ्या जागेत राहून जरासंधाचा प्रतिकार करता येणार नाही. तेव्हा यादवांनी समुद्रामध्ये एखादी तटबंदी असलेली नगरी निर्माण करून तिथे राहावे. या सल्ल्यानुसार श्रीकृष्णाने द्वारका नगरीची स्थापना केली व यादव मथुरा सोडून द्वारकेस राहू लागले.

पुढे भीष्माने झिडकारल्यामुळे जिचे जीवन उद्ध्वस्त झाले ती अम्बा परशुरामाला शरण गेली व 'भीष्मांना माझा स्वीकार करायला लावा' अशी तिने विनंती केली. परशुराम हा भीष्माचा गुरू होता त्याने भीष्माला युद्धाचे आवाहन दिले पण तो भीष्माचा पराभव करू शकला नाही.

एकूण श्रीकृष्णाच्या आणि भीष्माच्या काळी परशुरामाचा उद्दामपणा नाहीसा होऊन सत्पक्षाचा कैवार करण्याची वृत्ती त्याच्यात उदित झाली होती असे दिसते.

वरील कथेतील खालील गोष्टींकडे लक्ष्य दिले पाहिजे.

परशुराम हा ब्राह्मण पुरुष व क्षत्रिय स्त्री यांचा पुत्र होता, पिता ब्राह्मण असल्याने परशुरामाला ब्राह्मण मानायला हरकत नाही पण याज्ञवल्क्य स्मृतीप्रमाणे त्याची जात ब्राह्मण असू शकत नाही. याज्ञवल्क्य हा बृहदारण्यक उपनिषदाचा कर्ता होता. म्हणजे त्याचा काळ इतर स्मृतींच्या मानाने वेदाच्या जास्त जवळचा आहे.परशुरामाला ब्राह्मण



मानायचे तर पितृसावर्ण्य म्हणजे बापाची जात ती मुलाची जात हे तत्त्व मानले पाहिजे. आजकाल ते मानले जात नाही. महाराष्ट्रातील कृष्णपक्षी, केरळातील नायर, वगैरेंचे पितृत्व ब्राह्मणांकडे असूनही त्यांना ब्राह्मण समजले जात नाही. डोग्रा या जातीचे पितृत्व रजपुताकडे जात असूनही डोग्रांची जात डोग्राच मानण्यात येते, रजपूत नाही, तेव्हा मुळातच परशुराम ब्राह्मण नव्हता असे म्हणून त्याची सर्व निन्दा एका ब्राह्मणेतराची निंदा आहे असे म्हटल्यास ते समर्थनीय नाही असे म्हणता येणार नाही.

### वसिष्ठ / विश्वामित्र

दुसरे असे की कश्यप या ब्राह्मणानेच परशुरामाला हद्दपार केले. तेव्हा परशुरामाला ब्राह्मण समजून त्याने केलेल्या हत्येचे खापर ब्राह्मणांवर फोडायचे तर कश्यपाने परशुरामाला हद्दपार केले म्हणून ब्राह्मणांचे अभिनंदन देखील करायला पाहिजे.

पुढे द्वापार कुलातील अवतारात परशुरामाने कृष्ण व अम्बा यांचा पक्ष घेतला. हे दोघे ब्राह्मण नव्हते.

पुराणातील ब्राह्मण/ब्राह्मणेतरांच्या संघर्षाचे आणखी एक उदाहरण म्हणून वसिष्ठ विश्वामिश्र यांचा कलहाची कथादेखील उद्घृत करण्यात येते. वसिष्ठ हा ऋग्वेदाच्या अत्यंत प्राचीन ऋर्षीपैकी आहे. विश्वामित्र हा क्षत्रियांचा ब्राह्मण झाला होता. भृगू ऋर्षीचा पुत्र जमदग्नि (ऋचीक) यास गाधीची कन्या दिली होती. गाधीला पुत्र नव्हता. तेव्हा गाधीच्या पत्नीने म्हणजे जमदग्नीच्या सासूने जमदग्नीपाशी पुत्र मागितला. इकडे जमदग्नीच्या पत्नीनेही पुत्र मागितला. दोघीस जमदग्नीने चरू मंत्रित करून दिले. आपल्या पत्नीस ब्रह्मतेजाने मंत्रित केलेला व सासूस क्षात्र तेजाने मंत्रित केलेला. या दोन्ही मायलेकींनी आपल्या चरूंची अदलाबदल केली. त्यामुळे जमदग्नीला रेणुकेच्या पोटी परशुराम हा क्षत्रियान्तक पुत्र मिळाला व गाधीच्या स्त्रीला ब्रह्मतेजाने युक्त असा विश्वामिश्र झाला.

विश्वामित्र हा क्षत्रियराजा होता. तो आपल्या सैनिकांसह मृगया करण्यास गेला असता अरण्यात बराच दूर गेला व तो आणि त्याचे सैनिक बरेच दमले. तेव्हा आता विश्रांती घेतली पाहिजे असा विचार करीत असताना त्यांना वसिष्ठांचा आश्रम जवळच आहे असे कळले व ते वसिष्ठांच्या दर्शनास गेले. वसिष्ठाने राजाचे व त्याच्या सर्व सैनिकांचे उत्तम आदरातिथ्य केले. एका गरीब ऋषीला आपले एवढे आदरातिथ्य करण्याचे सामर्थ्य कोठून आले असा विश्वामित्राला प्रश्न पडला असताना वसिष्ठाने त्यांना आपल्या 'कामधेनूच्या कृपेने मी असे करू शकलो' असे सांगितले तेव्हा विश्वामित्र म्हणाला, 'मी तुला वाटेल तितके धन देतो. तू आपली कामधेनू मला दे.' वसिष्ठाने कामधेनू देण्याचे साफ नाकारले. तेव्हा विश्वामित्र क्रुद्ध झाला व कामधेनूला बांधून आपल्याबरोबर नेण्याची त्याने सैनिकांना आज्ञा केली. पण कामधेनूने आपल्या शरीरातून अनेक जातींचे सैनिक निर्माण केले व

विश्वामित्राच्या सैनिकांचा पराभव केला. याने वसिष्ठ- विश्वामित्रांचे हाडवैर जुंपले. पुढे विश्वामित्राने वसिष्ठाचे शंभर पुत्र मारले, पण वसिष्ठाचा त्याला पराभव करता आला नाही. तेव्हा ब्राह्मणांची श्रेष्ठता त्याला पटली व स्वतःच ब्राह्मण व्हावे अशी महत्त्वाकांक्षा त्यांच्या मनात उत्पन्न झाली. ही महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी त्याला बरीच तपश्चर्या करावी लागली. पण शेवटी तो ब्रह्मर्षि म्हणून मान्यता पावला.

वसिष्ठ-विश्वामित्रांच्या या वैराचा उल्लेख ऋग्वेदातही आहे असे Cambridge History of India मध्ये प्रतिपादन आहे. ऋग्वेदात दाशराज्ञ युद्ध नावाच्या एका युद्धाचे वर्णन आहे. हे युद्ध सुदास हा भरतवंशातील राजा व दहा, यज्ञ न करणारे राजे, यांच्यामध्ये परुष्णी म्हणजे रावी नदीच्यातीरी झाले. हे दहा राजे अयज्वे म्हणजे यज्ञ न करणारे होते यावरून ते भारतातले मूलनिवासी अनार्य होते असे अनुमान या इतिहासाने काढले आहे.

शिवाय या दहा राजाचा संघ विश्वामित्राने घडवून आणला होता, कारण तो स्वतःच पूर्वी सुदासाचा पुरोहित असून सुदासाने त्याला काढून वसिष्ठाला पुरोहित नेमले होते, असा तर्क आहे. या युद्धात वसिष्ठ व सुदास यांचा जय झाला.

दाशराज्ञ युद्धावरील ऋचांमध्ये सुदासाला मदत करण्यामध्ये वसिष्ठ व विश्वामिश्र या दोघांचाही उल्लेख आहे. विश्वामित्राचा हा मंत्र भरतांचे रक्षण करतो आहे (७/१३/१२) व वसिष्ठ पुढे झाला तेव्हाच भारत विजयी झाले (७/३३/६) तसेच वसिष्ठाची स्तुती ऐकूनच इन्द्राने भरतांना जय दिला असे म्हटले आहे (७/१३/५) तेव्हा या युद्धात विश्वामित्र व वसिष्ठ हे विरुद्ध पक्षाचे होते हे म्हणणेच मुळात खरे नाही.

## सुदास कोण?

केंब्रिज इतिहासाचे हे मत मानले तर विश्वामित्र ब्राह्मण झाल्यावरचे हे युद्ध आहे असे म्हणावे लागते. कारण तो सुदासाचा पुरोहित झाला होता. किंवा हा विश्वामित्र पुराणातला राजा विश्वामित्र नव्हे असे मानावे लागते. शिवाय विश्वामित्राची स्वतःच ब्राह्मण बनण्याची महत्त्वाकांक्षा होती तेव्हा त्याला ब्राह्मणद्वेष्टा कसे म्हणता येईल?

या कथेवरून ब्राह्मण आपल्याला कसे श्रेष्ठ समजत व ब्राह्मणेतरांना कमी लेखीत हे दिसून येते असा आक्षेप येऊ शकतो. ब्राह्मण आपल्याला श्रेष्ठ समजत एवढेच या कथेवरून दिसून येत नाही तर विश्वामित्रासारख्या प्रबल क्षत्रियाला हे श्रेष्ठत्व मान्य होते हेही दिसून येते. मग यात ब्राह्मणांचा दोष काय? ब्राह्मणांनी आपले श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी ही भाकडकथा रचली आहे असा आरोप असेल तर अशा भाकडकथा मानण्याची जबरदस्ती ब्राह्मणेतरांवर करण्याचे सामर्थ्य ब्राह्मणात होते काय हा प्रश्न निर्माण होतो. प्राचीन ग्रंथात असे सामर्थ्य ब्राह्मणात होते असे मानण्यास काहीच आधार सापडत नाही. ब्राह्मण हे ब्राह्मणेतरांच्या दक्षिणेवर जगत होते. मग आपल्यावरच अवलंबून



असलेल्या या आश्रितांनी निर्माण केलेल्या भाकडकथा हे ब्राह्मणेतर मानीत असतील तर त्यात ब्राह्मणांचा दोष काय?

रॅगोझिन या पण्डिताचे मत असे आहे की सुदासाचे या युद्धातील शत्रू एतद्देशीय पुरू हे द्रविड जातीचे लोक होते. पण त्यांना विश्वामित्राने शुद्ध करून घेतले होते. पुरुव्यतिरिक्त अनु हे कोल जातींचे लोक सुदासाच्या विरुद्ध लढले.

या मते हा ब्राह्मण/ब्राह्मणेतर संघर्ष नसून शुद्धीच्या विरुद्ध असलेला सनातनी वसिष्ठ व शुद्धीचा प्रचार करणारा पुरोगामी ब्राह्मण विश्वामिश्र यांच्यातला संघर्ष होता. पण आर्य द्रविड संघर्ष हेच ब्राह्मण / ब्राह्मणेतर वादाचे दक्षिण भारतातले मुख्य सूत्र आहे. हे लक्षात घेता प्रस्तुत विषयाच्या दृष्टीने रॅगोझिनच्या मताचे महत्त्व आहे.

विश्वामित्र शुद्धि करीत होता याला आधार म्हणून ऐतरेय ब्राह्मणात 'अन्ध्र हे विश्वामित्राने शाप देऊन हाकललेले विश्वामित्राचे पुत्र होते.' असे विधान आहे. हे अन्ध्र म्हणजे हल्लीचे आन्ध्र व ते द्रविड आहेत याचा येथे उल्लेख करता येईल.

अनु हा दाशराज्ञ युद्धात सुदासाचा शत्रू होता असे रॅगोझिन म्हणतो. ते बरोबर नाही. ७/१८/३ या ऋचेत अनु असा शब्द आला आहे. तो उपसर्ग आहे. कुणाचे नाव नाही.

केवळ अयज्वे म्हणजे यज्ञ न करणारे एवढ्या विशेषणावरून सुदासाचे शत्रू अभारतीय ठरत नाहीत. वैदिक ऋचांची भूमी गान्धार पासून असमपर्यंत आहे. या सर्व प्रदेशात यज्ञ करणे ही एकच उपासना पध्दती प्रचलित होती असे मानता येत नाही. 'माझा इन्द्र दहा गायींना कोण विकत घेईल ?' ('क इमं दशभिर्मम इन्द्रं क्रीणाति धेनुभिः'। (४/२४/१०) या ऋग्वेदातील प्रसिद्ध विधानाने ऋग्वेदकाळी मूर्तिपूजा देखील प्रचलित होती हे स्पष्ट आहे. मूर्तिपूजा प्रचलित असणे हे यज्ञसंस्था प्रचलित नसण्याचे प्रमाण न मानले तरी कीकट देशामधले लोक यज्ञ करीत नाहीत असे ऋग्वेदात विधान आहे. कीकट म्हणजे मगध असे सायण म्हणतो. पण हे ऋग्वेदातले विधान असल्यामुळे मगधातील बौद्ध व जैन सम्प्रदायांनी यज्ञसंस्थेस विरोध केला हा संदर्भ येथे विवक्षित नाही. वेदकाली देखील यज्ञाला विरोध करणारे लोक होते याचा हा उल्लेख आहे.

ऐतरेय ब्राह्मणातली आख्यायिका खरी मानली तरी द्रविड हे विश्वामित्रासारख्या वैदिक ब्राह्मणाचे वंशज ठरतात व आर्य अनार्य कथेला तिनेच मानलेले आधार प्रतिकूल आहेत हे दिसून येते.

द्रविडांना विश्वामित्राचे वंशज मानण्यात त्यांना शुद्ध करून घेण्याचा विचार आहे. ते मुळात वैदिकच होते असे त्यावरून म्हणता येत नाही. तरी ते अभारतीय होते याला काहीच पुरावा नाही.

भारतासारख्या विशाल देशात अवैदिक संस्कृति वेदकालात देखील नांदत असतील.

त्या अवैदिक असल्या तरी त्यांचे वैदिकाशी शत्रुत्व नव्हते व ते वैदिक संस्कृतीत सहज सामावून जाण्यास तयार होते एवढे खास.

**पुरुषसूक्त :**

द्रोणाचार्य व एकलव्य यांची कथाही आर्याक्रमण व ब्राह्मणांचा कपटीपणा याचे प्रत्यंतर म्हणून सांगितली जाते. एकलव्य हा वनवासी जातीचा होता. त्याच्या जातीमुळे द्रोणाचार्यांनी त्याला धर्नुविद्या शिकविण्याचे नाकारले. तेव्हा त्याने द्रोणाचार्यांच्या पुतळ्यालाच गुरु मानून स्वतःच्याच बळावर धर्नुविद्येत पारंगत्व मिळविले. हा अर्जुनापेक्षा श्रेष्ठ धर्नुधर आहे व अर्जुनाला याच्यापासून धोका आहे हे ओळखून द्रोणाचार्य एकलव्याकडे गेले व म्हणाले, 'तू माझ्या पुतळ्यापासून म्हणजे माझ्यापासूनच धर्नुविद्या शिकलास तेव्हा मला तू गुरुदक्षिणा दिली पाहिजे.'

'काय दक्षिणा देऊ?' म्हणून एकलव्याने विचारले तेव्हा द्रोणाचार्यांनी त्याच्याकडे त्याचा अंगठा कापून मागितला. सत्यनिष्ठ एकलव्याने तो दिला व त्याचे धर्नुधरत्व नाहीसे होऊन अर्जुन निर्धास्त झाला.

येथे द्रोणाचार्यांनी कपट केले ते ब्राह्मणांच्या स्वार्थासाठी केले काय? अर्जुन हा ब्राह्मण नव्हता. दुसरे असे की एकलव्य हा भारताचा मूलनिवासी होता व द्रोणाचार्य भारताच्या बाहेरून आला होता असे या कथेत कोठे सांगितले आहे? वनवासी लोक शहरातील लोकाहून आधी या देशात होते याला काही प्रमाण आहे काय? आजचा आदिवासी हा शब्द मिशनऱ्यांनी काढलेला आहे. ब्रिटिशपूर्व भारतात वनवाशांना आदिवासी म्हणत नव्हते.

पुराणकथेतील ब्राह्मणांचे दर्शन बेगुमान सत्ताधारी या स्वरुपात कुठेच होत नाही. हे वर्णन ज्याला शोभू शकेल असा रावण हा एकमात्र ब्राह्मण. पण त्याचा उल्लेख राक्षस म्हणूनच केला आहे. ब्राह्मण जातीकडून असे वर्तन त्याकाळी अपेक्षित नव्हते हेच रावणाच्या कथेवरून सिद्ध होते.

ब्राह्मणांचे अनेक वेळा जे वर्णन येते ते गरीब म्हणूनच येते. द्रोणाचार्यांसारख्या रणधुरंधर ब्राह्मणाला आपल्या मुलाला दूध पाजण्याची ऐपत नव्हती. सुदामा खुद्द कृष्णाचा सहाध्यायी व मित्र असूनही त्याची अन्नान्नदशा झाली होती. धौम्य हा पांडवांचा पुरोहित आपल्या यजमानाच्या वाट्याला वनवास आला म्हणून स्वतःही त्यांच्याबरोबर वनवासास गेला. वनवासात तो पांडवांचे सांत्वन करण्यासाठी त्यांना पुराणकथा सांगत असे असे वर्णन आहे. त्यात तो सांत्वन करण्यासाठी केवळ भेटायला आला होता असे वर्णन नाही. असे असून पौरोहित्यापलीकडे त्यांचा पांडवांच्या राजकीय कार्यावर काही प्रभाव नव्हता. वसिष्ठ फार प्रभावी ब्राह्मण होता. पण रामायणात त्याने पौरोहित्यापलीकडे काही केलेले



दिसत नाही. इक्ष्वाकु वंशाच्या राजकारणावर व समाजकारणावर त्याचा काही प्रभाव असल्याचे वर्णन नाही.

ऋग्वेदामध्ये पुरुषसूक्त नावाचे सूक्त आहे. त्यात चार वर्णांचा नावासकट एकत्र उल्लेख आहे. यात पुरुष शब्दाने समाजपुरुष अभिप्रेत आहे. या समाजपुरुषाचे मुख म्हणजे ब्राह्मण, बाहु म्हणजे क्षत्रिय, मांड्या म्हणजे वैश्य व पाय म्हणजे शूद्र असे म्हटले आहे. यात 'पद्भ्यां शूद्रो अजायत' या शब्दप्रयोगावरून शूद्र पायापासून निर्माण झाला असा अर्थ करण्यात येतो व शूद्रनिंदेबद्दल वेदांना शिव्या वाहण्यात येतात. एक तर पूर्वीच्या संदर्भावरून येथे शूद्राचा जन्म कशातून झाला हे सांगण्याचा उद्देश नाही तर समाजात शूद्राचे स्थान काय हे सांगण्याचा आहे. दागिना सोन्यापासून झाला म्हणजे सोने हे त्या दागिन्याचे समवायी कारण (material cause) आहे असा अर्थ होतो. म्हणजे समाजपुरुषाचे पाय हे शूद्राचे समवायी कारण आहे असा अर्थ आहे. शूद्राचे स्थान पायाचे आहे असे म्हटल्याने शूद्राचा अपमान होतो असे म्हणणेही या वचनाचा विपर्यास करणारे आहे. पाय हा शरीराचा आधार आहे तसाच शूद्र हा समाजाचा आधार आहे असा या वाक्याचा स्पष्ट अर्थ आहे. ब्राह्मणाचे स्थान मुख हे आहे. मुखाने मनुष्य बोलतो व भाषा हेच सर्व सारस्वताचे माध्यम आहे. तेव्हा ज्ञानविज्ञान व साहित्य हे ब्राह्मणाचे क्षेत्र आहे. बाहुबलाचे क्षेत्र म्हणजे लढणे हे क्षत्रियाचे क्षेत्र आहे. मांड्या पायाच्या सर्व हालचालींना बळ व नियमन देणाऱ्या म्हणून ते वैश्याचे धनोत्पादन स्वरुपातले क्षेत्र आहे. धनोत्पादन झाले नाही तर समाज उठू बसू न शकणाऱ्या परावलंबी ऋग्णासारखा होईल हे यात सूचित केले आहे.

मुख व बाहु हे अवयव एकमेकापासून स्वतंत्र आहेत. म्हणजे कोणांचे थोबाड फुटले तरी त्याचे बाहु काम करीत राहू शकतात व बाहूला इजा झाल्यामुळे मुख आपले काम करू शकत नाही असे होत नाही. तात्पर्य ब्राह्मण व क्षत्रिय यांचे काम हे एकाच कामाचे दोन घटक नाहीत.

पण मांड्या व पायांचे तसे नाही. मांड्या व पाय मिळूनच चालण्याचे काम करू शकतात. त्याप्रमाणेच धनोत्पादनाचे काम वैश्यांची उद्योजकता व शूद्राचे कुशल वा अकुशल श्रम या दोहोंच्या सहकार्यावर अवलंबून आहे.

शूद्र शब्द शुच् म्हणजे दुःख करणे या धातुपासून झाला आहे असे शब्दकल्पद्रुम म्हणतो. पण हे स्वीकार्य नाही. असे असेल तर शुच् मधील च् कसा व कोणत्या नियमाने गायब झाला ? शूद्र शब्द शुध् म्हणजे शुद्ध करणे या धातूपासून झाला असण्याचा संभव अधिक आहे. शुध् या धातूला वक्र, शुक्र इत्यादी शब्दाप्रमाणे र हा नामसाधक प्रत्यय लावला की शुध्र म्हणजे साफ करण्याची क्रिया हा शब्द तयार होतो. त्याचे भाववचक शौध्र असे

होते. म्हणजे शूद्र हे शुद्ध करण्याची कामे करीत होते. पण याचा संकेत भंगीकामाकडे नाही. हे काम करणाऱ्या जाती अस्पृश्य समजल्या जात होत्या. शूद्र हे अस्पृश्य नव्हेत. तेव्हा ती करीत असलेली शुद्धि वेगळ्या प्रकारची होती.

सेवा या शब्दाचा अर्थ केवळ झाडलोट असा करण्यात येतो. वस्तुतः हा शब्द इंग्रजीतील सर्व्हिसेस या अर्थी वापरला जातो. केवळ शारीरिक श्रमाप्रमाणेच बौद्धिक श्रम या देखील सेवा आहेत.

रोगोपचाराशी संबंधित असलेले परिचारणासारखे व्यवसाय यात अंतर्भूत आहेत. खुद्द डॉक्टरचे काम अस्वच्छतेशी संबंधित आहे. व्याधींशी अस्वच्छता संबंधित असतेच. ती सहन करू न शकणारा रोगोपचार करू शकणार नाही. शल्योपचाराचे काम पूर्वी न्हाव्याकडे असे यावरून हे स्पष्ट व्हावे.

शूद्राला समाजपुरुषाच्या पायाची उपमा दिली आहे. बाहू प्रहाराचे काम करतात, पण पायांचे मुख्य काम हालचाल करणे हे आहे. यावरून हे सूचित होते की भांडवल न गुंतविता शारीरिक वा बौद्धिक श्रमांनी ज्या व्यवसायात द्रव्यार्जन करता येते ते सर्व व्यवसाय शूद्राचे होते. सेवा हे शूद्रांचे काम आहे याचा अर्थ इंग्रजीतील services या शब्दात ज्या व्यवसायांचा समावेश होतो ते व्यवसाय शूद्रांचे होते.

मृच्छकटिक नाटकाच्या कर्त्याचे नाव शूद्रक आहे. तसेच अलेक्झांडरशी लढणारी एक शौद्रक नावाची जमात होती. या शब्दामधील शूद्र या शब्दाचा अर्थ काय असावा? शूद्रक हा जातीने शूद्र असण्याचा संभव आहे. कारण नटांचा सामाजिक दर्जा फारसा उच्च नव्हता. नटाचे तोंड पाहू नये असा काल परवापर्यंत संकेत होता. 'नटस्य गाथां शृणोति' व 'उपाध्यायदधीते' असे दोन वाक्प्रयोग व्याकरणात सांगितले आहेत. उपाध्यायापासून व्याकरण शिकतो असे म्हणण्याचे कारण व्याकरण शिकविणारा उपाध्याय हा उच्च आहे. पाण्याप्रमाणे ज्ञान वरून खाली येते. पण नट असा उच्च नाही त्यामुळे त्याच्यापासून असे न म्हणता त्याची गाथा म्हणजे तो म्हणत असलेली नाटकाची नक्कल शिकतो असे म्हणावे.

हा शूद्रक राजा होता ही गोष्ट या तर्काच्या आड येणारी नाही. चंद्रगुप्त मौर्य शूद्र होता. त्याने ज्यांचा उच्छेद केला ते नंद देखील शूद्र होते. महाभारत शान्तिपर्व ६०/३८/४० मध्ये पैजवन नावाच्या शूद्र राजाने यज्ञ करून एक लक्ष पूर्ण पात्रांची दक्षिणा वाटली असे विधान आहे. हा पैजवन ऋग्वेदातील दाशराज्ञ युद्धात विजय मिळविणारा सुदास होय असे डॉ. आंबेडकरांनी यास्काच्या आधारे दाखविले आहे. हा शोध महत्त्वाचा आहे. त्याने पुढे जे शूद्र राजे झाले ते प्राचीन परंपरेला धरूनच. या पैजवानाचे नाव सुदास होते ही गोष्ट महत्त्वाची आहे. दास या शब्दाला गुलाम हा अर्थ आलेला नव्हता हे त्यावरून



सिद्ध होते. दास हा शब्द दस् म्हणजे विध्वंस करणे या धातूपासून आला आहे. युद्धात विध्वंस करणारा या चांगल्या अर्थी देखील हा शब्द वापरला जात होता असे यावरून दिसते. बंगालमध्ये दास हे आडनाव आहे. या आडनावाचे चित्तरंजन दास या सारखे महापुरुष बंगालमध्ये झाले आहेत. त्याचे पूर्वज गुलाम होते असे कोणत्याही परंपरेप्रमाणे सिद्ध करता येत नाही. त्याचे पूर्वज दासासारखे पराक्रमी दास होते असे समजणे सयुक्तिक आहे.

वर्ण या शब्दावरून पाश्चात्य संशोधकांनी वर्ण त्वचेच्या रंगावर अवलंबून होते, ब्राह्मण गोरे होते, क्षत्रिय लाल होते, वैश्य पिवळे होते व शूद्र काळे होते. काळे शूद्र हे भारताचे मूलनिवासी होते असे मत मांडले आहे.

### वर्ण जन्मसिद्ध नाही

महाभारत शान्तिपर्व अध्याय १८८ मध्ये देखील वर्णाबद्दल असेच विधान आहे. पण ते त्वचेच्या वर्णावर आधारलेले नसून सत्व, रज व तम या गुणांचे जे रंग मानले आहेत त्यावरून आहे.

तम म्हणजे अंधार काळा असतो. याच्या उलट सत्व म्हणजे प्रकाश पांढरा असतो. काळा व पांढरा यांच्या मधोमध रंग लाल असतो. सूर्यास्त होऊन पूर्ण अंधार पडायच्या आधी सूर्य लाल होतो व पूर्ण प्रकाशत असताना तो पांढरा होतो. पण सत्व, रज व तम हे तीनच गुण आहेत आणि वर्ण तर चार आहेत म्हणून लाल व काळा यांच्या मधला पिवळा रंग वैश्यांना बहाल करण्यात आला. वरुणाचा रथ उषा उगवते तेव्हा सोन्यासारखा पिवळा असतो व सूर्योदयानंतर तांब्यासारखा लाल होतो असे ऋग्वेद ५/६३/८ मध्ये म्हटले आहे. म्हणजे उषेच्या उदयापूर्वी अंधाराचा काळा रंग, त्यानंतर उषेच्या उदयी पिवळा व सूर्योदय झाला की लाल या रंगांच्या क्रमातही अंधाराचा काळा रंग व सूर्योदयाचा लाल रंग या मध्ये उषेचा पिवळा रंग आहे. तेव्हा पांढरा, लाल, पिवळा व काळा हे निरनिराळ्या वर्णांच्या कातडीचे रंग होते असे मानणे म्हणजे काव्यात स्त्रीला चन्द्रानना म्हटले आहे म्हणून त्यावेळच्या स्त्रियांची मुखे चन्द्राची बनविलेली असत असे समजण्यासारखे आहे.

आर्य हे विशिष्ट वर्णाचे म्हणजे रंगाचे लोक होते. या मताच्या पुष्ट्यर्थ 'हत्वी दस्यून्प्रार्यं वर्णमावत्' म्हणजे दस्यूंना मारून इंद्राने आर्य वर्णाचे रक्षण केले (३/३४/९) हे वचन उद्धृत करण्यात येते. पण या ऋचेत प्रारंभीच 'सूर्य ससान' म्हणजे (इन्द्राने) सूर्य मोकळा केला असे म्हटले आहे. दस्यूंना मारून सूर्य मोकळा होण्यासाठी सूर्य हा काय टेनिसचा चेंडू आहे ? ही ऋचा निःशंकपणेच खगोलीय घटनांच्या संदर्भात लिहिली आहे.

वर्ण हा शब्द ऋग्वेदात इतर अनेक ठिकाणी आला आहे व त्या सर्व ठिकाणी पाश्चात्य संशोधकांनी त्याचा त्वचेचा रंग असाच अर्थ करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे वर्णाच्या

अर्थाची अधिक चर्चा केली पाहिजे. सायण वृ म्हणजे निवड करणे या धातूपासून वर्ण शब्दाची व्युत्पत्ती देतो. कृ म्हणजे करणे पासून कर्ण, जृ म्हणजे जीर्ण होणे पासून जर्ण, सि म्हणजे बांधणे पासून सेना, द्रु म्हणजे वाहणे पासून द्रोण, पन् म्हणजे स्तुति करणे पासून पन्न, अन् म्हणजे श्वास घेणे वा जगणे पासून अन्न आणि स्वप् म्हणजे निजणे पासून स्वप्न.

या उदाहरणांवरून वर्ण शब्दाचा अर्थ करायचा म्हणजे जो वरण्यास म्हणजे निवड करण्यास उपयोगी पडतो तो. निवड करण्यास उपयोगी फक्त रंगच आहे असे नाही. कोणताही व्यवच्छेदक गुण हा वर्ण आहे.

मॅक्समूलरच्या मते आर्य हा शब्द अर् म्हणजे जमिनीची मशागत करणे या धातूपासून आला आहे. ऋग्वेदात आम जनतेला कृष्टी म्हणजे शेतकरी म्हटलेले आहे. तेव्हा आर्य वर्ण म्हणजे शेतकऱ्यांची जमात.

केवळ व्युत्पत्तीवर न जाता कोशांचा विचार केला तर अमरकोशाचा कर्ता अमरसिंह याने म्हटल्याप्रमाणे रंग या व्यतिरिक्त वर्ण या शब्दाचे स्तुति, अक्षर, हत्तीवरील आसन, असे अर्थ होतात. आर्य वर्ण मध्ये स्तुति हा अर्थ अभिप्रेत आहे. हिन्दीमध्ये 'आपकी तारीफ' या वाक्प्रयोगात आपकी पहचान असा अर्थ होतो तेव्हा आर्य वर्ण म्हणजे आर्य ही ज्याची ओळख आहे तो. मेदिनी कोशात कीर्ति कथन, व्यवच्छेदक असे जादा अर्थ दिले आहेत. वंश हा अर्थ कोठेही नाही. वर्ण म्हणजे वर्णन वा व्यवच्छेदक हा अर्थ सर्वत्र आहे.

संस्कृतच्या प्रत्येक विद्यार्थ्याने वामन शिवराम आपटे यांचा कोश वापरलेला असतो. या कोशात वर्ण हे रंगावर आधारलेले होते असे म्हटले आहे. पण हा अर्थ पाश्चात्य संशोधकांचा अधिकार मानून दिला आहे. भारतीय परंपरेस अनुसरून नाही.

वर्णव्यवस्था हा गुणकर्मविभाग मानला तर जाती या जन्मसिद्ध असू शकत नाहीत. जन्मसिद्ध जाती असण्यासाठी आधी विवाहसंस्था असली पाहिजे. पण भारतात अत्यंत प्राचीन काळी विवाहसंस्थाच नव्हती, असे उपनिषदात वर्णन आहे. उपनिषदांचा काल ख्रि. पू. दुसऱ्या सहस्रकाच्या मागे जाऊ शकत नसला तरी ही ख्रि. पू. दुसऱ्या सहस्रकातील परिस्थिती असू शकत नाही. वर्णसंकराला महत्पाप समजणाऱ्या काळात एवढे शिथिल विवाह राहत असतील असा संभव नाही.

### गोत्र व जात

आज बहुपतिकत्वाची चाल नसून देखील आपण द्रौपदीच्या कथा सांगतो त्याच प्रमाणे उपनिषदे ही फार प्राचीन कालची गोष्ट सांगत आहेत. उपनिषदात श्वेतकेतूची देखील कथा आहे. त्या कथेप्रमाणे तर शिथिल विवाह काय, कोणत्याच प्रकारचे विवाह



श्वेतकेतूच्या काळी नव्हते. तेव्हा उपनिषदे अत्यंत प्राचीन काळाबद्दल बोलतात असेच असले पाहिजे.

हा अत्यंत प्राचीन काळ म्हणजे ज्यावेळी फक्त ब्राह्मण व ब्राह्मणेतर हे दोनच वर्ण होते तो अगस्त्याचा काळ. याकाळी अपत्य ब्राह्मण की ब्राह्मणेतर एवढेच ठरवायचे होते. व त्यासाठी फक्त बापाची जात विचारात घेतली जात होती. स्त्रीची स्त्री हीच जात, स्त्रीला दुसरी जात नाही असा विचार या मागे असावा. अपत्याची जात फक्त बापाच्या जातीवरून ठरवायची व विवाहात स्त्री कोणत्या जातीची याचा विचार करायचा नाही असे असेल तर स्त्रीच्या जातीचे काही प्रयोजन उरत नाही.

पुरुषसूक्तावरून वर्ण जन्मसिद्ध होते असे दिसत नाही. ते व्यवसायनिष्ठ होते हे स्पष्ट आहे. प्रजा, अपत्ये व बल मिळण्यासाठी अगस्त्य खणतीने खणता झाला व अशा प्रकारे त्याने दोन्ही वर्णांचे पोषण केले व देवांचे आशीर्वाद मिळविले असे ऋग्वेद १/१७९/६ सांगते. यात दोनच वर्णांचा उल्लेख आहे. हे दोन वर्ण म्हणजे अर्थात पारलौकिक श्रद्धेवर आधारलेला व्यवसाय करणारे पुरोहित व लौकिक अनुभवाच्या आधारे व्यवसाय करणारा इतर सारा समाज. म्हणजे या काळी क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे वर्ण नव्हते. व्यवसायांची विविधता वाढली तेव्हा क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे त्यांचे तीन वर्ग मानावे लागले. वर्ण जन्मसिद्ध होते असा कोणताच काळ ज्ञात नाही.

ऋग्वेदात वर्ण जन्मसिद्ध असल्याचा कुठेच उल्लेख नाही. महाभारतातील वर्ण जन्मसिद्ध नव्हते असे म्हणावे लागते. कौरव / पांडव हे क्षत्रिय मानलेले आहेत. पण ते जन्माने क्षत्रिय नव्हते. कौरव हे गांधारी व धृतराष्ट्र यांचे पुत्र नव्हेत. गांधारीला गर्भच राहिला नव्हता. आपल्या पोटातला गुल्म (म्हणजे ट्यूमर) हा गर्भ आहे अशी तिने समजून करून घेतली होती. योग्य मुदतीत तिची प्रसूती होईना. तिने आक्रस्ताळेपणा केल्यामुळे तो गुल्म बाहेर पडला. तेव्हा गांधारी शोक करू लागली. तिचा शोक दूर करण्यासाठी व्यासाने तिला शंभर मडक्यांत शंभर पुत्र आणून दिले तेच कौरव. व्यासाने दुसऱ्याची मुले आणली ती अनाथ असणार. आपली मुले दुसऱ्याला कोण देईल ? तेव्हा मुले क्षत्रिय आईबापांची नव्हती. एवढेच नव्हे तर त्यांचे आईबाप कोण हे देखील माहीत नव्हते.

आता पांडवांकडे वळू. पांडवांपैकी पहिले तीन नियोगातून जन्मलेले होते. युधिष्ठिर यमापासून, अर्जुन इन्द्रापासून व भीम वायूपासून झाला. हे तिघेही देव होते. देवांत वर्ण नसतात. तेव्हा तीन पांडव जन्माने क्षत्रिय होते असे म्हणता येत नाही.

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः । 'मी चातुर्वर्ण्य गुणकर्माच्या आधारावर निर्माण केले असे ईश्वरस्वरूप श्रीकृष्ण म्हणतो.

ऋग्वेदात ब्राह्मण या एकाच जातीचा उल्लेख आहे. धर्मकृत्ये करणाऱ्यांचीच प्रथम

वेगळी जात निर्माण होते असे इराणातील मोबेत, ज्यू लोकातील पुजारी व रोमन लोकातील पॅट्रीशियन यावरून दिसते. पण पॅट्रीशियन लोक इतर लोकाशी विवाह करीत नसत. तसे वेदातील ब्राह्मण करीत होते असे म्हणण्यास आधार नाही. ब्राह्मण वर्ण जन्मसिद्ध झाल्यावरच वर्णांतरीय विवाह करणाऱ्यांना कोणत्या वर्णाचे समजावे हा प्रश्न उपस्थित झाला. तेव्हाच जाती उत्पन्न होऊ शकतात.

भारतीय युद्धाच्या काळी जाती होत्या असे दिसत नाही. व्यास हा कोळीणीला पराशरापासून झालेला मुलगा. त्याची जात काय होती ? वर्णसंकर हे पाप आहे असे समजण्याच्या काळचा व्यासाचा जन्म असू शकत नाही. व्यास ऋषी असल्यामुळे त्याला ब्राह्मण मानले असेल हे बरोबर नाही. वाल्मिकी हा देखील ऋषी होता पण तो ब्राह्मण मानला गेला नाही. तसेच व्यास ऋषी म्हणून मान्यता पावला असला तरी त्याला ब्राह्मण मानत होते असा उल्लेख नाही. ऋषी इतर जातींचाही असू शकत असे. राजर्षि या बहुप्रचलित व शूद्रमुनि या भवभूतीने शंबूकाबद्दल वापरलेल्या शब्दप्रयोगावरून

म्हणजे गोत्र बदलते असे विश्वामित्र ब्राह्मण झाल्यावर त्याने नवी गोत्रे प्रसृत केली यावरून दिसते. पण इतर गोत्रांच्या कर्मातला बदल काय होता याची माहिती आज उपलब्ध नाही. तरी सर्व वर्णांची गोत्रे मुळात चारच असल्यामुळे निदान गोत्र सांगणाऱ्या वर्णांचा वंश एकच आहे असे अनुमान निघते. तात्पर्य, शहाण्णव कुळी मराठ्यांचा व ही गोत्रे सांगणाऱ्या ब्राह्मणांचा वंश एकच आहे, असे म्हणता येईल.

आता श्रीकृष्णाची जात काय होती याचा विचार करू. श्रीकृष्ण हा ब्राह्मण देवयानी व क्षत्रिय ययाती यांच्या विवाहापासून जन्मलेल्या यदूचा वंशज होता. या जातीला सूत म्हणतात. व मनुस्मृती प्रमाणे ही जात अंत्यजाच्याही खालची आहे. श्रीकृष्णाला शिव्या देणारे शिशुपालासारखे अनेक लोक त्यावेळी होते पण त्यापैकी कोणीही श्रीकृष्णाच्या सूत जातीचा अवहेलनेने उल्लेख केला नाही. कर्णाचा मात्र सूतपुत्र म्हणून अनेक वेळा अपमान करण्यात आला. याची उपपत्ती अशी की उपलब्ध महाभारतात असलेले कृष्णाचे

## अश्वघोषाची वज्रसूचि

पण मुघल राजकर्त्यांना हिंदूंशी तर सोडाच बादशहाच्या कुळात निपजलेल्या पुरुषाखेरीज अन्य कोणत्याही पुरुषाशी मुघल कन्यांनी विवाह केलेला चालत नसे. त्यामुळे मुघल राजकन्या अविवाहित राहत.

प्रतिलोम विवाहाबद्दल वाटणाऱ्या तिरस्काराचे कारण स्त्रियाबद्दलचा अनुदार दृष्टीकोन हे आहे. 'स्त्री पुरुषापेक्षा हीन समजली गेल्यामुळे उच्च वर्णीय स्त्रीने नीचवर्णीय पुरुषाशी लग्न करणे म्हणजे आपल्या उच्च वर्णालाच नीच करणे होय. त्यामुळे असले विवाह निषिद्ध मानले पाहिजेत' या विचारातून अस्पृश्यतेचा जन्म झाला. ब्राह्मण स्त्रीला नीचवर्णीय पुरुषापासून झालेल्या व्यक्तीला चांडाल हे नाव प्राप्त झाले व चांडाल ही जाती इतकी नीच मानली गेली की तिने गावाच्या बाहेर रहावे असा प्रघात पडला. ही अस्पृश्यता होय.

तात्पर्य, जातींची उत्पत्ती वर्णसंकरापासून व अस्पृश्यतेची उत्पत्ती प्रतिलोम विवाहापासून आहे. चार वर्णांमध्ये तीन प्रकारचे अनुलोम व तीन प्रकारचे प्रतिलोम विवाह होऊ शकतात. म्हणजे मुळात सहा संकरवर्ण झाले. शुद्र पुरुष व ब्राह्मण स्त्री यांच्या संततीला अस्पृश्य समजले गेले. म्हणजे अस्पृश्य हे ब्राह्मणकुलोत्पन्न आहेत.

वर्णाप्रमाणेच वर्णसंकरामुळे झालेल्या जातींनाही वेगळी नावे पडली. जसे रजपूतापासून त्यांच्यापेक्षा खालच्या जातीच्या स्त्रीला झालेल्या अपत्याला डोग्रा म्हणू लागले. काही लोक डोग्रा म्हणजे दोगला म्हणजे व्यभिचारी स्त्रीची संतती असा या शब्दाचा अर्थ सांगतात. पण तो सर्वमान्य नाही व त्याची संभाव्यताही कमीच आहे. कारण व्यभिचार करणारी स्त्री नवराच आपल्या अपत्याचा बाप आहे असे सांगेल. उघडपणे जाराचे नाव आपल्या अपत्याला देणार नाही.

वर्णसंकराप्रमाणेच जातीसंकरही झाला. चार वर्णांचे जर सहा संकर होतात तर या संकरांचेही संकर होऊन अगणित जाती निर्माण झाल्या, हे अपेक्षितच आहे. तेव्हा जाती कशा निर्माण झाल्या यात गूढ काहीही नाही. आपल्या तुटकपणे उपलब्ध असलेल्या इतिहासात देखील याचे पुरेपूर स्पष्टीकरण आहे.

जातींचे मूळ वर्ण व वर्ण जन्मसिद्ध नव्हते. त्यामुळे जातिभेद हा वंशभेद नव्हे हे लक्षात ठेवले पाहिजे.

निरनिराळ्या जातींचे व्यवसाय काय होते याचीही माहिती उपलब्ध आहे.

### अनुलोम जातींचे व्यवसाय खालील प्रमाणे -

ब्राह्मण स्त्री व क्षत्रिय पुरुष यांच्या अपत्याला सूत म्हणत. त्यांचे दोन प्रकारचे व्यवसाय आहेत. एक म्हणजे पुराण सांगणे व दुसरा रथ बनविणे व हाकणे. ब्राह्मण स्त्री व क्षत्रिय पुरुष यांना झालेल्या यदु हा श्रीकृष्णाचा पूर्वज होता. तेव्हा श्रीकृष्ण हा सूत होता. तो



रथ चालविणे व पुराण सांगणे या दोन्ही गोष्टी करीत होता. सुभद्रेला त्याने चक्रव्यूह कसा भेदावा हे रथातून माहेरी नेत असता सांगितले व अर्जुनाला गीता सांगितली.

वैश्याला ब्राह्मण स्त्रीपासून झालेला तो वैदेह. वैदेहांची नेमणूक अंत:पुराच्या रक्षणासाठी होत असे. क्षत्रिय स्त्रीपासून वैश्याला झालेली संतती मागध म्हणविली आहे. तिचे काम भाटाचे असे. वैश्य स्त्रीला शूद्रापासून झालेल्या संततीला आयोगव म्हणत. हे सुतारकाम करीत. क्षत्रिय स्त्रीला शूद्रापासून झालेल्या संततीला निषाद म्हणत. यांचे काम मासे मारण्याचे व पारध करण्याचे होते. ब्राह्मण स्त्रीला शूद्रापासून झालेल्या चंडाल जातीला देहान्त शासनाची अंमलबजावणी करण्याचे काम दिलेले होते.

अनुलोम विवाहातून अनुक्रमे अंबठ, पाराशव व उग्र या जाती निर्माण झाल्या. त्यांच्या व्यवसायाबद्दल माहिती उपलब्ध नाही.

बुद्धकाली जातींचे प्रस्थ बरेच वाढले होते. याचाच अर्थ संकर विवाहाची प्रथा बुद्धापूर्वी शेकडो वर्षे प्रचारात होती. ख्रि. पू. दुसऱ्या सहस्त्रकात झालेल्या वैशंपायनाच्या महाभारतात संकराविरुद्ध बरीच ओरड आहे ती यामुळेच होय.

वैशंपायन काळातच झालेल्या उपनिषदामध्ये सत्यकाम जाबालीची कथा आहे. सत्यकाम जाबालीला गुरूने जात विचारली तेव्हा तो 'माहीत नाही' म्हणाला. गुरूने त्याला आईला जात विचारावयास सांगितली.

तेव्हा आईने म्हटले, माझा अनेक पुरुषांशी संबंध आला आहे. त्यामुळे मला तुझी जात सांगता येत नाही. तेव्हा गुरु म्हणाला, 'तू सत्यवादी असल्यामुळे ब्राह्मण असला पाहिजेस !'

सत्यकाम जाबालीच्या कथेवरून खालील गोष्टी सूचित होतात. (१) ही गोष्ट घडली त्या काळी जात बापाच्या जातीवरून ठरत असे. आईची जात विचारातच घेतली जात नसे. (२) विवाहबंधने बरीच शिथिल होती.

बुद्धाच्या काळी वर्णव्यवस्था जवळपास नष्ट होऊन हल्लीप्रमाणे जातींचे प्रस्थ माजले होते हे स्पष्ट आहे. त्यामुळेच बुद्धाच्या उपदेशात जातीवादावलेप हे एक मूर्खाचे लक्षण सांगितले आहे. असाच विचार महाभारतातील युधिष्ठिर व नहुष यांच्या संवादात आहे. युधिष्ठीर नहुषाला म्हणतो : 'सर्व वर्णांचा मुक्त संकर होत असल्यामुळे जन्मावरून जाती ठरविणे कठीण आहे. सगळ्यांची भाषा व कामसंबंध समानच आहेत. मग जाती कशावरून ठरवायची ? तेव्हा जाती जन्मावरून न ठरविता शीलावरून ठरवावी.'

अश्वघोष या बौद्ध कवीचा वज्रसूचि नावाचा एक निबंध आहे. त्यात जातीभेदावर टीका केली आहे. त्यातील एका श्लोकात म्हटले आहे की, 'ज्याप्रमाणे औदुंबर वृक्षाला शेंड्यावर, मध्यावर वा अगदी खालच्या बाजूला लागलेले फळ असो, ती सर्व औदुंबराचीच

समजली जातात त्याचप्रमाणे माणूस समाजाच्या कोणत्याही स्तरात जन्माला आला तरी त्यावरून तो मानवीय अधिकारास पात्र नाही असे ठरत नाही.'

यात सर्व मानव एकाच वंशाचे आहेत ही कल्पना अनुस्यूत आहे.

बुद्धकाली जो जातीभेद टीका करण्याइतका प्रभावशाली झाला होता त्यात किती व कोणत्या जाती होत्या हे आज सांगता येत नाही. पण बुद्धानंतर सुमारे दोन शतकांनी झालेल्या मेगॅस्थेनिसने भारतात मुख्यत: सात जाती आहेत असे म्हटले आहे व जातींचे लक्षण म्हणजे त्यांना आपसात रोटीबेटीबंदी होती व प्रत्येक जातीचे व्यवसाय ठरलेले होते. म्हणजे दुसऱ्या जातीचा व्यवसाय करणे निषिद्ध मानले जात होते. त्यावेळी भारतात सातच व्यवसाय होते हे शक्य नाही. सात व्यवसायावरून सात जाती ओळखता येणे शक्य नव्हते. तेव्हा चार वर्णांच्या चार व्यवसायांचे सात जातीत विभाजन झाले असावे.

आमच्या रक्षाविज्ञानखात्यात मनोविज्ञानाचे ऑस्ट्रेलियन प्राध्यापक मॅकल्वेन एका मानवशास्त्रज्ञाला घेऊन आले होते. त्याने सांगितले की 'ज्यात जाती नाहीत असा जगात कोणताच समाज नाही. पण भारतातील जातीजातीतील रोटीबेटीबंदी इतर समाजापेक्षा जास्त कडक आहे.'

असे असले तरी संकरज जातींची संख्या लक्षात न राहण्याइतकी मोठी आहे व पौरोहित्य सोडले तर बाकी सर्व व्यवसायात अनेक जातींचे लोक नेहमीच आढळत आले आहेत. यावरून भारतातील जातीव्यवस्था देखील जेवढी सांगितली जाते तेवढी कडक कधीच नव्हती असे म्हणता येते.

अस्पृश्य जातींना गावाबाहेर ठेवणे, त्यांचा विटाळ मानणे वगैरे अनेक अपमानास्पद रीतीनी वागविण्यात आले हे नाकबूल करता येत नाही. पण त्यांना फक्त ब्राह्मणांनी ही वागणूक दिली, ब्राह्मणेतर त्यांच्याशी सन्मानाने वागले, असे जे सूचित करण्यात येते ते साफ चूक आहे. हा आरोप करणाऱ्या एका 'पुरोगामी' ब्राह्मण विदुषीशी डॉ. श्रीकांत जिचकर यांची चर्चा मी ऐकली. डॉ. जिचकर हे महाराष्ट्राचे भूतपूर्व मंत्री व राज्यसभासदस्य होते. ते १८ विषयात एम. ए. व संस्कृतात डी. लिट. होते. शिवाय त्यांची पहिली पदवी एम. बी. बी. एस. ही होती. ते या विदुषीला म्हणाले, 'माझ्या खेड्यामध्ये अस्पृश्यांचा छळ करणारे माझ्याच जातीचे लोक आहेत. खेड्यात ब्राह्मण बहुधा नाहीतच.' डॉ. जिचकर जातीने कुणबी होते अशी माझी समजूत आहे. अनुसूचित जातीच्या अनेक लोकांनी डॉ. जिचकरांच्या मताची पुष्टी केली आहे. एवढेच नव्हे तर खुद्द अनुसूचित जातीमध्ये उच्चनीचता आहे व त्यांच्यातील उच्च जाती नीच जातींना फारशी वेगळी वागणूक देत नाहीत.

भारतातील निम्नतम जातीपेक्षाही ज्यांची अवस्था दारुण असते असा गुलामांचा वर्ग



भारत सोडून इतर देशात आहे. ग्रीसमध्ये तीन चतुर्थांश संख्या गुलामांची होती. या गुलामांची पशूप्रमाणे खरेदी / विक्री होत असे. आधुनिक काळात अमेरिकेतील नीग्रोंच्या नशिबीही हेच आले होते. भारतात गुलामगिरीची प्रथा नाही असे मेगॅस्थेनिसने लिहून ठेवले आहे. ते पूर्णपणे खरे नाही.

भारतात माणसांची खरेदी / विक्री आजही होते अशा तक्रारी आहेत. पण इतर देशांच्या मानाने गुलामांना या देशात बरी वागणूक मिळत असल्यामुळे मेगॅस्थेनिसला येथे गुलामगिरी अस्तित्वात आहे असे वाटले नाही.

मेगॅस्थेनिसचा काळ व मनुस्मृतीचा काळ यात फारसा फरक नाही. मनुस्मृतीच्या काळी रोमन साम्राज्यात गुलामांच्या कत्तली करणे हा करमणुकीचा समाजमान्य प्रकार होता. भारतातील चालीरीतींशी इतर देशातील निंद्य चालीरीतीची तुलना केली असता भारत बराच सोज्वळ होता असे म्हणावे लागते.

डॉ. आंबेडकरांनी रोमन साम्राज्यातील गुलामगिरीची पद्धती जन्मसिद्ध नव्हती असे विलक्षण विधान केले आहे. ज्यांना पशूसारखे वागविण्यात येई त्या गुलामांची अपत्ये गुलाम नसत हे विधान कशाच्या आधारावर केले आहे हे समजत नाही.

भारत व इतर देश यांच्या तुलनेपेक्षाही, आधुनिक भारत व प्राचीन भारत यांची तुलना जास्त उद्बोधक होईल. पेशवाईत अनुसूचित जमातींना कसा अपमान सोसावा लागे याचे अनेक वेळा वर्णन केले जाते. यात असे सूचित करण्यात येते की पेशव्यांच्या राज्यापेक्षा शिंदे, होळकर, गायकवाड व भोसले या ब्राह्मणेतरांची राज्ये अधिक सोज्वळ होती. असे समजण्यास काहीच आधार नाही. पेशव्यांच्या राज्यातील चालीरीती पेशव्यांनी निर्माण केलेल्या नव्हत्या. इतर राज्यातही तशाच चालीरीती होत्या.

आजच्या पुरोगामी व सेक्युलर सरकारांना पूर्वीच्या भारताला नाके मुरडण्याचा काहीच अधिकार नाही. पेशव्यांच्या भारतात निम्न जातींचा केवळ अपमानच होत असे. आजच्या भारतात त्यांची उघड कत्तलच केली जाते. वरिष्ठ जातीयांच्या सेना कनिष्ठ जातींच्या वस्तीत शिरून सरळ त्यांच्या कत्तलीच करतात. ही कत्तल करणारे ब्राह्मण नसतात. तर ब्राह्मणांना समतेचे पाठ देणारे ब्राह्मणेतरच असतात. (खैरलांजींची घटना हे ताजे उदाहरण!)

प्रकरण - ६

# हजारो वर्षामागे उडी कशासाठी?

आत्तापर्यंत ज्या घटनांची चर्चा करण्यात आली त्या हजारो वर्षे पूर्वीच्या, काव्यरूपाने सांगितलेल्या व ज्याच्या ऐतिहासिकतेबद्दल अनेकांनी शंका घेतली आहे अशा प्रकारच्या आहेत. आजच्या भारतातील जातींच्या समस्यांचे मूळ पूर्वीच्या एक दोन शतकात न शोधता एकदम हजारो वर्षे मागे उडी का मारण्यात येते असा प्रश्न पडतो. त्याची अनेकविध उत्तरे आहेत. एकतर १७५७ साली बंगालमध्ये राज्य स्थापन केल्यावर इंग्रजांनी १८४८ पर्यंत साराच भारत पादाक्रांत केला. साता समुद्रापलिकडील एका छोट्याश्या बेटातून आलेल्या इंग्रजांनी लीलेने भारतातील साऱ्या शक्तींना निष्प्रभ केले. ही घटना स्तिमीत करणारी होती. १८५७ पर्यंत भारतात इंग्रजांचा पराभव करण्याची उमेद होती. त्यानंतर मात्र इंग्रजांचा पराभव करण्याची महत्त्वाकांक्षा आकाशातले तारे हस्तगत करण्याच्या महत्त्वाकांक्षेसारखी निर्बुद्धपणाची आहे ही भावना प्रबल झाली व आपल्या पराभवाची कारणे आपल्या हजारो वर्षांच्या इतिहासात खोलवर रुजलेली आहेत, ती दूर केल्याशिवाय इंग्रजांच्या पराभवाचे स्वप्न पाहण्यात अर्थ नाही अशी विचारसरणी फोफावली. ही विचारसरणी इतिहासाच्या घोर अज्ञानावर आधारलेली आहे. ज्या इंग्रजांनी आमचा लीलया पराभव केला ते स्वतःच मुळी निदान हजार वर्षे पारतंत्र्यात होते. त्यांच्यावर रोमन, डेन्स, फ्रेंच वगैरे लोकांनी राज्ये केली. रोमन राज्यकर्त्यांनी जेव्हा आपला ब्रिटनवरील ताबा त्यांच्या देशावर आलेल्या प्रबल आक्रमणामुळे उठविला तेव्हा इंग्रज लोक 'तुम्ही जाऊ नका, तुम्ही गेल्यास आम्ही अनाथ होऊ' म्हणून त्यांच्या पाया पडत होते. इंग्रजांवर राज्य करणारे रोमन, इंग्रजांच्या भरभराटीच्या काळात जगाच्या इतिहासात नगण्य होते. इंग्रजांचे दुसरे सांस्कृतिक जनक जे ग्रीक ते तुर्कांच्या अंकित झाले होते. तुर्कांनी त्यावेळेस कोणत्या सामाजिक सुधारणा केल्या व ग्रीकात त्यावेळी कोणत्या कुरीति होत्या म्हणून तुर्क त्यावेळी ग्रीकापेक्षा वरचढ झाले? १४८७ पासूनचा इंग्रजांचा इतिहास वैभवशाली आहे. तो त्यांनी कोणता पुरोगामीपणा केला म्हणून? ग्रीकांचे व रोमनांचे पतन झाले ते कोणत्या दुष्ट रुढीमुळे? लढाईमध्ये एक पक्ष हरणारच. जो हरतो त्याचे सर्व सामाजिक जीवनच सडलेले असते व त्याला पुनरुज्जीवनाची आवश्यकता असते असे म्हणणे म्हणजे कुस्तीत पडणारा पहेलवान, पहेलवान नसून रुग्ण असतो व जिंकणारा सर्वगुणसंपन्न असतो असे म्हणण्यासारखे आहे. १८५७ नंतर भारतात सुरू झालेली प्रबोधन म्हणून गौरविली गेलेली हिंदु धर्माच्या सुधारणेची आंदोलने या मिथ्याग्रहावर आधालेली होती. 'विधवाविवाहास बंदी केल्यामुळे आम्ही हरलो.' मूर्तिपूजा करीत होतो म्हणून आम्ही हरलो, 'जातिभेद होता म्हणून आम्ही हरलो,' 'बालविवाह करीत होतो म्हणून आम्ही हरलो हे विचार अत्यंत बालिश आहेत. पण पराभूत माणसाला आपल्या पराभवाबद्दल दोष द्यायला कुणीतरी हवा असतो. असे काही सापडले की त्याला हायसे वाटते व पराजयाचे दुःख कमी होते. लहानपणी आमच्या शाळेची क्रिकेट मॅच पाहताना आम्ही एक मातीचा ढीग उभारून आमच्या खेळाडूंनी टोला मारल्यावर त्याला नमस्कार करायचो. पण हरू लागल्याबरोबर त्याच ढिगाला पायाखाली तुडवून समाधान मानायचो. आम्ही त्या ढिगाला केलेल्या नमस्कारामुळे आमच्या खेळाडूने टोला मारला नाही व आम्ही त्याला तुडविल्यामुळे आमची विजयाकडे वाटचाल होणार नाही हे आम्हालाही कळत होते. पण या निर्बुद्ध कृतीने मनाला थोडा दिलासा मिळत होता खास.

हिंदू समाज आपल्या समाजव्यवस्थेला कोणत्या व्याधी झाल्या आहेत याच्या शोधात असताना मिशनऱ्यांनी त्याला एक उत्तर दिले 'तुमचा धर्म वाईट आहे म्हणून तुम्ही हरता' 'तुम्ही ख्रिस्ती व्हा म्हणजे तुम्हाला उर्जितावस्था येईल.'

पोर्तुगीझांप्रमाणेच जेत्या इंग्रजांचा भारताला ख्रिस्ती करणे हा उद्देश होता, पण त्यांनी भारतीय राज्यकर्ते समर्थ आहेत तोपर्यंत या भानगडीत न पडण्याचे धोरण ठेवले. कारण पोर्तुगीजांच्या धर्मवेडामुळेच त्यांना मराठ्यांनी ठेचून काढले व दोन वेळा त्यांचे भारतातून अजिबात उच्चाटन होण्याची पाळी आली होती. त्यावरून धडा घेऊन शीखांचा पराभव करीपर्यंत इंग्रजांनी या भानगडीत न पडण्याचे ठरविले. शिखांचा पराभव होऊन भारतात सर्वत्र निर्वीरमुर्वीतलम् झाल्यावर इंग्रजांना आपल्या अवतारकार्याची आठवण झाली.

### सत्तावनचे स्वातंत्र्ययुद्ध

ईस्ट इण्डिया कंपनीच्या डायरेक्टरने स्पष्टच म्हटले होते,

'एवढा मोठा देश प्रभूने आपल्या स्वाधीन केला आहे तो मजा मारण्यासाठी नव्हे. तर त्याच्या धर्माचा आपण प्रसार करावा म्हणून.'

मिशनऱ्यांचा उपदेश काही हिंदूंना पटला. आपल्या दुर्गतीस आपला धर्म कारण आहे म्हणून हिंदू धर्मासारखा पापी धर्म सोडल्यावरही ख्रिस्ती झालेल्या लोकांना इंग्रजांच्या कृपेने चार दोन टक्के मिळाले. इंग्रजांसारखे वैभव प्राप्त होण्याचे कोणतेच लक्षण त्यांच्या जीवनात दिसले नाही.

ऑक्सफर्डमध्ये बोडन चेअर ऑफ संस्कृत स्थापन झाली. तिचा उद्देश भारताचे ख्रिस्तीकरण करण्यास मदत व्हावी हा होता हे बोडनच्या दानपत्रात लिहिले आहे. ऑक्सफर्डमधील संस्कृताचा प्रोफेसर मॅक्समूलर याने ऋग्वेदाचे भाषान्तर करण्याचा एक महान प्रकल्प पुरा केला. ते भाषान्तर पूर्ण झाल्यावर त्याने आपल्या पत्नीला पत्र लिहिले:

'माझे ऋग्वेदाचे भाषान्तर वाचून सुबुद्ध भारतीयांवर असा परिणाम होईल की त्यांना आपल्या

धर्माचा पाया कसा ठिसूळ आहे हे कळून भारताचे ख्रिस्तीकरण सुलभ होईल.' म्हणजे सत्यशोधन हा मॅक्समूलरचा उद्देश नसून भारताचे ख्रिस्तीकरण हा होता. त्यानेच आर्यांच्या स्वारीची भाकडकथा रचली. ही भाकडकथा जगात रुजविण्यात त्याला सफलता मिळाली व त्याने भारताच्या राष्ट्रीयत्वावर एक प्राणघातक प्रहार केला. द्रविडिस्थान व दक्षिणेतील ब्राह्मणविरोधाच्या चळवळी हा त्याचाच परिणाम आहे.

मॅक्समूलरचे हे मत १८५७ नंतर भारतात बरेच सार्वत्रिक झाले. १८५७ पूर्वी भारतात शांतता स्थापित करण्यात इंग्रजांना फारशी सफलता मिळाली नव्हती. तसेच ज्याला इंग्रजी शिक्षण म्हणतात ते लक्षणीय प्रमाणात सुरू झाले नव्हते. मुंबई, मद्रास व कलकत्ता विद्यापीठे १८५७ मध्ये स्थापित झाली. पण १८५७ मध्ये एक विश्वविख्यात घटना घडली. भारतीयांच्या शिक्षणावर एक वेगळेच परिणाम करण्यास ही घटना कारणीभूत ठरली. ही घटना म्हणजे १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध. आपल्या विषयाच्या दृष्टीने या उठावातील खालील गोष्टी महत्त्वाच्या आहेत -

१. या उठावाची सुरवात बंगाल आर्मी या नावाच्या ब्रिटिशांच्या नोकरीत असलेल्या ब्राह्मण सैन्याने केली.
२. या उठावाची योजना नानासाहेब पेशवे या ब्राह्मणाने केली.
३. तात्या टोपे व राणी लक्ष्मीबाई हे या उठावाचे प्रमुख सेनानी ब्राह्मण होते.
४. हिंदूंना बाटविण्याचा प्रयत्न केल्यामुळे हा उठाव झाला.

या तीन तथ्यांनी इंग्रजांच्या मनात खालील ग्रह सखोल झाले.

१. या समाजाचे पुढारी ब्राह्मण आहेत व ते इंग्रजी राज्याविरुद्ध मुसलमानांसकट सगळ्या भारताचा उठाव घडवून आणू शकतात.
२. ब्राह्मणांना नामोहरम केल्याशिवाय आपले या देशावरील राज्य सुरक्षित राहणार नाही व हिंदूंना ख्रिस्ती करण्याचा आपला उद्देश सफल होणार नाही.

ब्राह्मणांची निंदा करायची म्हणजे हिंदू धर्माची निन्दा अपरिहार्यपणे आलीच. शिवाय हिंदू धर्म हाच मुख्यत: इंग्रजांच्या प्रहाराचे लक्ष्य होता. १८५७ च्या प्रभावाने 'ख्रिस्ती धर्माच्या प्रसारासाठी आम्ही आपली राजकीय सत्ता वापरणार नाही' म्हणून राणीने वचन दिले असले तरी 'मिशनऱ्यांना उत्तेजन देणार नाही' असा त्या वचनाचा अर्थ होत नव्हता. ख्रिस्ती धर्मग्रंथांच्या आधारे भारताचे राज्य चालविले जाणार नाही व ब्रिटिश राणी ही ख्रिस्तीधर्मरक्षक असली तरी भारताचे राज्य ख्रिस्ती धर्माच्या आधारे चालणार नाही असे वचन खुद्द राणीच्या जाहीरनाम्यात असले तरी मिशनऱ्यांच्या मागे ख्रिस्ती देशातील सर्व समाज व धन उभे होते. सर्व प्रचाराची साधने त्यांच्या हाती होती व धर्मान्तरितांना काही काळ तरी समृद्धि मिळवून देण्याचे सामर्थ्य होते. याचा बराच परिणाम होऊन ख्रिस्त



धर्माचा बराच विस्तार झाला व ब्राह्मणनिंदा व हिंदूधर्मनिंदा पदोपदी कानावर पडू लागली.

**मॅक्समूलर आणि मार्क्स**

मॅक्समूलरचा काळ १८२३ ते १९०० हा होता. याच कालावधीत प्रस्तुतच्या विषयाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या दुसऱ्या एका विचारवंताचा अवतार झाला.

त्याचे नाव कार्ल मार्क्स. याचा जीवनकाल १८१८ ते १८८३ हा होता. म्हणजे मॅक्समूलर व मार्क्स याच्या जीवनाची ६० वर्षे समान होती. मॅक्समूलरचे क्षेत्र संस्कृत साहित्य व भाषाशास्त्र हे होते तर मार्क्सचे अर्थशास्त्र व इतिहासमीमांसा हे होते. मार्क्सही संस्कृत पंडित होता असे कॉम्रेड डांगे म्हणत. पण विभूतिपूजेपेक्षा त्यात जास्त काही असेल असे वाटत नाही. आपल्या विषयाच्या दृष्टीने मार्क्सचे जे महत्त्व आहे ते संस्कृत वाङ्मयाबद्दल त्याने काही लिहिले आहे म्हणून नव्हे तर पुरोहितांचा वर्ग श्रमिकांचे शोषण करण्यास भांडवलदारांची साथ करणारा आहे असा सिद्धांत मांडल्यामुळे आहे. मार्क्स परलोक मानीत नव्हता व परलोकाची कल्पना 'या लोकात तुमचे जीवन दु:खदायक असले तरी परलोकात तुमच्यासाठी सुख वाढून ठेवले आहे' अशी श्रमिक वर्गाला आशा दाखवून शोषणाविरुद्ध बंड करण्याची त्यांची प्रवृत्ती नष्ट करणे या उद्देशाने पुरोहितांनी काढली आहे, असा त्याचा सिद्धांत आहे. ब्राह्मणांना बडविण्यास या सिद्धांताचा उपयोग किती आहे हे सांगण्याची जरूर नाही. पण असे करण्यासाठी परलोक नाकारावा लागतो हे पुष्कळ लोक विसरतात. ज्योतीबांनीही तसेच केले. त्यांना ब्राह्मण पुरोहित चालत नव्हते पण पुरोहिताचे काम ब्राह्मणेतरांनी केलेले चालत होते. द. भारतातील ब्राह्मणद्वेष्ट्यांचीही हीच गत आहे. तमिळनाडू सरकारने ब्राह्मणेतरांना पौरोहित्य करण्याची परवानगी देणारा कायदा पारित केला आहे. डी. एम. के. पक्ष कम्युनिझमचे पाठीराखे आहेत. करुणानिधींनी आपल्या मुलाचे नाव स्टॅलिन ठेवले आहे. कम्युनिझम पुरोहितविरोधी आहे हे याचे एकमात्र कारण आहे. ब्राह्मणांची निंदा करणे हे समाजवादाचे अविभाज्य अंग आहे असे कम्युनिस्ट समाजवादापासून तो नेहरूवादी समाजवाद, सोशलिस्ट पार्टीचा समाजवाद या सगळ्यात अनुस्यूत आहे. पण याबरोबरच इतर देशातील समाजवादात नसलेला एक विशेष भारतीय समाजवादात आहे. पुरोहितशाहीची निंदा करायची म्हणजे फक्त ब्राह्मणांची निंदा करायची, मुल्लामौलवी व पाद्री यांची नव्हे, तसे करणे हा प्रतिगामीपणा व जातीयता आहे. हा खास भारतीय समाजवाद आहे. मार्क्स वा मॅक्समूलर यांच्या काळात ब्राह्मणद्वेष पसरविण्याचे काम आणखी एका पुरुषाने केले व त्याचा प्रभाव आजही कायम आहे. हा पुरुष म्हणजे लोकहितवादी (१८२३ ते १८९२). लोकहितवादींनी 'पुरोहित लोक आळशी आहेत', 'ऐतखाऊ आहेत' अशी त्यांच्यावर झोड उठविली आहे पण 'पुरोहितांचा वर्ग समाजात नको' असे म्हणण्याची त्यांची तयारी नव्हती. कारण पुरोहितांचा वर्ग पोसल्याने हिंदूंची

अवनती झाली असे म्हणताना त्यांचे दैवत असलेल्या इंग्रजात देखील पुरोहित आहेत व त्यांच्यावर त्या समाजाच्या एकूण कारभारापैकी दशांश कर tithe खर्च होतो त्याचे त्यांना ज्ञान नव्हते वा महत्त्व वाटत नव्हते. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी इकडे लक्ष्य वेधून त्यांच्यावर टीकेची झोड उठविली. ती प्रभाकर पाध्ये या समाजवादी लेखकाला पसंत पडली नाही व त्यांनी इंग्रज समाजात पुरोहित आहेत म्हणून हिंदू समाजातील पुरोहितांचे समर्थन होत नाही अशी चिपळूणकरांवर टिका केली. खुद्द लोकहितवादी आपल्या जीवनात पुरोहितांचा उपयोग करीत असा चिपळूणकरांचा आरोप होता.

तात्पर्य, आजच्या ब्राह्मणद्वेषांच्या चळवळीचे मूळ १९ व्या शतकातील मिशनरी प्रेरित विचार आहेत. या विचारांचा स्रोत ज्या चार ग्रंथकारात सापडतो ते सर्व १९ व्या शतकातले आहेत हे वर दाखविले आहे. हे विचार इंग्रजांनी १८५७ बद्दल जी दहशत घेतली होती तिचे निवारण करण्यासाठी त्यांनी प्ररित केलेले होते. त्यापूर्वीच्या इतिहासात जाती असल्या तरी जातीजातीमध्ये राजकीय भांडण झाल्याचे एकही उदाहरण नाही.

**मतपेटीचे राजकारण**

आज जातिद्वेष पसरविण्यासाठी इंग्रज भारतात नाहीत. पण स्वातंत्र्योत्तर राजकारणाला ब्राह्मणद्वेषाची गरज पडत आहे.

आम्ही नसलो तर जातिवादी हिंदू तुम्हाला खाऊन टाकतील अशी भीती दाखविल्याने मुसलमानांची एक गठ्ठामते मिळतील या गणितावर पं. नेहरूंनंतर देखील काँग्रेसचे राजकारण सुरू आहे. त्याला इंदिरा गांधींच्या काळात ब्राह्मणद्वेषाचा आयाम मिळाला. लोकशाहीच्या व्यवस्थेत आपली सत्ता टिकणार नाही अशी भीती वाटल्यावर इंदिरा गांधींनी आणीबाणी लावली. या आणीबाणीत संघाविरुद्ध जो प्रचार खुद्द इंदिरा गांधींच्या प्रेरणेने करण्यात आला त्यात संघ ही महाराष्ट्रतली ब्राह्मणांची संस्था आहे असा प्रचार करण्यात आला. ब्राह्मणांची संस्था म्हटल्यामुळे संघप्रणीत भारतीय जनसंघाला दक्षिणेत ब्राह्मणेतरांची मते मिळणार नाहीत असे यामागे गृहीत होते. ब्राह्मणेतर समाजाला ब्राह्मणांचे बुजगावणे दाखवून काँग्रेसला भाजपाचा निवडणुकीतील पराभव करायचा आहे. हे माझे मत नाही. पुष्कळशा ब्राह्मणेतर मित्रांशी मी या प्रश्नाची चर्चा केली तेव्हा त्यांनी ब्राह्मणद्वेष भाजपाचा निवडणुकीत पराभव करण्याच्या उद्देशाने काँग्रेस चेतवीत आहे असे निदान सांगितले.

ब्राह्मणेतरांचा रा. स्व.संघ, भाजप यांना विरोध असेल तर तो त्यांनी लोकशाही मार्गाने जरूर करावा. पण त्या पायी समस्त ब्राह्मण समाजाला परकीय, आक्रमकांचे वंशज वगैरे ठरविणे व त्यांनी देश सोडून चालते व्हावे, असे म्हणणे योग्य आहे काय याचा त्यांनी विचार करावा. कम्युनिस्ट पक्ष, समाजवादी पक्ष, पुरोगामी चळवळी यात अनेक ब्राह्मण आघाडीवर होते व आहेत हे त्यांनी विसरू नये.



तात्पर्य, जी समस्या सर्वस्वी ब्रिटिशनिर्मित व काँग्रेसनिर्मित आहे तिचा विचार करताना वेदापर्यंत उडी मारणे हा अव्यापारेशु व्यापार आहे हेच या पुस्तिकेत दाखवून दिले आहे.

✠

# ब्राह्मणांना आणखी किती झोडपणार?

नामवंत लेखक-संपादक ह.मो.मराठे यांचा 'ब्राह्मणांना आणखी किती झोडपणार? हा स्पष्ट, परखड, प्रदीर्घ लेख गेली दोन- अडीच वर्ष विलक्षण गाजतो आहे. आतापर्यंत हा लेख लाखो वाचकांनी वाचला, आणखीही लाखो वाचकांना तो वाचायला हवा आहे. म्हणूनच या पुस्तिकेत तो बहुचर्चित लेख पुन्हा छापलेला आहे. ब्राह्मणांवर करण्यात येत असलेल्या निराधार आणि पूर्वग्रहदूषित आरोपांचा परामर्श घेत घेत लेखकाने सवाल केला आहे की ब्राह्मणांची विचारसरणी बदलत आहे, पण ब्राह्मणांकडे बघण्याचा ब्राह्मणेतर समाजाचा दृष्टिकोन का बदलत नाही? तो कधी बदलणार? ब्राह्मणांचं समाजाच्या सर्व क्षेत्रातील योगदान केवळ ब्राह्मण म्हणून नाकारलं जात आहे, ते योग्य आहे काय?

'ब्राह्मण, शिवधर्म आणि स्वदेस' हा त्यांचा लेखही या पुस्तिकेत समाविष्ट आहे.

'विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच' तर्फे प्रकाशित



**'विविजा मंच' तर्फे**

**इतर प्रकाशित पुस्तिका**

# डॉ.आंबेडकरांच्या कार्यात ब्राह्मणांचा सहभाग

उच्चशिक्षित, उच्चपदस्थ अशा दलित तरुणांच्या मनात ब्राह्मणांविषयी दुस्वास असल्याचे अनेकदा अनुभवाला येते. ब्राह्मणांनी चातुवर्ण्यव्यवस्था निर्माण करून दलितांवर अस्पृश्यता लादली असा त्यांचा समज असतो. पण अस्पृश्यतेची प्रथा नष्ट करण्याच्या कामी ब्राह्मणांनीच किती कार्य केले आहे याची मात्र त्यांना काहीच माहिती नसते.या कार्याची माहिती दलितांना हवी, तशीच ती ब्राह्मणांनाही असणे आवश्यक आहे. या पुस्तिकेत ती माहिती वाचा !

लेखक

**प्रा. माधव पोतदार**

‘विविजा मंच’ तर्फे
इतर प्रकाशित पुस्तिका

# म.फुले यांच्या कार्यात ब्राह्मणांचा सहभाग

म.फुले यांनी समाजसुधारणेचे जे विषय हाती घेतले ते अत्यंत महत्वाचे होते. पण त्याबद्दलची आपली भूमिका मांडताना त्यांनी ब्राह्मणांवर जहरी टीका केली. त्यामुळे अनेक फुलेवाद्यांचा असा समज झालेला आहे की, म. फुले यांच्या कार्याला ब्राह्मणांचा विरोधच होता. पण वस्तुस्थिती अशी आहे की अनेक ब्राह्मण फुले यांच्या कार्यात सहभागी होते. मुलींची शाळा काढायला फुले यांना एका ब्राह्मण गृहस्थांनीच आपल्या वाड्यात जागा दिली होती हे त्याचे एक उदाहरण !

लेखक

**विद्याकर वासुदेव भिडे**



## ‘विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच’ तर्फे प्रकाशित पुस्तिका

- **छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यात ब्राह्मणांचा सहभाग – श्यामसुंदर मुळे** पृष्ठे ४८, मूल्य रु. २०/-
  शिवाजी महाराजांचे खरे शत्रू ब्राह्मणच होते या सूत्रानुसार नवे शिवचरित्र लिहिले जाऊ लागले आहे. हा धोका ओळखून तयार केलेल्या या पुस्तिकेत वाचा महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात सहभागी असलेल्या अनेक ब्राह्मणांविषयी.

- **मराठी स्वराज्य ब्राह्मण पेशव्यांनी बुडविले काय ?– डॉ. भा. रा. अंधारे** पृष्ठे ८८, मूल्य रु. २५/-
  मराठी स्वराज्य बुडाले त्यावेळी पेशवेपदी ब्राह्मण होते हे खरे; पण केवळ तेवढ्याने स्वराज्य बुडविल्याचे पाप ब्राह्मणांच्या माथी मारणे कितपत योग्य आहे ?

- **विद्रोही ब्राह्मण–ह. मो. मराठे** पृष्ठे ८८, मूल्य रु. २५/-
  ब्राह्मण हे येथून तेथून प्रतिगामी अशी समजूत बहुजन समाजाचे विचारवंत करून देत असतात. पण पाऊणशे–ऐंशी वर्षापूर्वीच ब्राह्मणांनी पुरोगामी विचार हिरीरीने मांडायला सुरुवात केली होती. कशी ते या पुस्तकात वाचा.

- **ब्राह्मण चळवळ कशासाठी ? –ह. मो. मराठे** पृष्ठे ८०, मूल्य रु. २५/-
  ब्राह्मण समाजाला आर्थिक कोंडीला तोंड द्यावे लागत आहे. त्याचप्रमाणे सामाजिक दहशतीच्या वातावरणालाही. त्याचमुळे ब्राह्मण चळवळ वाढते आहे. त्याची चर्चा करणारी पुस्तिका.

- **ब्राह्मणनिंदेची नवी लाट –ह. मो. मराठे** पृष्ठे ९६, मूल्य रु. २५/-
  ब्राह्मणांवर करण्यात येणाऱ्या विकृत टीकेचा आणि त्यांच्याबद्दल पसरविण्यात येणाऱ्या गैरसमजुतींचा परखड परामर्श घेणारी पुस्तिका.

■ शंबुक, एकलव्य यांच्या दुःखांना ब्राह्मण जबाबदार आहेत काय? – स्वाती देशपांडे पृष्ठे ४८, मूल्य रु. २५/-

**विद्रोही ब्राह्मण**

ह. मो. मराठे